सोलापूर तरुण भारत
आसमंत



# ऊर्जेसाठीची नवी लढाई

लक्ष्यवेध....
प्रतिनिधी

अमेरिकेने रशियाच्या दोन सर्वांत मोठ्या तेल कंपन्यांवर म्हणजेच 'रोझनेफ्ट' आणि 'ल्युकॉईल' यांच्यावर कठोर निर्बंध लादले असून, या निर्णयाचा जागतिक ऊर्जा बाजारात विपरीत परिणाम झाला आहे. रशियाने अमेरिकेच्या या निर्णयाचा कठोर शब्दांत निषेध केला. रशियन तेल कंपन्यांवर अमेरिकी निर्बंधांची घोषणा होताच, आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढले, विमा आणि वाहतूक खर्चातही प्रचंड वाढ नोंदवली गेली आणि रशियाकडून तेल आयात करणारे देश आता रशियाला पर्याय शोधू लागले आहेत. ही घटना आंतरराष्ट्रीय राजकारणात ऊर्जा किती परिणामकारक भूमिका बजावते, हे अधोरेखित करणारी ठरली आहे. कारण, ऊर्जा ही केवळ अर्थव्यवस्थेपुरतीच मर्यादित नसून, भूराजकीय घडामोडीत ती एक महत्त्वाचे साधन म्हणून उदयास आली आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

अमेरिकेने रशियाकडून तेल खरेदी करू नये, असे आवाहन केल्यानंतरही प्रामुख्याने भारत आणि चीन या दोन्ही देशांनी ही खरेदी कायम ठेवली आहे. त्यामुळेच संतापलेल्या अमेरिकेने आता दोन प्रमुख रशियन तेल कंपन्यांवर निर्बंध लादले आहेत. 'रोझनेफ्ट' आणि 'ल्युकॉईल' या दोन कंपन्यांकडे रशियाच्या तेल निर्यातीतील जवळपास दोन तृतीयांश इतका मोठा हिस्सा आहे. त्यामुळे या निर्बंधांचा फटका थेट रशियाच्या महसुलावर होणार आहे. या दोन्ही कंपन्यांच्या व्यवहारांवर आंतरराष्ट्रीय बँकिंग प्रणाली, विमा कंपन्या आणि जहाज वाहतूक क्षेत्र यांच्याकडून मर्यादा आणल्या गेल्या, तर रशियाची अर्थव्यवस्था अडचणीत येऊ शकते. रशियाने म्हणूनच अमेरिकेवर दडपशाहीचा आरोप केला आहे.

> **रशियाकडून तेल खरेदी करू नका, असे सांगूनही भारताने ही खरेदी थांबवलेली नाही. म्हणूनच, रशियापाठोपाठ आता रशियन तेल कंपन्यांवर निर्बंध लादण्याचा तुघलकी निर्णय अमेरिकेने घेतला. तथापि, भारताने ही खरेदी कायम ठेवल्यानेच जगभरात इंधनाच्या किमती आटोक्यात राहिल्या, याचा अमेरिकेला पद्धतशीर विसर पडलेला दिसतो.**



इतिहासाचा धांडोळा घेतल्यास अमेरिकेकडून अशा दडपशाहीचा वापर होणे, हे अजिबात नवीन नाही. अमेरिकेने आपले हित जपण्यासाठी याआधीही अनेक देशांवर निर्बंध लादले, हल्ले केले तसेच सत्ताबदलही केले. व्हिएतनाम, इराण, इराक, जॉर्डन, सोमालिया, लीबिया हे सर्व देश कधीतरी अमेरिकन धोरणाचेच बळी ठरले. अमेरिकेने आपल्या हितसंबंधांविरुद्ध निर्णय घेणाऱ्यांना धडा शिकवण्याचे ठरवले, तेव्हा ते देश युद्धाच्या खाईत ढकलले गेले. अलीकडेच अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या समुद्रात ड्रग्ज तस्करांवर कारवाईच्या नावाखाली नौदलाची मोठी तुकडी तैनात केली. सात नौका उद्ध्वस्त केल्याचा दावा करत त्या कारवाईला 'ड्रग्जविरोधी युद्ध' असे म्हटले. मात्र, या कारवाईमागचा खरा हेतू हा तेलसाठे आणि दक्षिण अमेरिकेतील प्रभाव कायम राखणे हेच आहे. त्याच धर्तीवर, रशियावर आर्थिक निर्बंध लादून अमेरिकेने पुन्हा एकदा हेच दाखवून दिले की, अमेरिकेला अन्य देशांच्या निर्णयप्रक्रियेत हस्तक्षेप करण्याचा अधिकार असल्याचे ती गृहीतच धरते. युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर ट्रम्प प्रशासनाने निर्बंधांच्या नव्या टप्प्याला चालना दिली आहे. भारत-पाक यांच्यातील युद्ध आपणच थांबवले, असा धादांत खोटा प्रचार ट्रम्प सातत्याने करत आले आहेत. तसेच, आपण सत्तेवर आल्यानंतर २४ तासांत रशिया-युक्रेन युद्ध थांबवू, असा दावाही त्यांनी निवडणुकीदरम्यान वारंवार केला. त्यामुळेच, हे युद्ध कोणत्याही प्रकारे थांबवण्यासाठी ते उतावळे झाले आहेत. रशियावर आर्थिक निर्बंध लादून झाले, विदेशातील रशियन संपत्ती गोठवली, तरी रशिया आजही युक्रेनबरोबर युद्ध करत आहे. म्हणूनच, त्याची अधिक कोंडी करण्यासाठी आता रशियन तेल कंपन्यांवर निर्बंध लादण्याचा निर्णय त्यांनी घेतला.

रशियाचे अध्यक्ष पुतीन यांच्याशी संवाद साधूनही युद्ध थांबत नाही, असे त्यांच्या लक्षात आल्यानंतर, आर्थिक बाजूवर दबाव वाढवण्याचा मार्ग स्वीकारला गेला. तेल कंपन्यांवरील निर्बंध हे या धोरणाचाच विस्तार असल्याचे म्हणता येते. ट्रम्प यांच्या निर्बंध धोरणामागे केवळ परराष्ट्रनीती नाही, तर व्यावसायिक गणितही आहे. अमेरिकेतील शेल ऑईल उद्योगाला जागतिक बाजारात स्पर्धात्मक लाभ मिळावा, हा व्यापक हेतू यामागे आहे. रशियाचे आणि 'ओपेक' या तेल उत्पादक देशांचे तेल महागले, तर अमेरिकी तेल उत्पादकांच्या निर्यातीत वाढ होते. त्याशिवाय, गुंतवणूकदारांना सुरक्षित पर्याय म्हणून अमेरिकेकडे वळवण्याची संधीही अमेरिकेला प्राप्त होते.

आज कर्जाचा मोठा डोंगर अमेरिकेवर असून, तो कसा कमी करावा, याचीच विवंचना अमेरिकेसमोर आहे. तशातच, 'शट डाऊन'ची नामुष्कीही आर्थिक महासत्ता असे बेगडी बिरुद मिरवणार्‍या अमेरिकेवर ओढवली. लाखो सरकारी कर्मचारी विनावेतन घरी बसवले गेले आहेत. म्हणजेच, रशियावरील निर्बंध हे नैतिक किंवा राजकीय नसून, अमेरिकेच्या सामर्थ्याचा उपयोग करून स्वतःची पोळी भाजून घेण्याचे साधन आहे. या सगळ्या घडामोडींमध्ये भारताची भूमिका महत्त्वाची तसेच गुंतागुंतीची ठरणार आहे. भारत रशियाकडून जवळपास ४० टक्के तेल आयात करतो. त्यातील मोठा हिस्सा 'रोझनेफ्ट' आणि 'ल्युकॉईल'कडून येतो. त्यामुळे अमेरिकेच्या निर्बंधांचा फटका भारताला बसू शकतो.

भारताची अर्थव्यवस्था झपाट्याने वाढत आहे. त्यासाठी ऊर्जेचा स्थिर आणि परवडणारा पुरवठा आवश्यक आहे. सवलतीच्या दरात मिळणारे रशियन कच्चे तेल गेल्या दोन वर्षांत भारतासाठी आर्थिक दिलासा देणारे ठरले. मात्र, आता या आयातीला अमेरिकेच्या निर्बंधांचे ग्रहण लागण्याची शयता आहे. बँका हे तेलाच्या आयातीचे व्यवहार टाळू शकतात, विमा कंपन्या जहाजांना संरक्षण देण्याचे नाकारतील आणि तेल वाहतूक मार्गांवर अडथळे उभे केले जाऊ शकतात. यापूर्वीही रशियन तेल वाहतूक करणार्‍या व्यापारी जहाजांना विमा नाकारण्याचे, तसेच सागरी सुरक्षा नाकारली गेली होती. असे असतानाही, रशियन तेलाचा भारतात होणारा प्रवाह अखंडित राहिला, हे नाकारून चालणार नाही. या संकटाकडे भारताने एक संधी म्हणूनच पाहायला हवे. तेल पुरवठा करणारे आखाती देश, पश्चिम आफ्रिका आणि दक्षिण अमेरिका यांच्यासोबत दीर्घकालीन करार वाढवणे आवश्यक बनले असून, विमा आणि वाहतूक यंत्रणा स्वतंत्र करण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत, जेणेकरून अमेरिकेच्या नियंत्रणाखालील प्रणालींवरील अवलंबित्व कमी होईल.

भारताकडे असलेले रणनीतिक तेलसाठे अत्यल्प आहेत. त्यांना वाढवून किमान ९० दिवसांचा साठा राखणे अत्यावश्यक आहे. तसेच, विविध दर्जाच्या कच्च्या तेलाचे शुद्धीकरण करण्यासाठी रिफायनरींचे तांत्रिक आधुनिकीकरण भारताला करावे लागेल. भारताने अमेरिकेला संदेश देणेही गरजेचे आहे. ऊर्जा गरज ही राष्ट्रीय सुरक्षिततेचा भाग असून, ती राजकीय दंडेलीपासून स्वतंत्र राहायला हवी. अमेरिकेने भारताच्या गरजा समजून घेतल्या पाहिजेत. भारतामुळेच जगातील ऊर्जेच्या किमती नियंत्रणात राहिल्या, हे यापूर्वी अमेरिकेने मान्य केले आहे. असे असतानाही, केवळ दुराग्रहामुळे रशियन तेलाच्या आयातीवरील (पान ४ वर)

# काश्मीर सध्या केंद्रशासितच हवे!



> **जम्मू- काश्मीरचा फुटीरतावादी इतिहास पाहता, तेथे केंद्र सरकारचे थेट शासनच हवे. त्याच आधारावर तामिळनाडू, केरळ, ईशान्येकडील काही राज्ये आणि प. बंगाल यांसारख्या राज्यांनाही केंद्रशासित प्रदेश म्हणून जाहीर केले गेलेच, त्यात गैर ते काय? जम्मू-काश्मीरला पुन्हा एकदा पूर्ण राज्याचा दर्जा मिळण्याची आशा मावळत चालली असल्याची खंत मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी व्यक्त केली. आजवर काश्मीरचे अनभिषिक्त राजे असल्याच्या थाटात त्यांचे जीवन व्यतीत झाले आहे. त्यामुळे आता हे मांडलिकत्वाचे जिणे त्यांना असह्य होत आहे. खरी मेख राज्यातील कायदा-सुव्यवस्था आणि पोलीस खाते त्यांच्या अखत्यारीत नसण्यात आहे. कारण, केंद्रशासित प्रदेशात कायदा-सुव्यवस्था केंद्र सरकारच्या हाती असते.**

आकलन
राहुल बोरगांवकर

काश्मीर हे पूर्ण राज्य असतानाच त्या राज्यात फुटीरतावाद जाणीवपूर्वक पोसण्यात आला होता. काश्मीरची समस्या निर्माण होण्यास पाकिस्तानपेक्षा त्या राज्यातील अब्दुल्ला कुटुंबीय सर्वाधिक जबाबदार आहे. त्यांनी काश्मीर हे जणू स्वतंत्र संस्थान असल्याप्रमाणे कारभार चालविला आणि त्यांना काँग्रेसच्या नेतृत्वाने समर्थन दिले. फारुख अब्दुल्ला यांच्याच कारकिर्दीत काश्मिरी पंडितांचे भीषण हत्याकांड घडले आणि त्यांना तेथून पलायन करावे लागले. आज लाल चौकात कितीही तिरंगे फडकले, तरी तेथील जनतेच्या मनातील फुटीरतेची भावना पूर्वीइतकीच कायम आहे. पहलगाममधील हत्याकांडाने त्यावर शिक्कामोर्तब केले होते. त्यामुळे पूर्ण राज्याचा दर्जा दिल्यावर सार्‍या समस्या सुटतील किंवा तेथे लोकशाही मूल्ये रुजतील, असे मानणे हा भंपकपणा आहे.

भारतातील काही प्रदेशांतील प्रादेशिक अस्मितेच्या राजकारणाचा अंगार फुंकर घालून हेतूतः पेटविला जातो. त्यामुळे तरी ही राज्ये फुटीरतेकडे वळतील, हा त्यामागील हेतू असतो. काश्मीर सध्या शांत असल्यामुळे आता लडाखी जनतेला चिथावणी देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

अलीकडे झालेला हिंसाचार हे त्याचे ताजे उदाहरण आहे. खरे तर केवळ काश्मीरच नव्हे, तर अन्य काही राज्यांनाही केंद्रशासित प्रदेश का जाहीर करु नये, अशी या राज्यांतील गंभीर परिस्थिती. त्यात तामिळनाडू, प. बंगाल, ईशान्य भारतातील काही राज्ये आणि केरळ यांचा समावेश आहे. याचे कारण तामिळनाडूतील नेत्यांनी आपल्या जनतेला पद्धतशीरपणे भारतापासून सांस्कृतिकदृष्ट्या अलग ठेवण्याचा प्रयत्न चालविला आहे. या नेत्यांनी आपले राज्य हे भारताच्या अन्य प्रांतांपेक्षा सांस्कृतिक आणि भाषिकदृष्ट्या वेगळे आहे, म्हणजे आपण स्वतंत्र देश आहोत, हे बिंबवून आपला स्वतंत्र मार्ग चोखाळण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न चालविलेला दिसतो.

अलीकडच्या काळात द्रमुकच्या नेत्यांनी सनातनवर केलेली टीका आणि काही मुखंडांनी तामिळ हे हिंदू नव्हेत, असा केलेला दावा त्यांच्यातील फुटीरतावादी मानसिकता दर्शवितो. तामिळनाडूतील याच द्रमुक पक्षाने श्रीलंकेतील 'तामिळ टायगर्स'च्या व्ही. प्रभाकरनबद्दल तामिळ जनतेत सहानुभूती निर्माण केली होती. प्रभाकरन श्रीलंकेची फाळणी करण्याचा प्रयत्न करीत होता. त्याला श्रीलंकेच्या उत्तर आणि ईशान्येकडील तामिळभाषिक प्रांतांचे वेगळे राष्ट्र बनवायचे होते. भारतातील द्रमुकचे तत्कालीन प्रमुख एम. करुणानिधी यांना या स्वतंत्र राष्ट्राला भारतातील तामिळनाडूशी जोडून एक वेगळा तामिळ देश तयार करायचा होता. त्यामुळे द्रमुकचे राजकारण हे कायमच द्रविड अस्मितेशी निगडित होते.

तामिळ भाषा जणू जगावेगळी आणि सर्वश्रेष्ठ भाषा असल्याचा दावा करणे, हे त्याचेच लक्षण. त्यामुळे तामिळनाडूतही प्रभाकरनच्या 'तामिळ टायगर्स'ना (दहशतवाद्यांना) मुक्त वाव आणि आश्रय मिळत होता. म्हणूनच राजीव गांधी यांची हत्या श्रीपेरुम्बुदूर येथे होऊ शकली, कारण तामिळ दहशतवाद्यांना तेथे उघड आश्रय दिला जात होता. धक्कादायक गोष्ट म्हणजे, काँग्रेसनेही या फुटीरतावादी मानसिकतेकडे तत्कालिक राजकीय लाभासाठी हेतूतः दुर्लक्ष केले. आजही काँग्रेसचे हेच देशद्रोही धोरण कायम आहे. म्हणूनच त्या पक्षाने एक अपवाद वगळता, नेहमी द्रमुकशीच युती केली आहे. जयललिता यांच्या अण्णाद्रमुकच्या राष्ट्रवादाची काँग्रेसला अ‍ॅलर्जी आहे.

तामिळनाडूप्रमाणेच अलीकडे प. बंगालच्या मुख्यमंत्री जयललिता यांची पावलेही प. बंगाल हे जणू काही स्वतंत्र राष्ट्र असल्याच्या दिशेने पडत आहेत. केंद्र सरकारच्या अनेक योजना त्या राज्यात लागू केल्या जात नाहीत. मग गरीब जनतेला त्या योजनांचे लाभ मिळाले नाहीत, तरी ममतांना त्याची पर्वा नाही. एकेकाळी बांगलादेशी घुसखोरांविरोधात असलेल्या ममता बॅनर्जी आता त्यांचेच नव्हे, तर रोहिंग्यांचेही समर्थन करू लागल्या आहेत. केंद्र सरकारच्या तपास पथकाला अटक करण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे.

ईशान्य भारतातील अनेक राज्यांमध्ये आता- आतापर्यंत फुटीरतावादी चळवळी आणि सशस्त्र संघर्ष सुरू होता. राजीव गांधी यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यावर पंजाब आणि आसाममधील अशा देशविरोधी पक्षांशी आणि नेत्यांशी करार केले आणि ते प्रदेश शांत झाले. आसाममध्येही बांगलादेशी घुसखोरांविरोधातील विद्यार्थी चळवळ हळूहळू फुटीरतावादाकडे झुकत चालली होती. त्यामुळे राजीव गांधी यांनी वेळीच हस्तक्षेप करून या चळवळीला निवडणुकीद्वारे सत्तेत आणले आणि तेथील असंतोष बव्हंशी शमविला. (पान ४ वर)



> **नुकतीच ताकाइची साने यांनी जपानच्या इतिहासातील पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि ताकाइची यांच्यादरम्यान भेट पार पडली. त्यानिमित्ताने अमेरिका-जपान आणि भारत-जपान संबंधांचा आढावा घेणारा हा लेख...**

# जपानच्या ताकाइचींकडून भारताच्या मोठ्या अपेक्षा

वेधक
दत्तात्रय आंबुलकर

ताकाइची साने यांनी जपानच्या इतिहासातील पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून दि. २१ ऑटोबर रोजी शपथ घेतली. त्यांनी जपानमध्ये प्रदीर्घ काळ सत्तेवर असणार्‍या लिबरल डेमोक्रॅटिक पक्षाच्या (एलडीपी) नेतृत्वासाठी त्यांनी शिगेरु इशिबा यांना आव्हान दिले होते. जपानमध्ये सत्ताधारी पक्षाचा अध्यक्ष पंतप्रधान होत असल्याने अध्यक्षपदाच्या निवडणुकीत पराभव झाल्यास पंतप्रधानांना राजीनामा द्यावा लागतो. शिंझो आबे यांनी प्रकृतीच्या कारणास्तव पंतप्रधानपदाचा राजीनामा दिल्यानंतर दि. १६ सप्टेंबर २०२० रोजी योशिहिदे सुगा यांनी पंतप्रधानपद स्वीकारले; पण अवघ्या वर्षभरात त्यांना राजीनामा द्यावा लागला. ऑटोबर २०२१ मध्ये फुमिओ किशिदा पंतप्रधान झाले. त्यांची कारकीर्द अवघी तीन वर्षे होती.

दि. १ ऑटोबर २०२४ रोजी शिगेरु इशिबा पंतप्रधान झाले. डोनाल्ड ट्रम्प अमेरिकेचे अध्यक्ष झाल्यावर त्यांनी पूर्व अशियातील अमेरिकेच्या सर्वांत जवळचा देश असलेल्या जपानवर २४ टक्के आयातकर लावला. इशिबा सरकारने ट्रम्प यांच्या प्रशासनासोबत वाटाघाटी करून हा कर १५ टक्क्यांवर आणला. जपानच्या कंपन्या अमेरिकेत ५५० अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करतील, असे आश्वासन देऊन अमेरिकेच्या वाहनांचे सुटे भाग आणि कृषी उत्पादने बनवण्यार्‍या कंपन्यांना जपानी बाजारपेठेचा अधिक मोठा हिस्सा देण्याचेही आश्वासन देण्यात आले. जपानने अमेरिकेपुढे शरणागती पत्करली, या भावनेतून जपानमध्ये संतापाची तीव्र लाट उसळली. 'एलडीपी'मध्ये अनेक गट-तट असून ते एकमेकांविरुद्ध कुरघोडीचे राजकारण करीत असतात. ही संधी साधून ताकाइची यांनी इशिबांना आव्हान दिले. पक्षाच्या नेतृत्वाची माळ गळ्यात पडल्यावर ताकाइचींकडे पंतप्रधानपदही आले.

जपानच्या राजकारणातही भारताप्रमाणे घराणेशाहीचा प्रभाव आहे. शिंझो आबेंच्या आईचे वडील दुसर्‍या महायुद्धादरम्यान जपानचे पंतप्रधान होते, तर त्यांचे वडील जपानचे परराष्ट्रमंत्री होते. शिगेरु इशिबांचे वडील जपानचे गृहमंत्री होते. किशिदा यांचे वडील आणि आजोबा दोघेही जपानच्या संसदेचे सदस्य होते. त्या तुलनेत ताकाइची यांच्या कुटुंबातील कोणीही राजकारणात नाही. त्यांचे वडील पोलीस अधिकारी होते. वयाच्या ३६व्या वर्षी ताकाइची यांनी राजकारणात प्रवेश केला. त्या शिंझो आबेंच्या मार्गदर्शनाखाली राजकारणात पुढे आल्या. त्या आर्थिकदृष्ट्या उजव्या विचारसरणीच्या असून, त्यांच्यावर ब्रिटनच्या पहिल्या महिला पंतप्रधान मार्गारेट थॅचर यांचा प्रभाव आहे.

मोटर सायकल चालवणे आणि हेवी मेटल बॅण्डमध्ये ड्रम वाजवणे, हे त्यांचे छंद असून राष्ट्रवाद जागृत ठेवण्यासाठी जपानच्या इतिहासाचे पुनर्लेखन करायला हवे, असे त्यांचे मत आहे. (पान ४ वर)

# भारतीय अर्थविचारातील शाश्वत तत्त्वे

**काळ प्रवाही आहे. एका काळातील सर्वच विचार नव्या काळात आहेत तसेच लागू पडत नाहीत. असे असले तरीही ते विचार नव्या काळात सर्वार्थाने त्याज्य मानण्याची गरज नाही. त्या विचारांमधील अनेक तत्त्वे ही काळाच्या कसोटीवर टिकणारी असतात. हिंदू धर्माच्या अर्थविचारातील अनेक तत्त्वे आजच्या काळात देखील मार्गदर्शक आहेत. अशा तत्त्वांचा घेतलेला आढावा...**


विशेष
डॉ. हर्षल भडकमकर

उपयुक्ततावादाच्या नैतिक पायावर आणि तर्कप्रधानतेच्या गणिती आधारावर उभ्या असलेल्या युरोपीय जडवादी अर्थचिंतनातील गुणदोष पाहिल्यानंतर, भिन्न प्रकारचे आर्थिक सिद्धांतन उभे करण्यासाठी अर्थायामाच्या मूळ नीतीतत्त्वांची चर्चा आवश्यक आहे. परंतु, केवळ कौटिल्यादी प्राचीन ग्रंथांकडे पाहिल्यास, आजच्या युगास अनुकूल अशा प्रकारचे चिंतन त्यातून निर्माण करणे हे अवघड कार्य आहे.

आजच्या काळातील अर्थकारणाची दिशा आणि त्याविषयीचे आकलन प्राचीन काळापेक्षा कित्येकपट व्यामिश्र झाले असून, विशेषतः औद्योगिक क्रांतीनंतर बदललेले पुरवठ्याचे अर्थशास्त्र आणि अर्धधातुके आणि संगणक क्षेत्रातील क्रांतीनंतर बदललेले सेवा क्षेत्रांचे महत्त्व या सर्वांचा विचार प्राचीन भारतीय चिंतनातून थेट सापडणे शयच नाही. त्यामुळे भारतीय चिंतनातील शाश्वत तत्त्वे कोणती आणि त्यांची युगानुकूल मांडणी कशाप्रकारे करावी, याचा विचार अपरिहार्य आहे.

निर्वसाहतीकरणाच्या दृष्टिकोनातून पाहत प्राचीन भारतीय चिंतनाचे नवीन आकलन करताना, आपण पाश्चात्य चौकटीतूनच विचार करत नाही ना, याचेही भान सदैव ठेवणे आवश्यक आहे, अन्यथा पाश्चात्य विमर्शासच अनुकूल मते कशी प्राचीन भारतीय ग्रंथांत सापडतात या प्रकारचे चिंतन निर्माण होऊन, त्यातून कुठलेही नवीन विचारप्रवाह निर्माण न होणे या गर्तेत आपण अडकू शकतो. या दोन्ही अडचणींचे भान ठेवत, भारतीय अर्थचिंतनातील काही शाश्वत तत्त्वांचा विचार आज आपण करू. कुठल्याही तत्त्वविचाराविषयी मांडणी करताना त्या एकाच विषयाची मांडणी करणे, असा एकशाखीय विचार मुळात हिंदू प्रकृतीशी विसंगत आहे. त्याच आधारे अर्थविचारातील चिंतन असा स्वतंत्र विचार भारतीय चिंतनावकाशात न घडता, आपण त्याला पुरुषार्थ चतुष्ट्याच्या चिंतनात स्थान देतो. धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे भारतीय चिंतनातील पुरुषार्थ चतुष्टय सर्वश्रुत आहेत.

मानवी जीवनात या चारही पुरुषार्थांचे पालन करावयाचे असल्याचा आदर्श हिंदू संस्कृती मानते. आजच्या अर्थशास्त्राच्या विचारात यातील अर्थ आणि काम पुरुषार्थांचे सुयोग्य संवहन करण्याविषयीचे चिंतन अंतर्भूत होते आणि त्यालाच ढोबळमानाने आजच्या परिभाषेत, अनुक्रमे पुरवठ्याच्या बाजूचे आणि मागणीच्या बाजूचे अर्थशास्त्र असे म्हटले जाते. धर्माचे चिंतन आजच्या अर्थशास्त्रात नीतितत्त्वांच्या पायातून होते. नीतीच्या आधारे काम आणि कामाच्या पूर्तीसाठी अर्थ, ही भारतीय चिंतनातीलच क्रमवारी




आजही पाळली जाते. पण, प्रत्येक टप्प्यावरील नीतिनियमांच्या आणि पुरुषार्थाच्या प्राप्तीविषयीच्या कल्पना वेगळ्या आहेत.

मोक्षाचा विचार तर संपूर्ण भारतीय विचार आहेच; पण त्याला समांतर असा जगदंताचा सिद्धांत युरोपीय विचारप्रणालीत सांगितला गेला आहे. या सर्व समांतर संकल्पना आणि त्यांच्यातील भेदांचे आकलन, भारतीय अर्थचिंतनविषयक नवीन विचार मांडण्यास आवश्यक आहे.

'मागणी तसा पुरवठा' या आधुनिक म्हणीतसुद्धा सांगितल्याप्रमाणे अर्थचिंतनात मागणीच्या बाजूचे अर्थशास्त्र म्हणजेच, हिंदू मांडणीनुसार कामविचार हा महत्त्वाचा आणि प्राथमिकतेने चिंतनाच्या स्पष्टीकरणाचा विषय आहे. काम किंवा कामना म्हणजे, मनुष्यांना असणार्‍या विविध भोगांविषयीच्या इच्छा. आहार, निद्रा, भय आणि मैथुन, या पशु आणि मानव यांच्यातील समान कामना असल्याचे सांगितले जाते. परंतु, मानवी कामेच्छा या साध्या शरीर भोगांशी संपत नाहीत.

मानवांना सतत अधिकच्या भोगांची तृष्णा असते. ही तृष्णा जीवाच्या मायेशी असणार्‍या बंधाचे कारण आहे, ती सर्व दुःखाचे मूळ आहे अशा प्रकारचे चिंतन, सर्वच भारतीय दर्शनांतून सांगितलेले आहे. त्यागपूर्वक भोगाचे उपनिषदांचे कथन सुप्रसिद्ध आहेच पण, त्याचबरोबर हीच भोगतृष्णा प्रगतीचे मूळ असल्याचेही आपल्याला दिसते.

साधेपणाच्या प्राचीन जीवनातून पुढे येऊन मानवी समाजाची जी प्रचंड प्रगती झालेली आपण पाहतो, अनुभवतो आणि रोजच्या जीवनात भोगतो त्या सर्व चक्राची सुरुवात न भागणार्‍या सुखाच्या तृष्णेनेच होते. या विरोधाभासाची संगती लावायची असेल तर हे तर लक्षात घ्यायला हवे की, आपल्या संस्कृतीत काम पुरुषार्थाचे नियमन दमनपूर्वक नाही, तर धर्मपूर्वक करायला सांगितले आहे. कामाचे संपूर्ण दमन करणे हा संन्याशांचा आदर्श असू शकतो; पण सर्व आश्रमांतील श्रेष्ठ सांगितल्या गेलेल्या गृहस्थाश्रमात, धर्मपूर्वक काम पुरुषार्थाचे पालन करणे अपेक्षित आहे.

भारतीय चिंतन हे प्रगतीच्या अवरुद्ध नाही, तर धर्मसंमत प्रगतीचा पुरस्कार करणारे आहे. धर्मपूर्वक कामसिद्धीसाठी आपल्याकडे 'दोहन संकल्पना' सांगितली जाते. ज्याप्रकारे गायीला कोणताही त्रास होऊ न देता, तिच्या पोषणाचा योग्य विचार करूनच तिचे दोहन केले जाते आणि दूध प्राप्त केले जाते. त्याचप्रकारे सर्व नैसर्गिक संसाधने, मानवी भांडवल आणि धरतीच्या पोटातील खनिज द्रव्ये याचे अमर्याद शोषण न करता, दोहन विचाराने भोग घेतल्यास धर्माच्या आधारे काम साधतो असे म्हणता येईल. संसाधनांचे शोषण होऊ न देता उपभोग घ्यावयाचा असेल, तर स्वाभाविकपणे उत्पादन प्रक्रियेवर काही विशिष्ट बंधने निर्माण होतात.

मागणीच्या बाजूचे अर्थशास्त्र नियंत्रित केल्यावर, पुरवठ्याच्या बाजूला जे स्वाभाविक नियंत्रण निर्माण होईल ते इथे अभिप्रेत नाही.

पुन्हा तर्कप्राधान्याचा आधार घेऊन गणिती पद्धतीने आणि राजदंडाच्या साहाय्याने (विविध कर आणि शुल्के बसवून) जर पुरवठ्याच्या अर्थशास्त्राचे नियमन केले, तर स्वाभाविक मानवी सृजनशीलतेला मर्यादा येतात. अशाप्रकारच्या नियमनातून, अर्थचक्राला संशोधनात्मक कार्यातून मिळणारी प्रगती खुंटते. अर्थ पुरुषार्थाचे नियमन, धर्माच्या आधारे करण्याचे नेमके आकलन या दुविधेतून मुक्त होण्यास आवश्यक आहे. व्यक्तिगत अर्थसाधना आणि सामाजिक अर्थसाधना यांच्या मेळाचा विचार केल्यास, त्यातील धर्मविचार स्पष्ट होऊ शकतो.

कोणत्याही व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व हे त्या व्यक्तीची अंगभूत कौशल्ये, बुद्धीचा आवाका आणि मानसिक जाणिवेची खोली या तिन्हीमधून तर बनतेच; पण त्याहीपलीकडे आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या मुळाशी आत्मतत्त्वाचा गाभा असतो, असे हिंदू जीवनदृष्टी मानते. अर्थाच्या पूर्तीसाठी शरीर, मन आणि बुद्धी या तिन्ही पातळ्यांवरचा पुरुषार्थ साधला जायला हवा.

जीवनाच्या व्यवहारात आपण केवळ एकांगी दृष्टी आचरून, तिन्हीमधील ज्या आयामाच्या आचरणाने अधिकाधिक अर्थप्राप्ती होईल केवळ त्याच आयामातून पुरुषार्थ साधण्याचा प्रयत्न करतो. अशा प्रकारच्या पुरुषार्थ सिद्धीतून संपूर्ण वैयक्तिक समाधान मिळत नाही, हा कित्येकांचा अनुभव आहे. परंतु, याच एकांगी उत्कर्ष साधण्याच्या प्रयत्नातून ज्या सामाजिक व्यवस्थेचा पुरस्कार केला जातो, त्यात सर्वांगीण अर्थ साधण्याच्या वृत्तीस गौण स्थान मिळून, समाजाच्याच अर्थ पुरुषार्थाचा लोप होण्याची स्थिती निर्माण होते.

धर्मानुकूल अर्थाचरण न होण्याच्या दोन अवस्थांचे वर्णन, दीनदयाळ हे अर्थाचा प्रभाव आणि अर्थाचा अभाव असे करतात. पहिल्या स्थितीत अर्थ प्रबळ होऊन तो धर्माचा लोप घडवतो. अशा अवस्थेत काम-पुरुषार्थाचा अतिरेक होऊन, शोषणाधारित व्यवस्था निर्माण होतात. अर्थाचा प्रभाव जिथे निर्माण होतो, तिथे अन्य व्यक्तींच्या अभिव्यक्तीचा संकोच होऊन त्यांच्या अर्थ-पुरुषार्थाची यथार्थ परिपूर्ती होण्यास आवश्यक अवकाशाचा लोप होतो. याउलट अर्थाचा अभाव निर्माण झाल्यास स्वतः त्या व्यक्तीसच स्वतःचा अर्थ-पुरुषार्थ साधणे दुष्प्राप्य होऊन, त्यातून त्या व्यक्तीच्या काम-पुरुषार्थाचाही लोप होतो. अशा परिस्थितीतून आत्यंतिक चक्रीय दारिद्र्य किंवा गुन्हेगारी प्रवृत्ती निर्माण होण्याचा धोकाही संभवतो.

दोन्ही परिस्थितींचा समाजात प्रादुर्भाव झाल्यास, समाजात एक प्रकारची दुफळी माजून संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. भांडवलशाही आणि समाजवाद या दोन्ही व्यवस्था, अशा प्रकारच्या दुभंग समाजस्थितीस प्रगतीची पूर्वस्थिती मानतात.

नित्य संघर्षातून कार्यक्षमतेचे नवनवीन उच्चांक गाठले जात असल्याचे भांडवलशाही मानते, तर साम्यवादाला त्याच संघर्षातून कष्टकरी जनतेचे साम्यवादी राज्य स्थापन होण्याची बीजे दिसतात. भारतीय चिंतनानुसार मात्र या दोन्ही स्थिती, अर्थ-पुरुषार्थांचे संवहन धर्माच्या आधारे होत नसल्याच्या निदर्शक आहेत. अर्थ-काम पुरुषार्थांसाठी धर्माच्या आधाराचे भारतीय तत्त्व जसे सामाजिक स्थिरता प्रदान करण्यास आवश्यक आहे, तसेच वैयक्तिक सौख्याच्या प्राप्तीसाठी मोक्ष संकल्पनेद्वारा होणारे नियमनही संकल्पनात्मक स्पष्टतेसाठी आवश्यक आहे. अब्राहमिक रिलिजनमधील जगदंताचा सिद्धांत भोगमय पारलौकिक जीवनाचा आदर्श सांगतो. अपरिमित कामेच्छांची पूर्ती होणार्‍या परलोकाची संकल्पना आणि शरीर टिकवून जगदंतापर्यंत वाट पाहण्याचा मार्ग हा इहलोकातसुद्धा अपरिमित भोगांची कल्पना करतो, यात नवल नाही.

परलोकाची भारतीय संकल्पना ही देहविहीन अवस्थेत, केवळ शुद्ध आत्मरूपाने परमेश्वराचे सामीप्य मिळवण्यापासून त्याच्याशी सायुज्य प्राप्त करण्यापर्यंत आहे. इंद्रियविहीन अवस्थेत इंद्रियभोगांचे स्थानच उरत नाही. त्याच निर्गुण अवस्थेचे इहलोकातील प्रकटीकरण, निष्काम कर्मातून होते. भारतीय अर्थविचाराची भिन्नता पाहताना, मानवी जीवनाच्या इतिकर्तव्यतेचा भिन्न विचार आणि त्याचा अर्थ-काम पुरुषार्थांच्या आकलनावरील प्रभाव समजून घेणेही महत्त्वाचे आहे.

अर्थविषयातील धर्माधारित भारतीय चिंतन आणि जडवादी पाश्चात्य चिंतन यांचा तौलनिक विचार केल्यास हे स्पष्ट आहे की, शाश्वत स्वरूपाचे अर्थचिंतन केवळ भारतीय विचारांच्या अवलंबनातूनच शय आहे. धर्माचे कार्यच समाजाची धारणा करणे हे असल्याने, धर्माधारित अर्थचिंतन हेच मानवी प्रगतीसाठी आवश्यक शाश्वत तत्त्वांचे प्रतिपादन करू शकेल, हे सुस्पष्ट आहे. परंतु, पाश्चात्य चिंतनातील गणिताधारित विश्लेषण पद्धतीचा अर्थविषयक प्रत्यक्ष धोरणे ठरवण्यातील उपयोग अनन्यसाधारण आहे.


भारतीय गुणात्मक विश्लेषण पद्धतीला योग्य प्रकारे संख्यात्मक विश्लेषणाची जोड दिल्यासच, भारतीय अर्थचिंतन एका भक्कम पायावर उभे राहू शकेल. पाश्चात्य गणिती पद्धतीआधारे आणि भारतीय धर्मनियमित अर्थ-कामाचा तत्त्वविचार ध्यानात घेऊन, शाश्वत विकासासाठी आवश्यक असे एक अर्थचिंतन उभे करणे, हीच आजची गरज आहे.

(लेखकाने मुंबईतील 'टीआयएफआर' येथून खगोलशास्त्रात 'पीएच.डी.' प्राप्त केली आहे.)

# न गायलेला सूर

सुरवात्म
डॉ. अविनाश मोहरील

काही वर्षांपूर्वीचा प्रसंग. अमरावतीला एक गाण्याची मैफल सुरू होती. जवळपास संपूर्ण आयुष्य संगीताच्या सेवेमध्ये अर्पण केलेले दोन बुजुर्ग गायक त्यांच्या संगीत साधनेचे अत्यंत प्रभावी सादरीकरण करीत होते. गाणे म्हणजे आमची साधना आहे व त्या साधनेचा आविष्कार आज आम्ही अंबामातेच्या चरणी अर्पण करतोय, असे सुरुवातीलाच त्यांनी सांगितले होते. त्या दोन साधकांची नावे म्हणजे प्रख्यात शास्त्रीय संगीत गायक, पं. राजन व पं. साजन मिश्र. साधारणपणे वाद्य संगीतात गायला जाणारा राग झिंझोटी त्यांनी गायला घेतला. गायन सादर करताना ते केवळ सादर करायचे नाही तर ऐकणार्‍या प्रत्येकाला त्या गायनाच्या संगीत लहरींमध्ये सामावून घ्यायचे आणि सुरांचा आनंद द्यायचा ही त्यांच्या गायनाची हातोटी. रागाची सुरावट सुरू झाली. विलंबित बंदिशीद्वारे रागविस्तार करून त्या रागाचे संपूर्ण स्वरूप दाखविणे सुरू झाले. सभागृहात बसलेल्या काही मंडळींना त्या स्वरांचे ज्ञान होते व त्यामुळे त्यांना आनंद होणे स्वाभाविकच होते. परंतु केवळ शुद्ध संगीत आवडते म्हणून गाणे ऐकणार्‍या माझ्यासारख्या अनेकांना त्या सुरावटीने गुंगवून टाकले होते. त्या रागातील सुरांची एक एक रचना सादर करत सुरांची सुरेल इमारत उभी होऊ लागली होती. षड्जापर्यंत पोहोचत असताना वेगवेगळ्या मार्गांवरून सुरावट जात होती. हे सारे सुरू असताना त्यांनी दोन-तीन वेळा एक विलक्षण गोष्ट केली.



खरे, तर अनेक शास्त्रीय गायकांच्या विविध पद्धती असतात. सांगीतिक घराण्यांनुसार त्या बदलत जातात. त्या दिवशीच्या पं. राजन व पं. साजन मिश्र यांच्या मैफलीमध्ये तो एक अद्भुत प्रकार ज्यांना संगीत फारसे कळत नाही व केवळ सुरांवरील प्रेमापोटी संगीत ऐकले जाते अशा प्रत्येकाला अनुभवायला मिळाला. तो प्रकार इतका सुरेल व अद्वितीय होता की, आजही त्या गाण्याचा आनंद मनात उत्पन्न होतो तेव्हा त्यांच्या संपूर्ण गाण्याची आठवण येतेच; परंतु त्या एका अप्रतिम गोष्टीची जास्त आठवण येते. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी ती गोष्ट गायलीच नाही. साधारण दोन तासपर्यंत त्यांनी जे अद्भुत गायन केले ते तर स्मरणात आहेच; ते जे गायले नाही ते जास्त स्मरणात आहे. तो म्हणजे त्यांनी न गायलेला तो एक सूर. गाणे संपल्यावर मनापासून लाभलेली तृप्ती जेव्हा शांतपणे मी परत एकदा अनुभवत होतो तेव्हा तो सूरच डोक्यात येत होता जो त्या श्रेष्ठ गायकांनी गायलाच नाही. एक विलक्षण अनुभूती होती तो सूर. संगीत मनापासून आवडत असल्याची एक पावतीच होती तो सूर. रोजच्या कार्यप्रक्रियेमधील व कार्यव्यस्ततेमधील वेगवेगळ्या गोष्टी संपूर्णपणे विसरून त्या ज्येष्ठ गायकांच्या संगीत साधनेमध्ये समरस होता येण्याचा आनंद होता तो सूर. गाण्याच्या आनंदासोबतच आपल्या मनातील सांगीतिक संवेदना जागृत असल्याचा पुरावाच होता तो सूर. संगीत हे माणसाला त्याच्या अवतीभोवतीचे विश्व विसरायला लावून एका अनोख्या विश्वात नेऊ शकते जेथे केवळ पावित्र्याने भारलेले क्षण आपल्या मनाला सक्षम बनवू शकतात या तत्त्वाची थेट प्रचीती होती तो सूर. व्यक्त होणे ही माणसा माणसातील संवादाची एक अत्यंत महत्त्वाची गरज असली, तरी मानसिक पातळीवर व्यक्त होणार्‍या भावनांपेक्षा अव्यक्ताची ताकद कितीतरी जास्त असते, हे आपल्याला पटवून देणारा विश्वास होता तो सूर.

माणसांच्या या आपल्या जगात दृश्य स्वरूपात अनेक बाबी आपल्याला आनंद देत असतील किंवा आपल्याला त्यांच्या सौंदर्याने खिळवून ठेवत असतील, परंतु या दृश्य जगाच्याही पलीकडे आपल्या मनाच्या अंतःस्थ स्वरूपात असे काहीतरी विलक्षण आहे ज्याचा आनंद शब्दांमध्ये मांडता येत नाही, त्या सौंदर्यस्वरूपाचे प्रतीक होता तो सूर. ते विलक्षण काहीतरी त्या संगीत साधकांनी त्यांच्या त्या एका अद्भुत कृतीने लख्ख उजळून दाखविले आणि तोच सर्वात महत्त्वाचा भाग असतो. आपल्या मनात ती विलक्षण गोष्ट असताना ती कुणीतरी अशी उजळून दाखविली की, मग 'अवघा रंग एक झाला'ची स्थिती होते. त्या मैफलीमध्ये माझ्यासोबत जवळपास सर्वांच्याच मनाची तशी स्थिती बनविणारा विस्मयकारी चमत्कार होता तो न गायलेला सूर. कसा होता तो सूर? झिंझोटी रागाची सुरावट षड्जाच्या जवळपास रेंगाळत होती. अलगद त्याला स्पर्श करीत त्याचे दर्शन घडवत होती. सा रे म प च्या पुढे धैवतापर्यंत स्वर जाऊन पुन्हा प म ग रे ग सा असे परत समेवर येत होते. मनामध्ये त्या सुरांची लयकारी जागविली जात होती. आता षड्ज लागणार असा आभास होतानाच पुन्हा सुरावट अवरोह घेऊन येऊन समेवर पोहोचायची. पुन्हा सुरांची इमारत बांधणे सुरू व्हायचे. कधी कधी तर षड्जाच्या वरचा सूरदेखील लावला जायचा, परंतु त्या षड्जाच्या नेमक्या सुराला टाळून तो कोणता सूर असावा याची मनामध्ये पूर्वतयारी त्यांनी करून दिली. सर्व श्रोते तो षड्ज लागण्याची आतुरतेने वाट बघत होते आणि मग चांगला श्वास भरून पुन्हा एकदा स्वर वरपर्यंत पोहोचले.

सुरावटीच्या अंदाजावरून लक्षात आले की, आता ही सुरांची रचना षड्जावर स्थिरावणार आणि तसेच झाले. धैवत लावून त्यांनी षड्ज लावला; पण हे काय झाले? कुणाला काही कळायच्या आत तो विलक्षण प्रकार घडला. त्यांनी तो षड्ज लावला पण गायलाच नाही. तो सूर तसाच सोडून दिला व त्याक्षणी तो सूर त्या सांगीतिक सुरावटीसोबत मनातून जोडल्या गेलेल्या प्रत्येकाच्या मनात तो षड्ज आपोआप उमटला. मनातून तो लख्खपणे दिसला, ठळकपणे जाणवला व त्याक्षणी झालेला तो साक्षात्कार अक्षरशः रोमांच उभे करून गेला. षड्ज प्रत्यक्ष ऐकविण्यापेक्षा त्यांनी तो प्रत्येकाच्या मनात निर्माण करून प्रत्येकाला अनुभवायला लावला.


(पान ६ वर)

# नराचा नारायण

संस्कारांच्या देशा
रमा गोळवलकर

जगाच्या पाठीवर सध्या अस्तित्वात असलेला प्राचीनतम असा भारताच्या भूमीवर रुजलेला आणि सुफलित झालेला सनातन धर्म! काळाच्या ओघात त्यात निर्माण झालेल्या विकृतींचा निचरा करण्याची, कालानुरूप परिवर्तन करीत उत्क्रांत होण्याची, उन्नत होण्याची पूर्ण मुभा असलेला; म्हणूनच सनातनी असल्याचा सार्थ अभिमान बाळगायला हवा. ही पृत्त्वी ज्या विश्वात आहे त्यातल्या यच्चयावत सर्वांचा एकमेकांशी अलौकिक असा संबंध आहे. त्यात असलेल्या सर्व चर आणि अचरांविषयी आदरयुक्त प्रेम मनात बाळगायला हवं, ही मूळ शिकवण धारण करणारा धर्म.

या प्रदीर्घ काळात शेतीचा शोध लागल्यानंतर कृषिप्रधान समाज व्यवस्था प्रस्थापित झाली. शेतीशी संलग्न असलेली विविध कौशल्यावर आधारित अर्थव्यवस्था आणि त्यावर विकसित झाली सनातन भारतीय संस्कृती. आचार-विचार आहार- विहारांची ही वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था निर्माण होण्यात भूगोल आणि वातावरणाची लक्षणीय भूमिका तर आहे. अनेक परकीय आक्रमकांनी या राष्ट्राच्या सामाजिक तान्याबान्याच्या चिंधड्या करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यात काही अतिशय मौल्यवान विचार नष्ट झालेत. काही प्रमाणात त्यात अशुद्धताही आली. कधी मानवी मूल्यांचा र्‍हासही झाला. काही मानवी मूल्य कशीबशी तग धरून राहिली.



दशावतार मंदिर देवगढ, ललितपूर उत्तर प्रदेश इ.स. पाचव्या शतकात कोरलेले नर आणि नारायण

काळाच्या प्रवाहानुसार आलेले अनेकानेक चढ-उतार पचवून सनातन धर्म संस्कृती निरंतर, नित्य आणि निखळ आहे. या सगळ्यात जे विचारधन आपल्या प्राचीन विचारवंत विद्वान प्रज्ञावंतांनी आपल्याला सोपवलं आहे, त्यांचंही अतिशय मोलाचं योगदान आहे. आपल्या राष्ट्रात होऊन गेलेल्या आचार्यांनी वेदांत ग्रंथ आणि त्यावरच्या विविध टीका लिहून आपल्या मन आणि बुद्धीवर अनंत उपकार केले आहेत. श्रीकृष्णासारख्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वानं ऐन युद्धभूमीवर भगवद्गीता प्रसवली. त्यात कर्म करण्यावर भर देण्याचा, पण त्याच्या फळावर अधिकार न सांगण्याची शिकवण दिली. त्याचीच पुढची पायरी म्हणजे अद्वैत, विशिष्टाद्वैत, द्वैत, द्वैताद्वैत, श्वेताद्वैत इत्यादींसारखे अद्भुत सिद्धांत मांडले गेले. यात आत्मा आणि परमात्मा किंवा जीव आणि शिव यासारख्या संकल्पनांचा सांगोपांग ऊहापोह करण्यात आला. यावर अनेक प्रबुद्ध व्यक्तींनी अधिक प्रकाश टाकून सगळा ज्ञानमार्गच उजळून टाकला. या सगळ्यांचा उल्लेख इथे आवर्जून करण्याचं मुख्य कारण म्हणजे या सगळ्या विचारांचं सार म्हणून एक लोकोक्ती किंवा म्हण संस्कार म्हणून आपल्याला सोपवण्यात आलेली आहे. 'नर जो करनी करे तो नारायण बन जाए.' म्हणजे सर्वसामान्य नरापासून परमोच्च नारायणापर्यंतचा उत्क्रांतीचा प्रवास करण्याची मोकळीक या सनातन धर्मात आहे. अधिक निष्पक्ष आणि परखडपणे मांडणी करायची झाली तर कर्मसिद्धांत मांडण्यात आला ती सनातन संस्कृती 'अहं ब्रह्मास्मि' अर्थात 'मी ब्रह्म आहे.' म्हणतेच. शिवाय लगेचच 'तत्त्वमसि!' 'तत् (तेच) + त्वम् (तूही) + असि (आहेस)' असंही प्रतिपादित करते. त्यामुळे 'ब्रह्म'चा अंश जसा माझ्यात आहे तसाच तो तुझ्यातही आहे. त्यामुळे आपल्या दोघांतही देवत्व प्रकट होण्याच्या सर्व संधी आणि शक्यता सामावलेल्या आहेत. हे देवत्व प्रकट व्हायला हवं असेल तर आपलं निहित कर्म निरपेक्ष भावनेनं करणं अपेक्षित आहे. थोडक्यात सनातनी परंपरेत आपापली कर्तव्यं निरिच्छपणे पूर्ण करणारी/रामनुष्य देवत्वाला पोहोचू शकतो. इतकंच नव्हे, तर आपल्या आसपासच्या इतरांनाही तिथवर जाण्याची प्रेरणा देऊ शकतो. त्यासाठी चिंतन, आचरण आणि साधन शुचिता महत्त्वाची मानलेली आहे. यातूनच मुक्तीच्या मार्गावरचे सुरुवातीचे तीन टप्पे सलोकता, समीपता आणि सरूपता गाठता येतात. चौथा टप्पा म्हणजे परमेश्वराच्या दिव्यत्वात विलीन होणं म्हणजे सायुज्यता. यात भगवंत भक्ताला स्वतःमध्ये सामावून घेतो, संपादून घेतो, विलीन करवून घेतो. ही भारतीयांची वैचारिक प्रगल्भता आणि समृद्धी आहे. याउलट प्रेषित अब्राहमांचे वंशज म्हणवणारे दोन रिलिजन्स आणि एक मजहब यात मात्र त्यांच्या यहोवा, गॉड किंवा अल्लाहच्या समकक्ष, बरोबरीचं, त्याच्या सोबत किंवा त्याच्यात सामावलेलं असं कोणीच किंवा कोणीही अमान्यच आहे. या तीनही विचारधारेत तो 'ईश्वरनिंदा' अर्थात 'ब्लासफेमी' हा अक्षम्य गुन्हा आहे. अरबी भाषेत अल्लाहच्या सोबत अन्य कोणाला मानणं म्हणजे शिर्क करणं म्हणतात. त्याची शिक्षा म्हणजे थेट मृत्युदंडच आहे. अल्लाह आणि त्याचे बंदे या दोन पूर्णतः वेगळ्या पातळ्यांवर असलेली अस्तित्व आहेत. ते कधीही एकमेकांशी एकरूप होऊ शकत नाहीत, यावर त्या सगळ्यांचा ठाम विश्वास आहे. पण सनातनी विचारसरणीत 'ईशनिंदा' नावाचं कोणतंही पातक किंवा कोणताही अपराध नाही. कारण इथे मानवी जीवनाचं अंतिम ध्येयच ईश्वरात विरघळून जाणं आहे. नराचा नारायण होण्यात माणसाच्या अंगी सर्वप्रकारचे सद्गुण, कौशल्य आणि सदाचार प्रकट होणं अपेक्षित आहे. त्यामुळे सनातनी विचारधारेत नर आणि नारायण असं युग्मच प्रस्तुत करण्यात आलं आहे. नराचा नारायण कसा होतो? तर, त्याचं रहस्य भगवंताच्याच मुखातून भगवद्गीतेच्या १० व्या अध्यायात उकललेलं आहे. या अध्यायात या विश्वात असलेल्या चर अस्तित्व आणि अचर वस्तूंत जे जे काही सर्वश्रेष्ठ आहे ते ते मी आहे, असं प्रतिपादित करण्यात आलेलं आहे. **'होण्यास नराचा नारायण । जे रहस्य आहे कारण । उदात्ताचे सतत वरण । अहर्निश ध्यास उत्तमाचा ।।'**

(पान ६ वर)

# 'माणूस' भेटतो तेव्हा...

उगवतीचे रंग
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



परवाच्या दिवशी मला स्वप्नात एक माणूस भेटला. काय? विश्वास नाही बसत? अहो, खरंच सांगतोय! मी त्याला म्हटलं सुद्धा की तू कोण आहेस? म्हणाला, नाही ओळखलंस ना मला? अरे, मी माणूस आहे माणूस! मी जरा हसलोच. म्हटलं जरा वेडाच दिसतो. मग त्याला म्हटलं, अच्छा, तू माणूस आहेस होय? मला वाटलं की अजून कोणी वेगळा प्राणी! तो जरा हसला आणि म्हणाला, माणूसच आहे मी. चक्क माणूस. नीट बघ माझ्याकडे.

मी हसलो. म्हणालो, त्यात काय बघायचं? अरे, भल्या माणसा, चार माणसांसारखाच माणूस तू! वेगळं काय आहे तुझ्यात? दोन हात, दोन पाय, डोकं, डोळे.. सगळं सगळं तर माणसासारखंच तर आहे. आणि मी पण तुझ्यासारखा माणूसच आहे ना! तो पुन्हा हसला. म्हणाला, तू आणि माणूस ? तोंड बघा नुसतं!

आता माझी तर पूर्ण खात्रीच झाली की याचं जरा फिरलेलंच दिसतं. पण आता काही इलाज नाही. गाठ पडलीच आहे तर बोलावंच लागणार. मी म्हटलं, अरे असं काय बोलतोस? काय कमी आहे माझ्यात? मी पण तुझ्यासारखा माणूसच आहे. हां, आता तुझ्या चेहऱ्यावरील तेज जरा जास्त आहे एवढंच. तो पुन्हा हसून म्हणाला, अरे, नुसते दोन हात पाय, डोकं वगैरे असलं तरी माणूस होत नाही. तो प्राणी फक्त दिसतो माणसासारखा. पण तुला सांगू का? तसा दिसणारा हा माणूस धड माणूसही नाही आणि धड प्राणीही!

मला कळेना की याला नेमकं काय म्हणायचं आहे! त्याला म्हटलं, हे बघ गड्या, असं भलतंसलत काही बोलू नकोस. तुझ्यात आणि माझ्यात काही फरक नाही. अरे दोस्ता, माणूस म्हणजे बुद्धिमान, प्रगत प्राणी. बघ आम्ही केवढी प्रगती केली! खूप नवनवीन शोध लावले. चंद्रावर, मंगळावर जाऊन पोहोचलो. आता आमची बहुतेक सगळी कामे यंत्राने होतात. यंत्रमानव आमच्या दिमतीला आहे.

माणूस असून असून असा वेगळा काय असणार आहे? त्याच्या चेहऱ्यावर मिश्किल हास्य होते. मला म्हणाला, हे सगळं असलं म्हणजे काही माणूस होत नाही. आता मात्र माझा संयम सुटू लागला होता. मी त्याला म्हटलं, हे पहा, मानव घर बांधून त्यात राहतो. हे माझं घर बघ. किती सुंदर आहे! सगळ्या अत्याधुनिक सुखसोयी त्यात आहेत! घरातील सुंदर फर्निचर आताच बनवून घेतलं. छानपैकी भारीतला रंग दिलाय. माझ्याकडे एक फोर व्हीलर, दोन टू व्हीलर आहेत. घरात बायको आहे, मुलं आहेत. छानपैकी पुस्तकं आहेत. आम्ही विद्यापीठातून चांगली पदवी प्राप्त केली आहे. 'माणूस' म्हणवून घेण्यासाठी अजून काय हवं? तो पुन्हा हसला. त्याच्या हसण्याने माझ्या काळजात कुठे तरी जखम झाल्यासारखी वाटली. शिकलेल्यानीच तर केली सारी गडबड.

मूल्ये शाळेत, विद्यापीठात कुठे शिकवली जातात? सगळे घोटाळे, भ्रष्टाचार शिकलेल्यांनीच तर केलेत ना! पर्यावरणाचा नाश करणारा शिकलेलाच, इतरांच्या वाट्याचं आपण गिळंकृत करणारे शिकलेलेच, आईवडिलांना वृद्धाश्रमात ठेवणारे शिकलेलेच, ढोंगीपणा, दांभिकता सगळं सगळं कोण करतं? शिकलेल्यांचे अजून किती पराक्रम सांगू? आता माझ्यापाशी उत्तर नव्हतं. शांत बसण्याशिवाय आता पर्याय नव्हता. तो पुढे म्हणाला, मित्रा, एवढं शिकला आहेस असं म्हणतो तर खान्देशमधील कवयित्री बहिणाबाईंचं नाव ऐकलं असशील ना?

मी म्हणालो, हो माहिती आहे, बहिणाबाईच काय पण सगळे मोठमोठे कवी, लेखक मला माहिती आहेत. कुसुमाग्रज, बोरकर, तांबे, पाडगावकर, शांता शेळके, अत्रे, पु. ल. देशपांडे.. किती नावं सांगू? तो म्हणाला, राहू दे ही यादी. अरे त्या बहिणाबाई एक दिवसही शाळेत गेल्या नाहीत. पण त्या काय म्हणाल्या माहिती आहे?

काय म्हणाल्या बाबा त्या? अरे त्या म्हणाल्या, 'माणसा माणसा कधी होशील माणूस? 'तुम्ही' माणूस' असता तर त्यांना कशाला असं म्हणावं लागलं असतं? त्या कधीही शाळेत गेल्या नव्हत्या म्हणून त्यांना हे कळलं बरं का! मी म्हटलं, अरे, ती कविता आहे. सगळी माणसं कुठं वाईट असतात? आम्ही माणसंच आहोत. आम्ही काय वाईट केलंय?

तो पुन्हा थोडंसं कुत्सित हसला. म्हणाला, काय वाईट केलंय? काय चांगलं केलंय हे विचार? त्या बहिणाबाई एकदा छापखान्यात गेल्या होत्या. त्यांनी पाहिलं की तिथे कोरा कागद मशीनमध्ये टाकला की त्याच्यावर काहीतरी छापून येत होतं. त्या मशीनमधील उलट अक्षरांची आणि त्याची भेट अक्षरशः काही क्षणांचीच ना! तरी पण तेवढया अक्षरांच्या संगतीनं तो कागद शहाणा झाला असं त्या म्हणतात.

माणसापरी माणूस राहतो रे येडजाना अरे होतो छापीसनी कोरा कागद शहाणा.

पुढे त्या म्हणतात, जेवा इमान सचोटी पापामधी रे बुडले तेव्हा याच माणसानं किल्ली कुलूप घडले. ही तुमची प्रगती? बहिणाबाई शाळेत न जाता एवढं सांगू शकल्या.आणि तुम्ही एवढं शिकून..

सुरुवातीला स्वतःला शहाणा समजणारा मी आता वरमलो होतो. माझा स्वर खाली आला होता. मी थक्क झालो. माझ्या 'माणूस' असण्यावरच प्रश्नचिन्ह उभं राहिलं होतं. तेव्हा 'तो' शांतपणे म्हणाला,माणूस असण्याची लक्षणं फक्त बाह्य नसतात.

**माणूस म्हणजे-**

कृतज्ञता, तुम्हाला हा निसर्ग, ही धरती, धान्य पिकवणारे, उन्हातानात कष्ट करणारे शेतकरी भरभरून देत असतात. देशाचे रक्षण करणारे सैनिक सीमेवर प्राणपणने लढत असतात. तुम्ही करता कधी त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त? शिकवता कधी तुमच्या मुलांना अशी कृतज्ञता व्यक्त करायला? पैसे फेकले की एखादी वस्तू विकत मिळते एवढेच त्यांना माहिती आहे. एखाद्या शेतकऱ्याच्या शेतीचे पावसाने अपार नुकसान झालेले असते. कधी मुलांना घेऊन अशी शेतं दाखवायला गेलात?

**संयम**

संयमानं व्यक्त व्हायला शिकता आणि शिकवता का कधी आपल्या मुलांना? एखादी वस्तू नाही मिळाली किंवा ती उशिराने मिळणार असेल तरी संयम राखला पाहिजे. कोणत्याही गोष्टीचा आनंद सुद्धा संयमाने घ्यायला शिकलं पाहिजे हे संस्कार आपल्या मुलांवर कधी करणार?

**दुसऱ्यासाठी थांबणं**

जेवण्यापूर्वी, चांगल्या गोष्टी करण्यापूर्वी कधी थांबावसं वाटलं इतरांसाठी सगळ्यांना मिळाल्यावर मी घेईन ही भावना होते का मनात निर्माण?

दुऱ्यासाठी मदतीचा हात पुढे करणं तुम्ही भाग्यवान आहात. तुम्हाला नशिबाने सगळं मिळालं आहे परंतु असे काही दुर्दैवी जीव आहेत की ज्यांच्या नशिबात बऱ्याच गोष्टी नसतात. मला जे मिळालं आहे त्यात त्यांचाही वाटा आहे असं वाटतं का कधी? त्यांना देण्यासाठी आपला हात पुढे करावा असं वाटतं का?

**मनमोकळं हसणं**

हसणं हे माणूस असण्याचं एक विशेष लक्षण आहे. मनमोकळं हसलात कधी? तुमचं हसणं सुद्धा कृत्रिम आणि मोजून मापून!

**आपल्या स्वार्थाच्या पलिकडे पाहणं**

आपला स्वार्थ तर प्राण्यांना सुद्धा कळतो. पण तुम्ही त्यापलिकडे जाऊन सर्वांच्या कल्याणाचा विचार कधी करता का ? उपनिषदातील सर्वेपि सुखिन: संतू हा मंत्र नुसताच म्हणायचा नाही तर आचरणात आणायचा आहे.

**चुका स्वीकारणं आणि माफी मागणं**

आपल्या चुकांचा मनमोकळेपणे स्वीकार करणे आणि त्याबद्दल क्षमा याचना करणे. त्यासाठी धैर्य लागतं. हे करता कधी?

समाजातील प्रत्येक व्यक्तीत आणि प्राणीमात्रात एकच परमेश्वर भरून राहिला आहे याचा प्रत्यय घेणं आणि त्याप्रमाणे वागणं.

ज्येष्ठांचा आदर- सन्मान करणं

यातील किती गोष्टी तुम्ही करता रे? कशासाठी 'माणूस' म्हणायचं तुम्हाला? मी काहीच बोललो नाही. 'तो' निघून गेला. पण त्याच्या शेवटच्या शब्दांनी माझं जग ढवळून काढलं होतं. मला अंतर्मुख केलं होतं. 'माणसा माणसा, कधी होशील माणूस?'

मी उत्तर शोधतो आहे...



## सत्कर्माचे फळ । मोक्ष प्राप्ती ।।

टाळासंगे बोले । मृदुंगाचा ताल ।।
जगण्याचे मोल । अभंगात ।।१।।

भजनात डोले । सावळा श्रीरंग ।।
त्रैलोक्याचा रंग । पांडुरंग ।।२।।

कर्मासंगे भाव । भावासंगे भक्ती ।।
अंतरीची शक्ती । हरिनाम ।।३।।

मौनात पूजावे । नाम सर्वकाळ ।।
सत्कर्माचे फळ । मोक्ष प्राप्ती ।।४।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## बीमोड करू दहशतवादाचा

भूलोकीचे नंदनवन आहे काश्मीर खोरं
हिमाच्छादित पहाडात बसलंय् काश्मीर खोरं।
इथे वाहत होता आनंदाचा मंद समीर
अन् झुळझुळत होतं झेलमचं स्वच्छ नीर।
आज तिथेच घडलंय तांडव मृत्यूचं
शिरकाण झालंय् त्या निष्पाप जिवांचं।
धर्म शिकवतो सहिष्णुता, वैरभाव नाही
या उक्तीला मिथ्या ठरवणारे आहेत काही।
धर्मांधाने आज माणुसकीला केलंय बदनाम
धर्माच्या नावावर केलाय् कत्ले आम।
दुःख अन् संतापाने देश पेटून उठला या
निष्पाप जिवांचं रक्त न जाईल वाया।
मानवतेचे पाईक आम्ही एकजुटीने लढू
दहशत पसरवणाऱ्यांना ठेचूनच काढू।
शंभर अपराध भगवंताने सहन केले
दुष्टांच्या निर्दालनास 'सुदर्शन' धारण केले।
सज्जनांच्या रक्षणास भगवंत अवतरतात
आज ते अवतरले तु च्या आमच्या रूपात।
उठा, जागे व्हा अन् संपवा दहशतवाद्यांना
धर्माच्या नावावर आतंक माजवणाऱ्यांना

प्रतिमा सहस्त्रबुद्धे

# एका खिडकीची गोष्ट...

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

प्राचीन काळातील घरे बंदिस्त होती. घरे कसली ती, आपण गुहांमध्येच राहात होतो, असं म्हटलं तर जास्त योग्य ठरेल. दिवसाही मिट्ट काळोख असायचा. आत वाऱ्याला शिरकाव नव्हता. माणूस आतमध्ये गुदमरू लागला. त्यामुळे मेझोपोटेमिया आणि इजिप्तमध्ये माणसाने नवीन प्रयोग केला. आत प्रकाश आणि हवा खेळती राहण्याकरिता भिंतीवर छिद्र किंवा खाचा केल्या जाऊ लागल्या. ही छिद्रे म्हणजेच 'खिडक्यांचा जन्म' असे म्हणता येईल.

मातीच्या विटांमध्ये केलेल्या उघडिपीमुळे बाहेरून प्रकाश आला. हवा खेळती झाली. त्यानंतर खिडकीतून आतले दिसू नये आणि एकांतही मिळावा म्हणून तिच्यावर लाकडी पडदा लावण्यात आला. बराच काळ गेल्यानंतर इ. स. १०० मध्ये रोमन साम्राज्यात खिडकी रचनेमध्ये सुधारणा झाल्या. त्याच सुमारास काचेचा शोध लागला. त्यावेळेस खिडकीला काच वापरणे म्हणजे श्रीमंत प्रतिष्ठित घराण्याचे चिन्ह समजले जाई. आता छोट्या पण जाडसर काचेच्या तुकड्यांचा उपयोग खिडक्यांसाठी होऊ लागला. मध्ययुगीन युरोपात मात्र संरक्षणाच्या दृष्टीने खिडकीची रचना करण्यात आली. आतून केवळ बाण जाईल एवढ्याच आकाराच्या खिडक्या किल्ल्यांवर बांधण्यात आल्या.

आतमध्ये कमीत कमी प्रकाश जाईल अशी योजना करण्यात आली. युद्धांच्या पृष्ठभूमीवर ही रचना योग्यही होती. चर्चच्या इमारतीत मात्र खिडक्या दरवाजाएवढ्याच लांबी- रुंदीच्या बसविण्यात आल्या. त्यावर बारीक नक्षीकाम करण्यात येऊ लागले. काचांवर वेगवेगळे रंग लेपण्याची कला याच कालावधीत रूढ झाली.

आपल्याकडे मध्ययुगीन भारतात (इ. स. १५०६ ते १७०७) अनेक मुगल राजांनी झरोका, दरबार आणि घुसलखाना या तीनही संकल्पनांमध्ये राज्यकारणाची बीजे रोवली. राजवाड्याचा झरोका म्हणजे खिडकीचेच एक रूप होते. पण या खिडकीचा उपयोग साम्राज्यवाढीच्या महत्त्वाकांक्षेसाठी केला गेला. बादशहाची तब्येत बरी नसेल तरी झरोक्यातून त्याने दर्शन द्यायलाच हवे. दरबारात जायलाच हवे आणि घुसलखान्यात गुप्त घडामोडींचा परामर्ष घ्यायलाच हवा. राजकारण आणि वास्तुकला याचा विहंगम संगम मध्ययुगीन भारतात सापडतो. त्यातील 'झरोका' या संकल्पनेत अनेक प्रणयरम्य रंग भरले गेले. म्हणूनच झरोक्याचा प्रवास रोमांचकारी वाटतो.

१५०६ साली मिर्झांनी बाबरचे ज्या इमारतीत स्वागत केले, तेथे झरोक्याचा पहिल्यांदा उल्लेख आलेला आहे. बाबर म्हणतो, 'वरच्या मजल्यावर चार दिशांना चार खोल्या (हुजरा) होत्या आणि मधोमध असलेल्या झरोक्यातून खालचा हिरवागार बगीचा दिसत होता. लोकांना दर्शन देण्याकरिता या झरोक्याची रचना केली होती.' बाबरने त्याला 'शाह-नशी' असे नाव दिले. म्हणजे फक्त राजाने दर्शन देण्यासाठीच झरोक्याची अद्भुत रचना केली होती.

झरोक्यात ऐसपैस बसण्यासाठी दिवाण ठेवले होते. पण याचा अर्थ असा नाही की, मोगल साम्राज्याच्या काळातच झरोक्यातून राजाने दर्शन देण्याची प्रथा सुरू झाली. ही एक प्राचीन भारतीय परंपरा होती ज्या परंपरेचे पालन मि र्झाराजे करीत होते. हुमायूनने (१५३०-४०,१५५५) देखील झरोका परंपरेचे निष्ठापूर्वक पालन केले. अबू फजलने लिहिले आहे की, हुमायून शेर मंडलच्या सर्वात वरच्या मजल्यावर गेला आणि तेथून त्याने जनतेला दर्शन दिले.

मध्ययुगीन काळात राजा जनतेचा अनभिषिक्त सम्राट होता. त्याने दर्शन देण्यामागे अनेक संकेत असायचे. बायका आपल्या पोराबाळांना घेऊन आशीर्वाद घेण्यासाठी राजाच्या झरोका दर्शनाकरिता ताटकळत उभ्या असायच्या. राजाचे दर्शन म्हणजे राज्यात सर्व कुशल मंगल आहे आणि राजाची तब्येत चांगली आहे, असा अर्थ निघायचा. हुमायूनचे मरण तब्बल १७ दिवसांनी जगजाहीर करण्यात आले होते. हुमायूनचे राजवस्त्र परिधान करून मुल्ला बेकसीने झरोक्यातून जनतेला दर्शन दिले होते. मुल्ला बेकसी हुबेहूब हुमायूनसारखा दिसायचा.

हुमायून अजूनही जिवंत आहे आणि राज्यात सर्वकाही आलबेल आहे याची ती ग्वाही होती. झरोक्याला खऱ्या अर्थाने प्रतिष्ठा मिळाली ती अकबरच्या (१५५६-१६०५) काळात. त्या काळातील अकबरच्या दरबारातील इतिहासकार अबू फजलने लिहिलं आहे की, दिवसातून दोनदा अकबर दर्शन द्यायचा. पहिले झरोका दर्शन सकाळच्या सूर्यपूजेनंतर लगेच असायचे.



दर्शन देऊन तो सबंध जनतेला सूचकपणे सांगायचा, मी तुमच्या पाठीशी आहे. हजारो स्त्रिया त्यांची आजारी मुलं कडेवर घेऊन अकबराचे दर्शन घ्यायच्या. या झरोका दर्शनातूनच 'दर्शनीया' नावाचा पंथ जन्माला आला.

या दर्शनीया पंथाचे लोक राजाच्या दर्शनाशिवाय जेवत नसत. लवकरच अकबराचे 'झरोका दर्शन' एवढे लोकप्रिय झाले की, फतेहपूर सिक्रीला खास दर्शनासाठी 'पंचमहाल' बांधण्यात आला. पूर्वेकडील झरोक्यातून अकबर सूर्यपूजेनंतर दर्शन देणार हे ठरलेले असायचे. आग्रा किल्ल्यातसुद्धा जनतेला दर्शन देण्यासाठी झरोका होता. राजाच्या दर्शनासाठी त्याचा उपयोग व्हायचा, पण करमणुकीसाठी हत्तींच्या लढाया व्हायच्या. त्या लढायादेखील तो झरोक्यातून पाहायचा.

जहांगीर (इ. स. १६०५-२७) च्या काळात झरोका दर्शन तो फिरतीवर असल्यावरही व्हायचे. भारताच्या राजनीतीमध्ये झरोका दर्शन एवढे खोलवर रुजले होते की, आता वास्तुशिल्पकलेची गरज राहिली नव्हती. झरोका दर्शनाला संस्थात्मक स्वरूप मिळाले होते. सैन्य कूच करतेवेळी राजा जहांगीर झरोक्यातून दर्शन देत असे. कोणी पाहुणा त्याच्या राज्यात आला तरी पहिले दर्शन झरोक्यातून व्हायचे. जेव्हा त्याचा मुलगा शहाजहान डेक्कनहून मंडूला इ. स. १६१७ साली आला तेव्हा त्याचे स्वागत झरोक्यातच झाले होते.

जहांगीर म्हणतो, 'माझा मुलगा शहाजहान रत्नखचित दागदागिने घेऊन आला. सोन्या-चांदीने मढलेले हत्तीघोडे झरोक्याच्या परिसरातच ठेवण्यात आले. त्याला खूश करण्यासाठी मी झरोक्यातून खाली उतरून त्याला भेटलो.' म्हणजे सख्ख्या मुलालादेखील झरोक्यात भेटणे हा रिवाज नव्हता. त्याला भेटायला जहांगीर झरोक्यासमोरच्या अंगणात जातो आणि भेटतो.

जहांगीरचा झरोका फक्त दर्शनासाठी नाही तर न्याय देण्यासाठी होता. आग्रा किल्ल्यावर 'न्यायसाखळी' तयार केली गेली. ती साखळी शुद्ध सोन्याची, ३० गज लांबीची आणि ६० घंटांची होती. कोणताही नागरिक ही न्यायसाखळी सहज ओढून न्याय मागू शकायचा. जहांगीर झरोक्यात बसून न्यायनिवाडा करायचा.

जहांगीरच्या न्याय झरोक्यामुळे असे म्हणता येईल की, झरोका संस्था त्याने उच्चतम पातळीवर नेली होती. नंतर शहाजहानने (इ. स. १६२८-५८) देखील ही परंपरा चालवली. त्याच्या मुलाने म्हणजेच औरंगजेबाने मोहम्मद या त्याच्या मुलाला पत्रात लिहिले आहे, 'माझे वडील शहाजहान झरोका दर्शन द्यायला जायचे आणि दर्शनाला आलेल्या जनतेला आशीर्वाद द्यायचे.'

औरंगजेबाने (१६५८-१७०७) देखील झरोका परंपरा निष्ठेने पाळली. मध्ययुगीन मुगल साम्राज्यात रूढ झालेली झरोका परंपरा खऱ्या अर्थाने प्राचीन भारतीय परंपरा होती. 'जाल गवाक्ष' या भारतीय शब्दावरून 'झरोका' या शब्दाची उत्पत्ती झाली असावी. सांचीच्या बारीक उठावाच्या नक्षीकामात देखणे जाल गवाक्ष आहेत. श्रेष्ठ कवी नारायणदासांच्या 'छिताई चरित'मध्ये झरोक्याचा उल्लेख आहे. हा ग्रंथ म्हणजे ब्रज भाषेतील प्रेमाख्यान असून अलाउद्दीन खिलजीच्या समकालीन देवगिरी राजा रामचंद्र यादवाच्या कन्येवर म्हणजेच छिताईवर हे प्रेमाख्यान आधारलेले आहे. कवी नारायणदास राजा मानसिंगच्या (इ. स. १४८६-१५१६) छत्रछायेखाली राहत होते आणि त्यामुळेच तेथील शिल्पकला, संगीत आणि चित्रकलेची सुंदर वर्णने त्यांच्या छिताई चरितात येतात.

ग्वाल्हेरच्या मनमंदिर राजवाड्याचे बांधकाम होताना कवी नारायणदासांनी स्वतः बघितले आणि त्याचे पडसाद छिताई चरितात उमटले. या रचनेत झरोक्याचा उल्लेख आहे.

**'बादल घनह उठी घन घटा ।**
**रचे अनूप अटारी अटा ।।**
**छाजे झरोखा रचे अनुपा ।**
**जिन्हनि उझकिते रहे जे भुपा ।।**
**कठछपर सनखने अवासा ।**
**कंचन कलश मनहु कविलासा ।।'**

मनमंदिर राजवाडा आकाशापर्यंत जातो आहे. या राजवाड्याची दालने बघून असं वाटतंय की, आकाशात ढग गोळा झाले आहेत.

सुंदर छज्जे आणि सुसज्ज झरोख्यांमधून राजा आजूबाजूचे सौंदर्य न्याहाळतो आहे. असं वाटतंय की, कैलाश शिखराजवळ आलो की काय! इ. स. १५०० च्या सुमारास यमुना चंबळ परिसरात अशा प्रकारची शिल्पकला अस्तित्वात होती आणि त्याचे पुरावेही सापडले आहेत. त्यामुळे मध्ययुगीन झरोका प्राचीन भारतीय शिल्पकलेचे वैशिष्ट्य आहे आणि त्याला मुगल राज्यकर्त्यांनी आपलेसे केले, असे म्हणावे लागेल. जगात १६ व्या शतकानंतर खिडक्यांच्या रचनेमध्ये अनेक



बदल होत गेले. जागतिक पातळीवरच्या नवनिर्मितीच्या प्रवासात खिडक्या जास्त मोठ्या झाल्या. उभे आणि आडवे गज असलेल्या खिडक्या लोकप्रिय झाल्यात. काचेची तावदाने सर्वसामान्य लोकांच्या घरातही रुळली. १७ वे ते १९ वे शतक बरोक आणि रोकोको शैलीचे होते. नक्षीकाम केलेल्या फ्रेम्स, बारीक डिझाईन आता जगभरातील खिडक्यांमध्ये दिसू लागली. राजवाड्यांमध्ये किंवा मोठ्या इमारतींमध्ये खिडक्यांना सरकते पॅनल्स लावले जाऊ लागले. या शतकांमधील सुख-समृद्धीचा स्थायीभाव खिडक्यांवरही दिसू लागला.

जॉर्जियन आणि व्हिक्टोरियन शैलीचा प्रभाव १७ व्या ते १९ व्या शतकात दिसला. उभी तावदाने असलेली खिडकी इंग्लंडमध्ये जन्माला आली. जॉर्जियन खिडक्यांची तावदाने समसमान होती तर व्हिक्टोरियन युगात मध्य तावदान मोठे तर इतर दोन लहान आणि जास्त गोलाकार अशी समसमान चार तावदानांची दिमाखदार खिडकी निर्माण झाली. भिंतीतल्या एका छिद्रापासून तयार केलेल्या खिडकीचा प्रवास असा अविरत सुरू आहे. तिला बंद केलं तर ती माणसाला ऊब देते. संरक्षण देते. तिला उघडल्यावर कोवळी उन्हाची तिरीप ओळखीचं हसून या जगात आपले स्वागत करते. तिच्या गजांवर आपण कधी अल्लडपणे लटकलो असतो. तिच्या कोनाड्यात अभ्यास केलेला असतो.

लपंडावही खेळला असतो. आईशी गुजगोष्टी केलेल्या असतात. दिवाळीत एक पणती तर आपण तिच्याजवळ लावतोच. पणती मध्यरात्री विझून जाते; ती मात्र विझलेल्या चेहऱ्यावर चंद्र धरून उभी असते.

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# कार्तिकाच्या चांदण्यात मायेची ऊब शोधणे...



खरं म्हणजे हीच ऋतूची खरी नजाकत असते. अश्विन महिन्यात बऱ्यापैकी विरळ झालेले मेघ आता फार हलकेपणाने तुरळक तुरळक आपल्या अस्तित्वाचे पडसाद घेऊन फिरत असतात. मात्र निळ्याभोर आभाळाचा कागद पसरवून कार्तिक आपल्यासमोर प्रसन्नपणे उभा ठाकतो. एखादेवेळी परतीचा पाऊस परततानाही उशिराने येणाऱ्या पाहुण्यासारखा येतो, सृष्टीला मनसोक्त चिंब भिजवतो असा एखादा अपवादात्मक ओलतेपणा सोडला तर कार्तिक कोरडा आणि निरभ्र असतो. श्रावण किंवा चैत्र यांच्यासारखी काव्यात्म संवेदनशीलता कार्तिकाच्या वाट्याला येत नसली तरी कार्तिकातील चांदण्या रात्री, अंगावर थंडीचा शहरा ज्यांनी अनुभवला त्यांच्यासाठी कार्तिक उबदार आठवणीच पांघरून असतो.

कार्तिकात सूर्य उगवण्यापूर्वी आणि मावळण्यापूर्वी पूर्वीचे आणि पश्चिमेचे क्षितिज तांबड्या रुपेरी रंगांचा पिसारा उधळून ढगांना आकर्षक आणि मोहक करण्यात कधीच कुचराई करत नाही. कधी कधी तर एखाद्या चित्रकाराने ब्रशच्या फटकाऱ्याने सहज कॅनवास वर शिडकावा करावा आणि त्या लयदार फटकाऱ्याने कॅनव्हास जिंकून घ्यावा तसे रंगीत ढगांचे तुकडे उधळून दिल्यासारखे आकाशात विखुरलेले दिसतात. याच ढगाच्या आड आपल्या नकळत आधीच उगवलेला सूर्य हळूच डोके बाहेर काढताना दिसतो किंवा मावळण्यापूर्वी ढगाच्या रंगीत दुलईत नीज येण्यापूर्वी दुलई अंगा तोंडावर घेत तर कधी त्यारेशमी कापसाच्या दुलईतून डोकावत खोडकर मुलांच्या सारखी मस्ती करतांना दिसतो.

तांबड्या रंगाच्या विविध छटा रुपेरी मेघातून आरपार आपल्या मनात उतरतात आणि माथ्यावरच्या निळ्याशार आभाळाचा गंभीर खोलपणा एखादेवेळी मनातच साचून राहतो. आनंदमध्ये कही दूर जब दिन ढल जाये; सारखी रचना गीतकार योगेश यांना कार्तिकातल्या एखाद्या संध्येनेच बहाल केली असावी असे मला नेहमी वाटते. मावळतीला सूर्य क्षितिजाच्या कवेत गुडूप झाला की अगदी थोड्यावेळासाठी बुध ग्रह आपल्या इटुकल्या पिटुकल्या अस्तित्वातह पृथ्वीला सलामी देण्यासाठी येतो. आणि सूर्य कोणत्या क्षितिज गंगेत बुडाला ते शोधण्यासाठी तोही त्या क्षितिजात विलीन होतो. आणि मग आपल्या तेजस्वी प्रकाशाच्या किंचित निळसर छटा घेऊन शुक्र आकाशात उठून दिसतो. चंद्राच्या प्रकाशात बहुतांश तारे आपल्या उजेडाची उधळण आवरती घेतात मात्र शुक्राला त्या चंद्राची तमा नसते. तो जसा आकाशात प्रभावीपणे उठावदारपणा निश्चितपणे घेऊन उभा असतो. तसाच होतो अनेक कवींच्या आणि साहित्यिकांच्या मनातही तेजस्वीपणे उठून दिसतो.

**मिट्ट काळोखाची अंधारी रात्र दिवे पणत्या समई यांच्या उजेडाने न्हाऊन निघते. मध्येच फटाक्यांच्या स्फोटातून डोळेदपवणारा उजेड आणि कानाला कर्कश्य वाटला तरीही आनंद देणारा आवाज हा जल्लोष अश्विन अमावस्येपासून दोन- तीन दिवस सुरू राहतो. आणि अचानकच या रोशनाईत गुडूप झालेला अंधार डोके वर काढू लागतो. दिवस लहान झाल्याची जाणीव अगदी तशीच होते जशी खूप दिवसानंतर अंगणातल्या तुळशी कडे पाहिल्यानंतर ती मोठी झाल्यासारखे दिसते. पाहता पाहता दिवस लहान झाला रात्र मोठी झाली, शरदऋतू अश्विनाकडे पाठ फिरवून कार्तिकाकडे वळला आणि आपल्याला कळलेही नाही.**

आकाशातील ग्रहगोलांवर जे काही लिखाण म्हणून झाले असेल त्यात शुक्र नेहमीच प्रसन्नता आणि सौंदर्य याचे प्रतीक म्हणून आलेला आहे. लहान झालेला दिवस... मग अंधाराच्या पारंब्या ओघाने लांबवर जाणार हे ठरलेलेच असते. आवळ्यासारख्या झाडांना कार्तिक फुलवत नेतो आणि तुळशीच्या झाडावर मंजिऱ्यांचे बाशिंग बांधतो. आता मंजिऱ्याची बाशिंग आहेत म्हणून तुळशीचे लग्न की तुळशीच्या मंदिरावरून माणसाच्या लग्नामध्ये बाशिंग आणि मुंडावळे बांधण्याची पद्धत आली यावर जास्त विचार करत बसण्यापेक्षा तुळशीचा गंध आणि मंजिऱ्याच देखणेपण माणसाने मनात भरून घ्यावे. आंबट गोड चिंचा गाभूळल्या की तुमच्या मुखातले सगळे पाझर आपोआप प्रवाहित होऊन मुखजल जमा होणे एक निसर्ग दत्त प्रतिक्रिया आपल्यापैकी अनेकांनी अनुभवली असेलच. अर्थात आजच्या काळात चिंचेचे बोटुक तोंडात ठेवल की लगेच सर्दी खोकला टॉन्सिल इत्यादी इत्यादी यादी वाढत जाणार या धाकाने आंबट चिंचेचा गोडवा नवीन पिढीच्या जिभेला ठाऊकच होईनासा झाला आहे. कार्तिक झाडामध्ये नवचैतन्य घेऊनच येतो. अश्विन महिन्यातील ग्रीष्मतल्या उन्हाची स्पर्धा करणारी कार्तिकात बऱ्यापैकी थंडावा घेऊन आलेली असते. काही झाडांच्या खोडावर पानावर निमुटपणे बसलेले कोश किंचित हालचाल करत सुरवंट म्हणून बाहेर पडताना दिसतात.

अनेक झाडांची पाने कुरतडल्यासारखे दिसतात त्याची जबाबदारी नेहमीच लष्कर ए सुरवंट या कंपनीवर नोंदवली जाते. ह्या सुरवंटाना पंख फुटल्यावर जे फुलपाखरू बाहेर पडते (खरे तर तिला आता पाकोळी म्हटले जाते) ते श्रावणातल्या फुलपाखरा इतके मोहक का नसते? असा प्रश्न मला नेहमी पडत आला आहे. आणि याचे उत्तर ठाऊक असूनही ऋतू आपल्याला ते देणार नाहीत हेही मला माहीत असते.

कधीतरी आकाशात उडणारे पतंग नावाचे कीटक आणि हेलिकॉप्टर यांचा दूर दूर पर्यंत नसणारा संबंध परस्परांशी जोडून आमच्या बाल बुद्धीला हेलिकॉप्टरची संकल्पना समजून सांगणाऱ्या काही आगाध ज्ञान असलेल्या शिक्षकांच्या आठवणी आल्या की हसू येत. शेवगा आंबा वड पिंपळ अशा विविध झाडांना कार्तिका मध्ये आलेला बहर नजरेत भरण्या इतका आकर्षक नसला तरी नजर फिरवून इतका टाकाऊही नसतो. पक्षी झाडांवर गर्दी करू लागतात, एखाद्या निंबोणीला आलेला बहर रात्रीच्या अंधारात वाट शोधत शोधत कुण्या मायमाऊलीच्या मनाला प्रसन्नता देतो आणि त्या निंबोणीच्या झाडामागे लपलेला चंद्र तिच्या पाळण्यात खेळणाऱ्या चंद्राला निजवण्यासाठी मदतीला येतो.

कार्तिकात घरादारा शेतात कणसाचे दाणे, जगणाऱ्या कीटकांचे विविध रूप दाखवता जातो आणि आपल्या घरात काळे आणि लाल मुंग्या अचानक कुठून प्रगट झाल्या? याबाबत विचार करण्याची वेळही येते. मुंगीला साखर टाकून त्यांना वाट करून देणारी आजी आता चौकटबद्ध कुटुंब व्यवस्थेचा भाग म्हणून दिसत नसली तरी ती जिला देव मुंगी म्हणत असे ती काळी मुंगी ही आता फार अभावाने दिसायला लागली आहे. मात्र अंगावर चढल्याबरोबर कारण असो वा नसो आपण दंश केलाच पाहिजे या धर्माने वागणाऱ्या लाल मुंग्या मात्र आपल्या नांगीत कोणता रासायनिक पदार्थ घेऊन फिरतात ते सांगणे कठीण आहे. मात्र ती लाल मुंगी चावली की त्वचेवर येणारे पुरळ आणि त्वचेची होणारे आग लक्षात आल्यापासून साहित्यिकांनी गरीब मुंगीच्या कथा लिहिणे का सोडून दिले? त्याचे उत्तर मिळते.

कार्तिकातल्या थंडीत हळूहळू यात्रा, जत्रा, उरूस यांची सुरुवात झालेली असते. तुळशी विवाह या मुहूर्ता पासून स्वातंत्र्याचे सुख उपभोगणारे अनेक जीव आजन्म कारावासाचे मुहूर्त शोधायला लागतात. कार्तिक पौर्णिमेच्या स्वच्छ आकाशात आणि शुभ्र चांदण्यात फिरत असताना अंगात थंडी भरायला लागली की कार्तिकाच्या अंधाऱ्या रात्रीची उबदार माया पांघराला मिळते. निरव शांततेत थंडीने आसमंत गोठतो आणि सकाळाच्या काकड आरतीची सूर हळुवार दूरवरच्या मंदिरातील घंटारवासोबत कानामध्ये गुंजू लागले की आता कार्तिकाची पहाट मलमली धुक्याची चादर अंगाभोवती लपेटून घेणार याची जाणीव व्हायला लागते. हे धुकं कधी विरळपणे अलगद तरंगताना दिसतं, तर कधी दाट ढगासारखं अगदी रस्त्यावरच्या हातभर अंतरावर उभा असलेला माणूस दिसणार नाही, झाड दिसणार नाही आठ सव्वा आठ वाजताच्या सूर्याला झाकून त्याला चंद्रामध्ये रूपांतरित करण्याची कला शिकणे इतकं असं हे धुकं आपल्या अवतीभोवती पसरलेलं असतं.

नव्या नवरीन अंगावरती भरजरी पैठणीचा पदर लपेटून घ्यावा तसं सकाळ नावाच्या अल्लड तरुणीन हे धुकं अंगाभोवती लपेटून घेतलेला असतं. ही धुक्याची शाल जेव्हा विरळ होत जाते तेव्हा गवताच्या पात्यावर, झाडाच्या पानावर दवांचे मोती दाटीवाटीन अंग चोरून बसलेले असतात. स्पर्श केला तर हे मोती लाजून पाणी पाणी होतात. धुक्यांचे हे काफिले आणि मोत्यांची उधळण या पल्याड जाऊन शेतामध्ये हरभरा, तुरी, गहू या पिकांची झाड कमरेवर हात देऊन उभे असतात. कधी अगदी पहाटच्या थंडाव्यात पाणी देण्यासाठी कुणी शेतकरी राजा पांदीच्या वाटेने चालू लागतो आणि त्याला कधी पिवळी धमक धामण तर कधी फणा काढलेला नागोबा दमदाटी करत सळसळत निघून जातो.

थंडी हळूहळू वाढत जाईल या जाणिवेतून रंगीबेरंगी लोकरचे उंडे घेऊन मुलांसाठी नवऱ्यासाठी स्वेटर विणणाऱ्या उबदार जाणिवेच्या माय माऊली माझ्याकडून डोळा भरून पाहिल्या... आता ते लोकरचे उंडे नाहीत, मात्र नेपाळी लोकांनी बाजारातल्या चौकात जर्किन आणि स्वेटरची दुकाने उभी केलेली दिसतात. थंडी वाजतच नाही त्यातून, पण मायेची ऊबही मिळत नाही त्यातून...!

गावानजीकच्या नद्या आणि डोह बऱ्यापैकी शांत झालेले असतात, त्यातील पाण्याची पातळी कमी झाल्याच्या खानाखुणा किनाऱ्यावर उमटताना दिसतात. नदीपात्रातील वाळू हळूहळू उघडी पडायला लागते. या नदीच्या ओल्या वाळूत कोणी किती खोपे बांधले, किल्ले बांधले त्याच्या आठवणी मनात असल्या तरी जनात सांगताना प्रत्येकाच्या मनात एक बुजरेपणा दाटून असतो, त्या खोप्यासाठी भातुकलीच्या खेळात हमरी तुमरीवर येणारी सखी दिवाळ सणाच्या वेळेस माहेरी येऊन गेली, मंदिराच्या रस्त्यावर समोरही आली मात्र कार्तिकातल्या थंडीने तिचे शब्द गोठवून ठेवल्यासारखी अबोलपणे निघून गेली.... स्तब्ध पाण्याचा प्रवाह निमुटपणे वाहून नेणाऱ्या नदीसारखी... खोल, गंभीर आणि स्तब्ध डोहासारखी.... कार्तिक अस्वस्थ करून जातो तो हा असा! नाही का?

पान १ वरून

## ऊर्जेसाठीची नवी लढाई

निर्बंध कठोर करत, अमेरिका संपूर्ण जगाची ऊर्जासुरक्षाच धोयात आणत आहे, हे चुकीचेच. भारत कोणत्याही व्यापार करारावर घाईने स्वाक्षरी करणार नाही आणि त्याचे व्यापार पर्याय मर्यादित करणाऱ्या अटी स्वीकारणार नाहीत, असे वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी कालच म्हटले आहे.

व्यापार करार हे फक्त आयातशुल्क किंवा बाजारपेठ प्रवेशापुरतेचे नसतात, तर दीर्घकालीन विश्वास, संबंध आणि नियमाधारित व्यापार यांचे ते प्रतीक आहेत, असेही त्यांनी म्हटले आहे.

भारत-अमेरिका व्यापार करार पुन्हा एकदा ऐरणीवर आलेला असताना, भारताने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यातूनच, भारताने अमेरिकेला योग्य तो संदेश दिला आहे. ऊर्जेची नवी लढाई आता कोणत्या वळणावर जाईल, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईलच.

## काश्मीर सध्या केंद्रशासितच हवे!

पंजाबमध्येही सुरजितसिंग बर्नाला यांच्या गटाशी करार केला आणि त्यांनाही एकदा सत्तेवर बसि पण, पाकिस्तान व चीन हे देश या राज्यांतील फुटीरतावाद विझू देत नाहीत. अलीकडच्या काळात खलिस्तानची मागणी भारतात नव्हे, तर कॅनडातून जोर धरू लागली आहे. पंजाबमध्ये सध्या सत्तेत असलेल्या आम आदमी पक्षाने खलिस्तानबद्दल सहानुभूती असलेल्या कलाकार व नेत्यांकडे सोयीस्कर कानाडोळा चालविला आहे. तो पक्ष भावी काँग्रेस होण्याचा प्रयत्न करीत असल्याने त्याच्याकडून यापेक्षा वेगळे काही अपेक्षितच नाही. ईशान्येकडील नागालॅण्ड, मिझोराम, मणिपूर यांसारख्या राज्यांमध्ये प्रतमपासून अलगतावादी भावना होती. भारताची ताकद त्याच्या एकतेत आहे. प्रचंड सांस्कृतिक आणि भाषिक वैविध्य असूनही भारत एकसंध राहिला आहे, हीच गोष्ट सार्या जगाच्या नजरेत खुपत आहे. कसेही करून भारताचे तुकडे करण्याचे प्रयत्न सतत सुरू असतात. त्यात केवळ पाकिस्तान-चीन सक्रिय आहे असे नव्हे, तर अनेक पाश्चिमात्य लोकशाहीवादी देशही सहभागी आहेत. त्यामुळे जम्मू-काश्मीरमध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या दबावामुळे विधानसभा निवडणुका घेण्याची चूक केंद्र सरकारने केली असली, तरी त्या प्रदेशाला पूर्ण राज्य देण्याचा विचार नजीकच्या भविष्यकाळात तरी सरकारने करू नये. त्यामुळे ज्या राज्यांमध्ये वारंवार हिंसाचार उफाळतो, ती राज्ये केंद्रशासित का करु नये, असा प्रश्न उपस्थित होणे रास्तच!

## जपानच्या ताकाइचींकडून भारताच्या...

जपानमध्ये तरुणांची लोकसंख्या कमी असून, वृद्धांची संख्या तुलनेने खूप मोठी आहे. पण, तरीही जपानमध्ये मोठ्या संख्येने स्थलांतरितांना प्रवेश द्यायला ताकाइची यांचा विरोध आहे. महिलांनी लग्नानंतर माहेरचे नाव लावणे, तसेच जपानच्या राजघराण्यात राजकन्येला राजाचा उत्तराधिकारी नेमण्यासही त्यांचा विरोध आहे. स्त्रीवादी आणि रुढीवादी अशा साधारणतः विरोधी असणाऱ्या भूमिका हे त्यांच्या राजकारणाचे वैशिष्ट्य.

सध्या 'एलडीपी'कडे स्पष्ट बहुमत नाही. डगमगणारे सरकार चालवताना वैचारिक भूमिकेला तिलांजली देता येत नाही. अमेरिकेचा जपानमध्ये मोठा सैन्यतळ असून, त्याला जपानमधील राष्ट्रवादी लोकांचा विरोध असतो. शिंझो आबे यांच्याप्रमाणेच ताकाइचीसुद्धा दुसऱ्या महायुद्धामध्ये मारल्या गेलेल्या जपानी सैनिकांच्या 'यासुकुनी' स्मारकाला नियमित भेट देतात. दुसर्या महायुद्धामध्ये जपानी सैन्याने चीन आणि आग्नेय आशियातील अनेक देशांमध्ये अनेक अत्याचार केले असल्याने अशा भेटींची चीन आणि अन्य देशांतून तीव्र प्रतिक्रिया उमटते. डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीमध्ये जपान अमेरिकेवर विश्वास ठेवू शकतो का, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे.

आबेंची आर्थिक विचारधारा अर्थशास्त्रात 'आबेनॉमिस' म्हणून ओळखली जाते. सरकारी खर्चात कटोत्री, अर्थव्यवस्थेत धोरणात्मक सुधारणा, करसवलत आणि 'बँक ऑफ जपान'कडून दिली जाणारी कमी व्याजदरांची उत्तेजना यांचा एकत्रित परिणाम म्हणून गेल्या अनेक दशकांपासून मंदीत असलेली आणि २००८ सालच्या जागतिक आर्थिक संकटामुळे आक्रसू लागलेली अर्थव्यवस्था आपली मरगळ झटकून वेगाने वाढू लागेल, या विचारावर 'आबेनॉमिस' आधारले होते. 'आबेनॉमिस'ला मर्यादित यश मिळाले असले, तरी शिंझो आबे यांच्या निवडणुकीतील विजयात त्याचा मोठा हातभार लागला होता. ताकाइची आता तीच रणनीती वापरत असल्या, तरी तेव्हा जपानमध्ये आवश्यक वस्तूंच्या किमती पडल्या होत्या. सध्या जपानी लोक महागाईमुळे त्रासले असल्याने, ताकाइची या आर्थिक संकटातून कशा प्रकारे मार्ग काढतात, हे पाहावे लागेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ताकाइची यांच्यामध्ये लवकरच भेट होण्याची शयता आहे. भारत-जपान द्विपक्षीय संबंध १९५२ साली प्रस्थापित झाले असले, तरी त्यांच्यातील सांस्कृतिक संबंधांना हजारो वर्षांचा इतिहास आहे. आठव्या शतकात जपानमधील नारा येथील तोडैजी बुद्ध मंदिराची स्थापना करण्यात आली आणि त्याचे उद्घाटन बोधिसेन या भारतीय भिक्खूने केले. ताकाइची यांचा जन्म नारा येथेच झाला होता. आधुनिक राष्ट्र म्हणून असलेल्या मैत्रिपूर्ण संबंधांनाही १०० वर्षे उलटून गेली आहेत. १९०३ साली 'द जपान-इंडिया असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. स्वामी विवेकानंद, गुरुदेव रवींद्रनाथ टागोर आणि जमशेटजी टाटा यांच्यासारख्या थोर विभूतींनी जपानला भेट दिली होती. रासबिहारी बोस, सुभाषचंद्र बोस आणि न्यायमूर्ती राधाविनोद पाल यांचे जपानमध्ये विशेष स्थान आहे.

आज भारतासाठी जपान सर्वांत जवळच्या मित्र देशांपैकी एक आहे. द्विपक्षीय व्यापार सुमारे २१ अब्ज डॉलर्स असून त्यात जपानची निर्यात ही भारताकडून केल्या जाणाऱ्या आयातीपेक्षा तिप्पट आहे. जपान भारतातील पाचवा सर्वांत मोठा गुंतवणूकदार देश आहे. भारतात सुमारे १ हजार, ४०० जपानी कंपन्या काम करत असून, त्यांतील सुमारे अर्ध्या कंपन्या उत्पादन क्षेत्रात काम करतात. भारतातील विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी जपानने मोठ्या प्रमाणावर कर्जपुरवठा केला आहे. बुलेट ट्रेन हा त्यातील सर्वांत मोठा प्रकल्प. ताकाइची यांनी जपानमध्ये स्थैर्य आणले आणि दीर्घकाळ सत्तेत राहण्यात यशस्वी झाल्या, तर भारतासाठी ती निश्चितच चांगली गोष्ट असणार आहे.

कथा

डॉ. सुमेधा हर्षे




ती दररोजच यायची घरासमोरील दुधमोगऱ्याच्या झाडांवरील पांढरीशुभ्र फुले तोडायला. फुलांपर्यंत हात पोहोचला नाही की, उड्या मारून प्रयत्न करायची. परंतु छोट्याशा पायांची छोटीशी उडी पोहोचायची नाही फुलांपर्यंत. बराच वेळ झाला की तिची आई आवाज द्यायची, ''अगं नयना, होतील तेवढी फुलं पुजेला, परत ये बरं, शाळेला जायचं आहे ना तुला? चल आटप बरं, रिक्षावाले काका यायची वेळ झाली आहे.'' आईचा आवाज आला की अजून काही फुलं तोडायची राहिलीत म्हणून हिरमुसल्या चेहऱ्याने परत फिरायची. तिचं तयार झाल्यावर रिक्षावाले काकाची वाट बघताना फुलांकडे बघत राहणं मी रोजच अनुभवायचो, अंगणातल्या आरामखुर्चीत बसून पेपर वाचताना.

मी तिच्याकडे अधूनमधून बघतो आहे याकडे तिचं लक्षही नसायचं. मात्र शाळेत जाताना ती आठवणीने रिक्षात बसताना मला टाटा केल्याशिवाय जायची मात्र नाही. माझी तिची मैत्री झाली ती एकदा फुलं काढायला तिचा हात पुरला नाही म्हणून मी स्वत:च तिला फुलं काढून दिलेत तेव्हापासून. परंतु तिला स्वत:लाच फुलं काढायला आवडायचं आणि कदाचित, 'काकांना त्रास द्यायचं नाही हं नयना' असं तिच्या आईनं बजावलं असावं. परंतु सुटी असली की ती माझ्याकडे यायची सहज गप्पा मारायला. तिच्याकडे खूप विषय असायचे बोलायला आणि माझी कायमच तिच्यासमोर श्रोत्याची भूमिका असायची. म्हणूनच तिला मी आवडत असावा. कारण कुठल्याही क्षणी 'असं कां?' न विचारता असं होय' एवढेच शब्द मी बोलायचो. विशेष म्हणजे आमच्या संवादात कोणाचीही आडकाठी नसायची.

मी माझ्या निवृत्तीच्या शेवटच्या पाच वर्षांच्या दरम्यान तिच्या घरासमोर राहायला आलो आणि तिचे आईवडीलही माझ्या मागोमाग नुकतेच त्याच गावात माझ्या निवासासमोर राहायला आले. तेव्हापासूनच त्या कुटुंबाशी माझी ओळख झाली. माझे कुटुंब मात्र मुलांच्या शिक्षणासाठी माझ्या गावी बांधलेल्या घरीच राहायचे. अर्थात कधी कधी मी गावी जायचो किंवा मुलांना सुटी असली की तेही इथं यायचे. नयना, ती शाळेत निघण्यापूर्वी, मी सकाळी कार्यालयात जाण्यापूर्वी आणि मी कार्यालयातून घरी आल्यावरचा माझा मैत्रीपूर्ण विरंगुळा, सहज, निघून गेलेल्या बालपणाचा पुन्हा एकदा मनमुराद आनंद देणारी सखी, कार्यालयातील अधिकारपद विसरवून माझ्यावर निरपेक्ष प्रेम करणारी माझी चिमणी. शाळेतला तिचा अभ्यास, तिचे मित्र-मैत्रिणी, खेळ, आजींनी तिच्याकडून घोकून घेतलेल्या जुन्या कविता, श्लोक, गोष्टी हा आमच्या नेहमीच्याच गप्पांचा विषय, इतरांच्या विचारांपलीकडचा. म्हणजे तेच आमच्या मैत्रीचं सिक्रेट होतं.

मी या गावात गेले दोन वर्षे रमलो तो तिच्याचमुळे. दिवाळीच्या सुटीत ती आपल्या आजीकडे, म्हणजे आईच्या आईकडे जायची. परंतु, 'अरे काका, यावर्षी आम्ही इथेच दिवाळी साजरी करणार आहोत, आजी, आजोबा, मामा, मामी येणार आहेत' अशी बातमी तिने दिवाळीच्या पंधरा दिवस अगोदरच दिली. मग खूप फटाके, खूप फुलबाज्या उडवू, मस्त गंमत करू वगैरेचा तिने आखलेला कार्यक्रम दररोज मला ती ऐकवायची. मला फक्त एकच दिवस दिवाळीची सुटी होती आणि कुटुंब त्यांच्या माहेरी जाणार असल्यानं 'मी फक्त लक्ष्मीपूजनासाठी येईन आणि लगेच परत जाईन' असं कळवून इथेच दिवाळीचे बाकी दिवस घालवायचं ठरवलं. घरचं लक्ष्मीपूजन आटोपून मी परत आलो. दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या भाऊबीजेच्या कार्यक्रमाची धावपळ नयनाकडे सुरू होती. तिला फुलबाज्या, फटाके लवकरात लवकर उडवायचे होते, त्यासाठी तिचा हट्ट सुरू होता.

शेवटी तिने तिच्या मामाच्या मागे लागून फटाके फोडायला सुरुवात केली. मी तिचा तो आनंद अंगणात बसून अनुभवत होतो, बालपणीच्या आठवणीत रंगलो होतो. तेवढ्यात अचानक तिच्या हातातील फुलझडीची ठिणगी फटाक्यावर पडली आणि फटाक्यांना आग लागली. नयनाच्या मामाने कसंतरी तिला जवळ ओढून घरात नेलं, परंतु फटाक्यातील रॉकेटने अगदी माझाच वेध घेतला. मला कळण्याच्या आत डोळ्यांपुढे अंधार आणि शुद्धीत आलो तेव्हा मी दवाखान्यात असल्याचं कळलं, माझी दृष्टी गेल्याचंही. नयनाच्या वडिलांनीच मला भरती केलं आणि घरी कळवून सारी व्यवस्था केली. दृष्टी गेल्याने मला पुन्हा कार्यालयात जाणं शक्यच नव्हतं. दवाखान्यातून गावाला परत जाताना नयनाचं कुटुंब आलं होतं, परंतु नयनाची भेट आणि तिच्याशी बोलणं झालंच नाही. झालेल्या प्रसंगाने ती घाबरलेली आहे, हे तिच्या वडिलांकडून मला कळले. सहा महिने झाले असतील, मी सुटीवरच होतो, स्वत:च्या घरात डोळ्यांतील अंधार बघत. एक दिवस नयनाच्या वडिलांचा फोन होता. त्यांनी माझ्या पत्नीला लगेच टॅक्सीने मला घेऊन पुण्याला पोहोचण्याचा आग्रह केला, कुठलंही कारण न सांगता. मी मुलं आणि सौभाग्यवतीसह टॅक्सीने पुण्याला पोहोचलो तेव्हा ते आमचीच वाट बघत होते. नयना मात्र कुठेच दिसली नाही. ते आम्हाला त्वरित डोळ्यांच्या दवाखान्यात घेऊन गेले. तिथे त्यांनी माझ्या डोळ्यांचे ऑपरेशन करायचे निश्चित केले होते. क्षणाचाही विलंब न करता साऱ्या टेस्ट करून मला ऑपरेशन थिएटरमध्ये घेऊन गेले. मी शुद्धीवर आलो तेव्हा माझ्या डोळ्यांवर पट्ट्या आणि मी बेडवर पहुडलेला एवढंच लक्षात आलं. ऑपरेशनच्या काही दिवसांनंतर माझ्या डोळ्यांवरच्या पट्ट्या काढायच्या होत्या. तोपर्यंत ना नयना मला भेटायला आली ना नयनाची आई. मी चौकशी केल्यावरही मला निश्चित उत्तर कुणीच देत नव्हतं. माझ्या डोळ्यांवरच्या पट्ट्या काढल्यानंतर मला नयनालाच बघायचं होतं. परंतु....माझ्या पट्ट्या हळूहळू काढल्यानंतर मला डॉक्टरांनी सावकाश डोळे उघडायला सांगितलं.

मी डोळे उघडताना बाहेरचा प्रकाश एकदम डोळ्यांत शिरला आणि मी पटकन डोळे बंद केले तेव्हाच डॉक्टरचे शब्द माझ्या कानात शिरले, ऑपरेशन यशस्वी झाल्यासंबंधी. मी परत डोळे उघडले आणि मला हळूहळू दिसायला लागलं. माझ्या शेजारी माझी पत्नी, मुलं आणि नयनाचे वडील उभे होते, परंतु नयना... काही दिवसांनी डोळ्यांनी स्वच्छ दिसायला लागलं आणि मला दवाखान्यातून सुटका व्हायला थोडा अवकाश असताना नयनाचे वडील भेटायला आले. मी परत नयना आणि तिच्या आईची चौकशी केली तेव्हा त्यांनी जे सांगितलं त्याने माझ्या पायाखालची जमीनच सरकली.

फटाक्यांमुळे झालेल्या अपघाताने आणि डोळे गमावून मी गावाला निघून गेल्याचा नयनाच्या मनावर खूप परिणाम झाला, ती अबोल झाली, खेळांपासूनही दूर होत गेली. तिच्या या मानसिक अवस्थेकडे बघता तिच्या वडिलांनी त्यांची बदली पुण्याला करून घेतली. ती तेथील शाळेत जाऊ लागली, थोडीशी रमायला लागली; परंतु मला मात्र नाही विसरू शकली. अधूनमधून ती माझीच चौकशी करायची.

(पान ६ वर)

# तरी अवधान एकले दीजे, मग सर्वसुखासी पात्र होईज

संत

**प्रकाश एदलाबादकर**



काही दिवसांपूर्वीची गोष्ट. महाराष्ट्रातील एका प्रख्यात वक्त्याचे व्याख्यान ऐकायला गेलो होतो. त्यांच्या जोशपूर्ण वाणीचा आणि सखोल अभ्यासाचा आनंद श्रोते मनापासून लुटत होते. सर्व श्रोतृवर्ग त्या वाणीच्या ओघात गुंग झाला होता. समोर अतिशय ओजस्वी आणि अप्रतिम व्याख्यान सुरू होते... आणि माझ्या मागच्या रांगेत बसलेल्या काही श्रोत्यांची सतत बडबड सुरू होती. व्यासपीठासमोरच्या दुसऱ्याच रांगेत ती मंडळी बसली होती. त्यांच्या एकूण दिसण्यावरून चांगली सुशिक्षित वाटत होती. परंतु दर पाच-सात मिनिटांनी फोनची घंटी आणि बडबड सुरू. अनेकदा मी अर्थपूर्ण नजरेने मागे वळून बघितले. त्यांनी त्याची दखलसुद्धा घेतली नाही. स्वतः धड ऐकायचे नाही आणि इतरांचा रसभंग करायचा ही कुठली वृत्ती? शिवाय आपण असे करतो आहोत, याची ना खंत, ना खेद! बरे, चार समजुतीच्या गोष्टी सांगाव्या म्हणावे तर ते आपल्यावरच गुरकावणार! असा अनुभव अनेक सभांमधून, कार्यक्रमांमधून, नाट्यप्रयोगाच्या वेळी आजकाल यायला लागला आहे. सतत आपापसात बडबड करणे, मधून उठून जाणे, आपल्या सोबत आणलेल्या लहान मुलांना, सभागृह म्हणजे आपल्या घरचे अंगण आहे, असे समजून, खेळायला मोकळे सोडणे, असे प्रकार बरेचदा घडतात. कशाला येतात हे लोक समजत नाही.

मुळात 'सभ्य' या शब्दाची व्याख्याच मुळी 'सभेत बसण्यास योग्य तो सभ्य' अशी आहे. एखाद्याचे बोलणे 'ऐकणे' आणि 'श्रवण' करणे यात महदंतर आहे. श्रवण करणारा तो श्रोता, नुसते ऐकणारा नव्हे! ऐकलेले विसरले जाते, परंतु श्रवण केलेले मनात उतरते. जो मन लावून श्रवण करतो तो 'श्रोता.' श्रवण केल्यानेच 'ये हृदयीचे ते हृदयी' जाते. म्हणूनच संतांनी सांगितलेल्या नवविधा भक्तीत पहिले स्थान श्रवण भक्तीला दिलेले आहे.

**'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं।**
**अर्चनं वंदनं दास्यम सख्यात्मनिवेदनं।।'**
**श्रवण ही परमेश्वराची भक्ती आहे. समर्थ म्हणतात...**
**प्रथम भजन ऐसे जाण। हरिकथा पुराणश्रवण।**
**नाना अध्यात्म निरूपण। ऐकत जावे।।**
**सगुण देवांची चरित्रे। निर्गुणाची तत्त्वे यंत्रे।**
**हे दोन्ही परमपवित्रे। ऐकत जावी।।**
**ऐसे श्रवण सगुणाचे। अध्यात्म निरूपण निर्गुणाचे।**
**विभक्ती सांडून भक्तीचे। मूळ शोधावे।।'**

व्याख्याता किंवा प्रवचनकार यांचे बोलणे मन आणि श्रवणेंद्रिय एकाग्र करूनच श्रवण करावी लागतात. यात किंचितही विक्षेप आला तर मागचे-पुढचे सर्व संदर्भ सुटतात. व्याख्यान कुणाचेही असो, त्याच्या मुळाशी बीजस्वरूपातील एक विचार असतो. तो समजून घ्यायला संपूर्ण विवेचन मनापासून श्रवण करावे लागते. ऐन युद्धापूर्वी कुरुक्षेत्रावर भगवंताने अर्जुनाला १८ अध्यायांची गीता सांगितली, कशाला? त्यामागे बीज विचार काय होता, हे समजायला अर्जुनाच्या तोंडी असलेला १८ व्या अध्यायातील एक श्लोक पुरेसा आहे. तो असा...

**'नष्टो मोहः स्मृतीर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत।**
**स्थितोऽस्मि गतसन्देहः करिष्ये वचनं तव ।।'**

'माझा मोह नष्ट झाला आणि माझे खरे स्वरूप मला कळले आणि मी संशयरहित झालो' या अर्जुनाच्या उद्गारांनी आकलन होते की, कशासाठी गीता सांगितली. आपल्यालाही सर्वप्रसंगी हेच आचरावे लागते. कारण प्रपंचात अनेकदा आपला 'अर्जुन' होतो. अर्जुनाने गीता नुसती ऐकली नाही, ती श्रवण केली होती. अर्जुन हा श्रेष्ठ श्रोता होता. म्हणूनच, 'जे अर्जुनाच्या पंक्तीला बसायला योग्य आहेत, अशांनी अवधान द्यावे' असे माउली म्हणते. श्रवणात कुठलेली व्यवधान नकोअसते, तरच अवधान जागृत राहते. श्रोत्यांनी सतत सावधचित्त असावे यासाठी योगिराज ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरीत अनेकदा श्रोत्यांची, अत्यंत हळुवार शब्दात विनवणी केलेली आहे. पहिल्याच अध्यायात ते म्हणतात...

**'जैसे शारदेचिये चंद्रकळे। माजीं अमृतकण कोवळें। तें वेचिती मने मवाळे। चकोर तलगे।। तियापरी श्रोता। अनुभवावी हे कथा। अतिहळुवारपण चित्ता। आणुनिया।।'**

शरदाच्या चांदण्यात चकोराची पिले अत्यंत हळुवारपणे कोवळे अमृतकण वेचतात, ते हळुवारपण आपल्या मनात साठवून ही कथा, श्रवण करा, असे न सांगता माउली, 'अनुभवावी' म्हणतात. म्हणून सभेत बसून भाषण श्रवण करणे हा अनुभव असायला हवा. सभेत बसून बाष्कळ बडबडणे आणि सतत फोनवर बोलणे याने, अनुभव तर सोडाच, परंतु कवडीचेही आकलन होत नसते हे, अशा श्रोत्यांना कोण सांगेल? **'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी । एकतरी ओवी अनुभवावी'** असे म्हटले आहे. एक तरी ओवी पाठ करावी, सांगावी, गावी, म्हणावी असे सांगितलेले नाही. कारण श्रवण हा अनुभव असतो. इतकेच नव्हे, तर श्रवण ही अभ्यासाची पहिली पायरी आहे. श्रवण, वाचन, चिंतन आणि मनन असे पुढे जावे लागते. आपण जितके चांगले आणि उत्तम श्रवण करू व वाचू तितके आपण उत्तम लिहू व बोलू. शाळेत आणि महाविद्यालयात शिकत असतानाच ही सवय लागायला हवी. पूर्वीच्या काळी सामान्य समाज बहुशः निरक्षर-अशिक्षित होता.

समाजधुरिणांनाही हे ठाऊक होते. म्हणूनच कीर्तन-प्रवचन अशा उपक्रमांमधून त्यांनी श्रवणाचे माध्यम वापरले व समाज जागृत केला. व्याख्यान किंवा कीर्तन-प्रवचन हा वक्ता व श्रोता यामधील परस्पर संवाद असतो. या संवादातूनच मन संस्कारित होत असते. 'इकडून तिकडे गेले वारे' यानुसार 'पालथ्या घागरीवर पाणी' ही अपेक्षा श्रवणात नाही. ज्ञानदेवांनी श्रोत्यांना परमेश्वरस्वरूप समजून अतिशय लडिवाळपणाने त्यांना वारंवार विनंती केली आहे. तसे श्रोतेही त्यांना त्याकाळी मिळाले. त्यांच्यासारखा वक्ता आणि समोर श्रद्धाळू श्रोता तो अनुभवच अनुपम असेल.

**'तरी अवधान एक दीजे । मग सर्वसुखासी पात्र होईजे।**
**हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड ऐका।।**
**परी प्रौढी न बोले हो जी। तुम्हा सर्वज्ञांचा समाजी।**
**देयावे अवधान हे माझी। विनवणी सलगीची।।'**

मी सांगत असताना तुम्ही पूर्णरूपेण श्रवण करा, अशी ते वारंवार विनंती करतात. 'प्रभू तुम्ही महेशाचीये मूर्ती' असा सन्मान ते श्रोत्यांना देतात. आपल्या सभोवतालचा समाज हा अशिक्षित असला, तरी तो श्रद्धाळू आहे, हे त्यांना ठाऊक होते. संभ्रमावस्थेत असलेल्या सामान्य माणसाला आध्यात्मिक आधार देऊन, समाजाला योग्य दिशा दाखवली तर समाजात परिवर्तन घडेल, ही त्यांची पक्की खात्री होती. ते करणे त्याकाळी आवश्यक होते. त्यासाठी ज्ञानदेव श्रोत्यांना मोठेपण देतात.

**'अहो अर्जुनाचिये पांती। परिसणेया योग्य होती। तिहीं कृपा करुनि संती। अवधान द्यावे ।।'** असे सांगतात व श्रोत्यांनी दुश्चित्त असू नये असाही इशारा देतात. श्रोता जर दुश्चित्त असेल, तर त्याच्या आणि वक्त्यामधला संवाद निरर्थक होईल आणि रसहीन होईल,याची ते आठवण करून देतात.

**'म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे। तरी हृदयाकाश सारस्वते वोळे । आणि श्रोता दुश्चिता तरी वितुळे। मांडला रसु ।।'** दुश्चित्त श्रोते असले म्हणजे ना बोलणाऱ्याला समाधान ना ऐकणाऱ्याला समाधान. संवाद हे माध्यमच मुळात वेगळे आहे. (पान ६ वर)

प्रबंधांची बीजे

**श्रीरंग हिर्लेकर**

# भारतीय ज्योतिषशास्त्र



वेदांची षडांगे म्हणजे शिक्षा, कल्प, निरुक्त, व्याकरण, छंद आणि ज्योतिष. ज्योतिष आणि गणित यांचा संबंध इतका दृढ आहे की, ज्याला गणितात गती नसेल त्याने ज्योतिष शिकू नये. **'यथा शिखा मयूराणां नागानां मणयो यथा। तथा वेदाङ्गशास्त्राणां ज्योतिषं मूर्धनि स्थितम् ।।'** वरील श्लोकात ज्योतिष या शब्दाऐवजी गणित या शब्दाचाही प्रयोग केला जातो. श्लोकाचा अर्थ म्हणजे मोराचा तुरा, जातिवंत नागाच्या मस्तकावरील मणी त्याचप्रमाणे समस्त वेदा शास्त्रात ज्योतिष (किंवा गणित) शिरोधार्य आहे. वेदातील या सर्वश्रेष्ठ विषयासंबंधी प्राथमिक माहिती आणि आपल्या पूर्वजांनी त्यात केलेली प्रगती यांची किमान ओळख असणे अगत्याचे आहे.

ज्योतिषशास्त्राची सिद्धांत, संहिता आणि होरा अशा तीन स्कंधात विभागणी केली असून या तीनही स्कंधांचे अनेक उपविभाग आहेत. सिद्धांत विभागात कालमापन, अवकाशीय ग्रह, नक्षत्रे, त्यांची स्थिती व गती यासंबंधी गणितीय नियम व सूत्रे आहेत. संहिता विभागात ग्रहांची भ्रमणे, धूमकेतू, उल्कापात, चंद्रसूर्यांची ग्रहणे व त्यावरून युद्धे, वादळे, भूकंप, नैसर्गिक आपत्ती इत्यादी विचार केले आहेत. 'अह' म्हणजे दिवस आणि रात्र यावरून 'अहोरात्र' हा शब्द निर्माण झाला. त्यातील 'होरा' ही दोन अक्षरे घेऊन या विभागात व्यक्तीच्या आयुष्यासंबंधी सांगितले आहे. होरा म्हणजे तास या शब्दाची व्युत्पत्ती होरा शब्दातच आहे. या विषयातील ग्रंथांचे विषय व पद्धती म्हणजे जातक ज्योतिष, ताजिक, मुहूर्त, प्रश्नज्योतिष, वास्तुशास्त्र, स्वरोदय शास्त्र, शकून, अंकज्योतिष, रमलविद्या, केरळमध्ये प्रचलित असलेले नाडीज्योतिष आणि सामुद्रिक ऋषींचे अंगलक्षणे व हस्तरेषा असे आहेत. नाडीज्योतिष पद्धती तर आश्चर्यकारकच म्हणावी लागेल. त्या परंपरेतील विद्वानांकडे आपल्या हाताच्या अंगठ्याचा ठसा पाठवला की, त्यांच्याजवळील शेकडो वर्षांच्या ताडपत्रातून संबंधित पत्र काढून अभ्यासाने प्रश्नकर्त्याला मार्गदर्शन करतात.

हस्तरेषा म्हणजे बारकोड आणि अंगठ्याचा ठसा म्हणजे क्यू आर कोड रूपात ब्रह्मदेवाने लिहिलेला जातकाचा भाग्यलेखच! अशा अनेक पद्धतींवरून जातकाचे भूत, भविष्य व वर्तमानवर्तविले जाते. ताजिक ज्योतिष पद्धती आपण स्वीकारली असली, तरी मुळात ती यवनांकडील आहे. प्रथम आपण अवकाश संशोधनासंबंधी सिद्धांत विभागावरील आपल्या पूर्वजांच्या कार्यासंबंधी माहिती बघूया. 'भारतीय ज्योतिषशास्त्राचा इतिहास' हा महान ग्रंथ म्हणजे या विषयावरील एक ज्ञानकोशच. अवघे ४५ वर्षांचे आयुष्य लाभलेल्या दीक्षितांनी ज्योतिषविषयक अनेक संशोधनात्मक निबंध लिहिले आहेत. त्याकरिता त्यांना चारही वेद, उपनिषदे, संहिता, इतिहास, महाभारत व रामायणातील घटनांसंबंधी ज्योतिषीय संदर्भ अशा अनेक विषयांचा किती अभ्यास करावा लागला असेल हे त्यांनाच माहीत. अर्थात दीक्षितांची सर्वच मते ग्राह्य आहेतच असेही नाही. अनेक ऋचांचा नेमका अर्थ लावताना त्यासंबंधी भाष्यकारांची मतमतांतरे, वैदिक आणि पाणिनीय व्याकरणातील भेद व त्यामुळे होणारे अर्थांचे अनर्थ, काही संदर्भांचा अर्थ न लागणे, आकाशस्थ ग्रह नक्षत्रादिकांच्या हालचालींसंबंधी प्राचीन ज्योतिर्विदांच्या निरीक्षणातील त्रुटी, यामुळे दीक्षितांच्या ग्रंथातील काही विचार अमान्य वाटूनही त्यांच्या ग्रंथाचे मोल आज शंभराहून अधिक वर्षे अबाधित आहे.

दीर्घायुष्य लाभते तर त्यांनी स्वतःच काही सुधारणा केल्या असत्या. असेच लोकमान्यांच्या वेदकालनिर्णयासंबंधी व ज्योतिष संशोधनाचे. टिळकांनी 'आर्टिक होम इन द वेदाज्' आणि 'द ओरायन ऑर रिसर्चेस इनटू द अँटिक्विटिज ऑफ द वेदाज्' हे दोन ग्रंथ लिहिताना वेदांतील अनेक ज्योतिषविषयक संदर्भांचा अर्थ लावला. पुढे तर पंचांग गणितात सुधारणा सुचवून नवीन पंचांगही तयार केले. टिळकांच्या काही निष्कर्षांचे खंडन याच दीक्षितांनी व नागपूरच्या दफ्तरी या ज्योतिषतज्ज्ञांनी केले. पुढे टिळकांनीही आपल्या सिद्धांतातील काही त्रुटी मान्य केल्या. बापूसाहेब, केतकर, केरूनाना छत्रे, भाऊदाजी हेही असेच थोर ज्योतिष संशोधक. ही सर्व मंडळी आपल्या विषयात अतिशय तज्ज्ञ. प्रत्येकाच्या संशोधनात काही उणिवा राहिल्या हे खरे; पण तेवढ्यावरून कोणाचे अवमूल्यन किंवा त्यांच्यात श्रेष्ठकनिष्ठता न ठरवता हे या सर्वांचे एक टीमवर्क होते असे समजावे.

ऋग्वेदात स्वतंत्रपणे ज्योतिष हा विषय नाही. मात्र त्यातील अवकाश, चंद्रसूर्यनक्षत्रादी तसेच ऋतू, मास, वर्ष, काल, महाशिवरात्रीसारख्या पौराणिक कथांतून डोकावणाऱ्या नक्षत्र कथा, देवांच्या यज्ञात सारमेय कुत्रीने सांडलेल्या दुधाचा प्रवाह म्हणजे शांताबाई शेळके वर्णन करतात तशी वाहती आकाशगंगा की कटीची मेखला। आकाशगंगा म्हणजे विश्वपुरुषाची कटिमेखला या वर्णनावरून ऋषींच्या ज्योतिषविषयक ज्ञानाचे व रसिक दृष्टीचे स्तिमीत करणारे दर्शन होते. कृत्तिकादी २८ नक्षत्रांची नावे व त्यांच्या देवता प्रथम आढळतात त्या तैत्तरीय संहितेत. अनेक जण राशिभविष्य बघण्यासाठी दैनंदिन वृत्तपत्र उघडतात. मात्र वेदात रास हा प्रकारच नव्हता. ऋग्वेदीय आणि यजुर्वेदीय ज्योतिषावरील आधारित वेदांग ज्योतिष हा या विषयावरील सर्वांत प्राचीन ग्रंथ लगधाने लिहिला. यातील कित्येक वचनांच्या अर्थाविषयी विद्वानांत आजही मतभेद आहेत. यातही मेष वृषभादी प्रत्येकी ३० अंशाच्या १२ राशी आणि वार हा प्रकार नाही. तसेही विचार करता राशीपेक्षा नक्षत्रगणना हाच प्रकार अधिक सूक्ष्म आणि खात्रीचा आहे. युगकल्पना पाच वर्षांची असून त्यांची नावे संवत्सर, परि, इदा, अनु आणि इंद्र अशी होती. ३६६ दिवसांचे १ वर्ष असे असून चांद्र आणि सौर मास सांगितले आहेत; मात्र अयनचलन सांगितलेले नाही. कालांतराने वराहमिहिराने पंचसिद्धांतिका ग्रंथ लिहून पितामह, वसिष्ठ, रोमक, पुलिश आणि सूर्य अशा ज्योतिष सिद्धांतांचे संकलन केले. गर्ग, नारद, पराशर यांच्याही ज्योतिषसंहिता आहेत. ५ व्या ते १७ व्या शतकाच्या प्रदीर्घ कालखंडात आर्यभट्ट प्रथम व द्वितीय, ब्रह्मगुप्त, लल्ल, भटोत्पल, श्रीपती, भास्कराचार्य इत्यादी थोर ज्योतिषविद्वान होऊन गेले.

दक्षिण आणि उत्तर गोलार्धातील भ्रमण म्हणजे सूर्याची २ अयने. दीर्घकालात अवकाशातील भिन्न नक्षत्रातून अयनारंभ होणे म्हणजे अयनचलन. याविषयी स्पष्टपणे वराहमिहिराने सांगितले. तत्पूर्वी याविषयी विद्वानांत संभ्रम होता. वरील सिद्धांतात याविषयी १५० ते ७०० वर्षे इतके मतभेद होते. प्रत्यक्षात १६६ हे त्याचे खरे उत्तर. संपातबिंदू १ अंशाने सरकण्यासाठी जवळजवळ ७० वर्षे लागतात. वेदकालनिर्णयात टिळकांना याच अयनचलनाचा उपयोग झाला. रामायण-महाभारतादी पुरातन घटनांच्या कालनिश्चितीसाठी हेच संदर्भ महत्त्वाचे ठरतात.

**संशोधनाला भरपूर संधी:** दुर्दैवाने मागील पिढीतील अवकाश गणितींची महान परंपरा तुरळक अपवाद वगळता म्हणावी तशी सशक्तपणे पुढे चालली नाही.

आजही यात संशोधनाला भरपूर संधी आहेत. यासाठी तत्कालीन संस्कृत व्याकरणाचा अभ्यास, वेद वाङ्मयाचा चिकित्सक बुद्धीने अन्वय लावणे आवश्यक आहे. बहुधा सर्वजण फलज्योतिषावरच समाधान मानतात. मात्र त्यातही मूलभूत संशोधनाचा अभावच आढळतो. ज्योतिषात पारंगतता हवी असेल तर संस्कृत आणि गणिताला पर्याय नाही, असे माझे मत आहे. पराशर संहितेचे भाषांतर करताना मला हे पदोपदी जाणवले. उदा. महर्षी एकाच गुरू ग्रहाला जेव्हा जीव, बृहस्पती आणि गुरू हे तीन शब्द समानार्थी म्हणून योजतात ते त्यांना त्यातून गुरू ग्रहाचे अनुक्रमे संततिकारक, विद्वत्तादायक आणि वृद्धिकारक गुणधर्म सांगायचे असतात म्हणून. (पान ६ वर)

समाजभान

**स्वाती पेशवे**

# दिवे मंदावले तरी प्रकाश चिरंतन



**दिवाळी हा अवघ्या काही दिवसांचा सण. मात्र दिव्यांची रोषणाई मनामनाला प्रकाशमान करणारी. आताही त्याची अनुभूती येत आहे. दिवाळीनंतर लगोलग लग्नसराई सुरू होते. तुळशी विवाहानंतर घराघरात पुन्हा एकदा फराळाचा सुगंध दरवळतो. मागे राहिलेल्या खरेदीची धांदल उडते. हा सगळा माहोल दिवाळीची गंमत ताजीतवानी ठेवतो. दिवाळी पुढे सरली तरी हा आसमंत मोहात पाडतो.**

भारलेपण ही आयुष्यात वारंवार अनुभवायला मिळणारी स्थिती असते. काही 'स्थितप्रज्ञ' वगळता प्रसन्नता, मंत्रमुग्ध करणारे आविष्कार, उत्तम संगीत, उत्तम वातावरण, आल्हाददायक सोबत आपल्याला भारावून टाकते. मरगळलेल्या चित्तवृत्ती टवटवीत होतात, वसंत असो वा नसो, पालवी फुटते आणि मनाचा गाभारा मोहोरून येतो. कधी कधी एखादा हलकासा क्षण, संवाद, स्पर्शही झुलवण्यासाठी पुरेसा ठरतो. असे असताना दिवाळीसारखा सण तर एखाद्या पर्वणीसमान असणे अगदी स्वाभाविक आहे. खरेदीपासून आप्तस्वकीयांच्या हृद्य भेटीगाठींपर्यंत आणि सुरेल मैफिलींपासून सुग्रास भोजनापर्यंत नानाविध आनंदवाटांवरून फेरफटका घडवून आणणारे हे दिवस मरगळ, कंटाळा, वैमनस्य अशा रावणरूपी विकारांना दसऱ्यापश्चातही जाळतात आणि या दहनातून कुठेतरी हरवल्यासारखे वाटणारे आपणच स्वतःला भेटतो.

आताचे दिवसही तसेच आहेत. दिवाळीचा 'आनंदपूर' आता ओसरत आहे. आणखी एक दिवाळी आठवणींच्या कप्प्यामध्ये सामावली जात आहे. या दिवाळीचे नव्या पिढीने केलेले स्वागत पाहून आपले बालपण जणू नव्याने अनुभवले आहे तर काही कातर जिवांनी दिवेलागणीला सोडलेले दीर्घ उसासे कानी पडताच आपण मनातील गलबल, दाटून आलेला हिंदका कसाबसा थांबवला आहे. काही जण गावाकडील दिवाळी संपवून आता कर्तव्यस्थानी परतले असतील तर काही अजूनही भटकंतीच्या ठिकाणांवर रेंगाळत फुलपाखरासारखे विहरत असतील. पण कितीही उडले तरी पक्ष्यांना दाण्यापाण्यासाठी मूळ ठिकाणी यावेच लागते. तेव्हा आपणही त्यास सज्ज होत नवीन संवत्सरात कार्यमग्न होऊ या.

दिनक्रमाकडे परतू या. परतू पाहणाऱ्या या दिवाळीचा उत्साह अजूनही दरवळतो आहे आणि पुढचे काही दिवस आपली सोबत करण्याजोगी मनःस्थिती निर्माण केली पाहिजे, कारण दिवाळीचे दिवे शांतवत असले, तरी मनातला प्रकाश चिरंजीव असतो. दिवाळी संपली असली तरी तो मन तेजाळत ठेवतो. म्हणूनच त्याचे जतन करण्याचा प्रयत्न करायला हवा. अर्थात यंदाच्या दिवाळीला अतिवृष्टीची किनार होती. शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान ल्याने बाजार काहीसा नरम होता. अगदी फुलांपासून बालगोपाळांसाठी खरेदी केल्या जाणाऱ्या मातीच्या किल्ल्याखेळण्यांपर्यंत वाढत्या किमतीचा भार ग्राहकांना सोसावा लागला. खरेदीचा ऐन भर असताना सोन्या- चांदीसारख्या मौल्यवान दागिन्यांनी किमतीचा उच्चांक गाठल्यामुळे अनेकांचे मनोरथ अपुरे राहिले हे खरे; त्यातही सुवर्णमध्य साधत काहींनी कमी वजनाचे आणि कमअस्सल दागिने खरेदी करत दुधाची तहान ताकावर भागवल्याचे दिसले.

नोंद घेण्याजोगी बाब म्हणजे सोन्याच्या दरात प्रचंड वाढ असूनही सोने आणि चांदीच्या नाण्यांची विक्री लक्षणीय झाली. त्याचबरोबर जागोजागी भरलेल्या प्रदर्शनांमध्ये स्थानिक उत्पादनांना आणि हस्तकलेला उत्तम प्रतिसाद मिळाला. या खरेदीमुळे केवळ ग्राहकच समाधानी झाले असे नाही, तर लघुउद्योग आणि किरकोळ विक्रेत्यांनाही अर्थचक्र सुरू ठेवण्यासाठी मोठा आधार मिळाला. वाहनांच्या खरेदीबाबत बोलायचे तर यंदा विजेवर चालणाऱ्या वाहनांची चांगली विक्री झालेली दिसली. चारचाकी गाड्यांच्या खरेदीमध्ये मोठ्या आणि आलिशान गाड्यांना चांगली मागणी दिसली. अशा नानाविध घटकांच्या खरेदीमध्ये डिजिटल पेमेंट आणि ऑनलाईन खरेदीचा ट्रेंड विशेष लक्षवेधी ठरला. 'फेस्टिव्हल सेल' आणि 'बिग डिस्काऊंट'च्या जाहिरातींनी अनेकांना खरेदीसाठी प्रवृत्त केले.

थोडक्यात सांगायचे तर, विक्रेत्यांचे, उत्पादकांचे, फराळ निर्मात्यांचे खिसे धरणातून पाणी सोडल्यानंतर फुगणाऱ्या नदीपात्राप्रमाणे भरले. पर्यावरणपूरक दिवाळीकडे पडलेले यंदाचे पाऊलही दखलपात्र म्हणावे लागेल. गेल्या काही वर्षांपासून नागरिकांमध्ये 'ग्रीन दिवाळी'ची जाणीव वाढताना दिसते आहे.

फटाक्यांचा आवाज आणि धूर टाळून शांत, पर्यावरणपूरक दिवाळी साजरी करण्याची वृत्ती बळावत आहे. मातीच्या दिव्यांना, घरगुती सजावटीत पुनर्वापराच्या वस्तूंना आणि स्थानिक उत्पादनांना लोक प्राधान्य देत आहेत. यंदाही काही शाळा, संस्था आणि समाजसेवी संघटनांनी प्रदूषणमुक्त सणाचे संदेश देत स्वच्छता मोहिमा राबविल्या. दिवाळीनिमित्त जागोजागी सामाजिक उपक्रम हाती घेण्यात आले. गरजूंना अन्न, फराळाचे जिन्नस, नवे कपडे आदींचे वाटप करण्यात आले. काहींनी वृद्धाश्रम वा अनाथालयांमध्ये दिवाळी साजरी केली. श्रमदानाचे कार्यक्रम रंगले. अशा उपक्रमांमुळे सणाचा आनंद टिकवून ठेवत पर्यावरण जपण्याची सवय समाजात रुजते आहे, असे आपण म्हणू शकतो.

दिवाळीच्या काळात पाऊस परतीच्या प्रवासाला लागतो आणि थंड हवेचा हलकासा स्पर्श जाणवू लागतो. दुपारच्या वेळी ऑक्टोबर हिटने तडाखा दिला तरी पहाटेचा आणि रात्रीचा गारवा येणाऱ्या थंडीचे पदरव दाखवून देतात. हे सगळे बदल नव्या ऋतूचा आरंभ सूचित करतात. अशा हवेत मनही ताजेतवाने होते. सध्या आपण हीच स्थिती अनुभवत आहोत. शहरांमधील प्रदूषण आणि गर्दीतून थोडा विरंगुळा घेण्याचा हा काळ आहे. नाताळ आणि वर्षअखेरीचे निमित्त साधत अनेक जण त्याचे नियोजन करतात. एकंदर विद्यार्थी, नोकरदार आणि उद्योजक असे सगळेच या काळात नव्या संकल्पांना आकार देतात. दिवाळीनंतर नव्या जोमाने काम सुरू करायची भावना प्रत्येकाच्या मनात दृढ होते. आताही ती दिसते आहे.

आजच्या धावपळीच्या जीवनात फुरसतीचे काही क्षण फार दुर्मिळ झाले आहेत. म्हणूनच अनेक जण आता 'फॅमिली टाईम'लाही अधिक महत्त्व देत आहेत. काही ठिकाणी दिवाळीनंतर 'पोस्त-दिवाळी गेट-टुगेदर', सांस्कृतिक कार्यक्रम आणि समाजभोजनाचे आयोजन केले जात असून यातून समाजबंध अधिक बळकट होण्यास मदत होते आहे. तसे म्हणायचे तर दिवाळीच्या फराळाचा मोह टाळणे कठीण असते. त्यापायी काही नियम बाजूला ठेवले जातात. हात थोडा सैल सोडला जातो. पण सणाचे महत्त्वाचे दिवस संपल्यानंतर आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. त्यामुळेच अनेक जण आता 'डिटॉक्स डाएट' तसेच योग आणि वॉकिंग सुरू करीत आहेत. परिणामस्वरूप फिटनेस सेंटरमध्येही या काळात नोंदणी वाढते. ही जाणीव समाजात आरोग्याबद्दलची जबाबदारी निर्माण करते.

दिवाळीनंतरच्या नव्या आरंभाचा एक सकारात्मक पैलू म्हणून आपण याकडे पाहू शकतो. दिवाळीनंतर काही दिवसांमध्ये विवाह सोहळ्यांचा आणि समारंभांचा हंगाम सुरू होतो. त्यामुळे सजावट, केटरिंग, फुलवाले, ट्रॅव्हल एजन्सीज आणि कपड्यांच्या व्यवसायाला मोठी चालना मिळते. लघुउद्योग, हस्तकला, मिठाई उद्योग आणि ऑनलाईन विक्रेते यांच्यासाठी दिवाळीनंतरचा काळही आर्थिक भरभराटीचा ठरतो. येऊ घातलेली लग्नसराईदेखील दिवाळीचा आनंद कायम राखण्यास मदत करते. सध्या त्याची अनुभूती येत आहे. यावर्षी 'डिजिटल दिवाळी'चा ट्रेंड विशेष.

# ग्रहसंकेत

**(रविवार, २ नोव्हेंबर ते शनिवार, ८ नोव्हेंबर २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर

ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

**✻ रविवार, २ नोव्हेंबर-** भागवत एकादशी, तुलसी विवाहारंभ, पंढरपूर यात्रा, चतुर्मास्य समाप्ती, श्री विष्णू प्रबोधोत्सव, मन्वादि, शाक गोप अव्रत समाप्ती, संत नामदेव महाराज जयंती, श्री हरिहरेश्वर यात्रा श्रीवर्धन **✻ सोमवार, ३ नोव्हेंबर-** सोम प्रदोष, वैकुंठ चतुर्दशी उपवास आवळीचे झाडाखाली श्री विष्णू पूजन, मध्यरात्री विष्णू पूजन, अरूणोदयी श्री शिव पूजन, गोरक्षनाथ प्रकट दिन **✻ मंगळवार, ४ नोव्हेंबर-** वैकुंठ चतुर्दशी, आवळी पूजन व भोजन, वासुदेव बळवंत फडके जन्मदिन, शंभुअप्पा यात्रा इस्लामपूर, पंचक दुपारी १२: ३४ पर्यंत. **✻ बुधवार, ५ नोव्हेंबर-** त्रीपुरादि पोर्णिमा, गुरू नानक जयंती, कार्तिक स्नान समाप्ती, तुलसी विवाह समाप्ती, कुलधर्म, मन्वादि, अन्वाधान, सोपानदेव जयंती, भैरवनाथ यात्रा करडे (शिरूर), भगवानगड यात्रा खारवंडी (पाथर्डी), मराठी रंगभूमी दिन, श्री महालक्ष्मी, वार्षिक अन्नकुट मुंबई, देवी शांतदुर्गा जत्रा खोकरात, सिध्देश्वर यात्रा आडी (चिक्कोडी) **✻ गुरुवार, ६ नोव्हेंबर-** श्री हलसिध्दनाथ जागर कुरणी (कागल), देवी माऊली जत्रा सोनुर्ली (सावंतवाडी) **✻ शुक्रवार, ७ नोव्हेंबर-** शिशु संरक्षण दिन, रामनाथदेव यात्रा माजाळी (कारवार), संत राणोजीबुवा भंडारा सांगोला **✻ शनिवार, ८ नोव्हेंबर-** संकट चतुर्थी (चंद्रोदय- मंबई- २०: ४१, अहिल्यानगर- २०: ३३, कलबुर्गी-२०: २९, कोल्हापूर-२०: ४१, जालना-२०: १६, धाराशिव-२०: ३०, नांदेड-२०: २१, पंढरपूर-२०: ३४, परभणी-२०:२४, पुणे-२०: ३८, बीड-२०: १९, बीदर-२०: २४, लातूर-२०: २७, विजापूर-२०: ३४, छत्रपती संभाजीनगर-२०: २८, सांगली-२०: ३९, सातारा-२०: ३९, सोलापूर-२०: ३२), देव कलेश्रश्श्वर जत्रा कोलगाव (सिंधुदुर्ग)

**मुहूर्तः-✻ साखरपुडा-** ३, ४, ७ नोव्हेंबर **✻ डोहाळ जेवण-** ४ नोव्हेंबर (१३ नंतर) **✻ बारसे-** ३, ७ नोव्हेंबर **✻ गृहप्रवेश-** ३, ७ नोव्हेंबर

### मेष :- घरकुल स्वप्न साकार

रविवारचा शुक्र- गुरु केंद्रयोग कौटुंबिक जीवनात सौख्यदायी घटना घडविणार आहे. स्थावर बाबतीत अनुकूलता राहील. घरकुलाचे स्वप्न साकार होऊ लागेल. आर्थिक गुंतवणूक योग्य प्रकारे करावी. वारसा हक्काने संपत्ती मिळेल. अनावश्यक खर्च टाळावेत. सुसंधी लाभतील. शुभ ता. ४, ७

### वृषभः- अपेक्षित कामे होतील

राशी स्वामी शुक्राचा गुरुशी होणारा केंद्रयोग कलागुणांचा विकास करणार आहे. स्पर्धेमध्ये यश मिळेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. स्वमताग्रह टाळावा. भावंडाबाबत सौख्याच्या घटना घडतील. गृहनिर्माण, विधी अशा व्यवसायात प्रगती घडेल. सरकारी कामे करून घ्यावीत. धार्मिक कार्यात पुढाकार घ्याल. नव्या विचारांना चालना देता येईल. अपेक्षित कामे होतील. शुभ ता. ३, ७

### मिथुनः- सुसंधी लाभतील

धनस्थ गुरुचा पंचमातील शुक्राशी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. ज्ञानदान, बँक, विमा अशा व्यवसायात प्रगती होईल. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान वाटेल. यांत्रीक क्षेत्रात सुसंधी लाभतील. संतती सौख्य लाभेल. गुढ विद्येतप्रगती होईल. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. उत्साहवर्धक घटना घडतील. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. ४, ७

### कर्कः- सुख स्वास्थ लाभेल

राशीतील गुरु चतुर्थातील शुक्राशी केंद्रयोग करीत आहे. कौटुंबिक, वाहनविषयक सौख्य लाभेल. वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. सुख स्वास्थ्य लाभेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघेल.
फार चिंता करू नका. शुभ ता. ३, ४

### सिंहः- विचाराने रहावे

गुरु- शुक्राचा केंद्रयोग उपजत कलागुणांचा विकास करणार आहे. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. सरकारी कामे करून घ्यावीत. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. धार्मिक, सामाजिक कार्य होतील. भावंडाबाबत शुभ घटना घडतील. कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. नवीन बदल सध्या नकोत. फार दगदग करू नका. प्रवास टाळावेत. शुभ ता. ३, ७

### कन्याः- नव्या संधी लाभतील

धनस्थ शुक्राचा लाभातील गुरुशी होणारा केंद्रयोग आर्थिक अडचणीतून मार्ग काढणार आहे. नोकरी व्यवसायात नव्या संधी लाभतील. ज्ञानद-ान, बँक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. प्रशासन सेवेत अनुकूलता लाभेल. गायन वादनादि केलेत मनासारख्या घटना घडतील. फार विचार करू नका. अपेक्षित कामे होतील. चिंता नको. शुभ ता. ४, ७

### तुलाः- कौटुंबिक सौख्य

राशीतील राशी स्वामी शुक्राचा कर्मस्थ गुरुशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. कौटुंबिक जीवनात सौख्य लाभेल. वैद्यकीय, माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती घडेल. नव्या संधीचे स्वागत करावे. अडचणीतून मार्ग निघाल्याने समाधान लाभेल. आत्मविश्वास वाढेल. शुभ ता. ४, ७

### वृश्चिकः- उत्साह धडाडी वाढेल

भाग्यातील गुरुचा शुक्राशी होणारा केंद्रयोग भाग्योदयकारक घटना घडविणारा आहे. उत्साह, धडाडी वाढेल. अंगच्या हुशारीने विविध कार्य मार्गी लावू शकाल. उपजत कलागुणांना चांगल्या संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघेल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. ४, ७

### धनुः- अपेक्षित कामे होतील

लाभातील शुक्राचा गुरुशी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. जुने येणे वसूल होईल. प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. नव्या संधी लाभतील. नवीन गुंतवणूक विचाराने करावी. गुढ शास्त्रात प्रगती होईल. संततीबाबत शुभ घटना घडतील. अडचणीतून मार्ग निघेल. शुभ ता. ३, ७

### मकरः- नव्या संधी लाभतील

कर्मस्थ शुक्राचा सप्तमातील गुरुशी होणारा केंद्रयोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. नोकरीत अधिकार वाढतील. यांत्रीक क्षेत्रात नव्या संधी लाभतील. नव्या ओळखी लाभप्रद ठरतील. वैवाहिक जीवनात शुभ घटना घडतील. संशोधन क्षेत्रात प्रगतीचा नवा टप्पा गाठाल. शुभ ता. ३, ७


### कुंभः- विचाराने रहावे

भाग्यातील शुक्राचा गुरुशी होणारा केंद्रयोग अपेक्षित प्रगती करणारा आहे. नव्या कामांना गती मिळेल. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघेल. विचाराने रहावे. चिकाटीने केलेली वाटचाल लाभप्रद ठरेल. वैद्यकीय क्षेत्रात प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. अनुकूलतेचा लाभ उठवावा. मनासारख्या घटना घडतील. शुभ ता. ३, ४

### मीनः- अपेक्षित प्रगती

गुरू शुक्राचा रविवारी होणारा केंद्रयोग आर्थिक प्रगती करणारा आहे. विचाराने केलेली वाटचाल लाभप्रद ठरेल. शिक्षण अनुभव यातून मनासारखे काही साध्य करू शकाल. अपेक्षित प्रगती साधता येईल. अनुकूलतेचा लाभ उठवावा. स्पर्धांमध्ये यश मिळेल. नव्या योजना मार्गी लावता येतील. फार चिंता करू नका. मार्ग निघेल. शुभ ता. ७

!! शुभ भवतु !!



# त्रिंगलवाडी

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

सह्याद्रीच्या पश्चिमेकडे पसरलेल्या डोंगररांगेत त्रिंगलवाडी, ळवंतगड, कावनई हे किल्ले वसलेले आहेत. इगतपुरीपासून जवळ असलेल्या डोंगररांगेतील हे किल्ले मुख्यतः व्यापारी मार्गाच्या संरक्षणासाठी बांधण्यात आले. चौल बंदरात उतरणारा माल थळ घाटाच्या मार्गाने नाशिकच्या बाजारपेठेत आणत, त्यामुळे या मार्गाला संरक्षण आवश्यक होते. त्रिंगलवाडी हा गिरीदुर्ग प्रकारात मोडत असून किल्ल्याची उंची साधारण ३२५० फूट आहे. नाशिकवरून इगतपुरी- घोटी- त्रिंगलवाडी या मार्गाने पायथ्याच्या गावात पोहोचता येते.

त्रिंगलवाडी फारसा प्रसिद्ध किल्ला नसला, तरी येथे गर्दी कमी असल्याने गिर्यारोहकांच्या आवडीचे ठिकाण आहे. गडावर जायला तीन- चार मार्ग आहेत. गिर्यारोहक एकच किल्ला विविध मार्गाने सर करतात. आपल्याला सोयीचा असलेला मार्ग आपण निवडावा. पहिला मार्ग इगतपुरीहून जातो. इगतपुरी स्थानकावरून साधारण अर्धा-पाऊण तासात आपण त्रिंगलवाडी गावात पोहोचतो. गावाच्या मागे त्रिंगलवाडी धरण आहे. धरणाचे मनोहारी दृश्य पाहून झाले की, उजवीकडे जाणाऱ्या वाटेने अर्धा तास चालत आपण गडपायथा गाठायचा. गडपायथ्याशी असलेल्या पांडवलेणी पाहून गड चढायला सुरुवात करावी. दुसरी वाट कसारा घाटातून जाते. घाट चढून गेल्यावर इगतपुरीच्या पुढे टाके गाव आहे. या गावातून त्रिंगलवाडी मार्गे तळ्याची वाडीपर्यंत जावे. तळ्याची वाडी येथील तलावाच्या बाजूने शेताच्या बांधावरून चालत गडपायथा गाठावा.

तिसरा मार्ग म्हणजे इगतपुरी स्थानकावरून विपश्यना विद्यापीठाकडे जावे. विद्यापीठाचे प्रवेशद्वार आले की समोर दिसणाऱ्या डोंगरसोंडेवर चढावे. ही वाट एका कातळकड्याखाली जाते. तो कडा उजवीकडे ठेवत चालत राहिलात की अर्ध्या तासात गडपायथ्याला पोहोचतो. गडासाठी एक वाट चिंचोली गावातूनसुद्धा जाते. कसाऱ्यावरून जव्हार- मोखाडा-विहीगाव मार्गाने चिंचोली गावात पोहोचावे. गावाच्या मागील जंगलातून किल्ल्याच्या मध्यभागी असलेल्या पठारावर रस्ता जातो. पठारावर चांदवाडी आणि जांभूळवाडी अशा दोन वाड्या आहेत. दोन्ही वाड्यांच्या मधून गडावर जायला वाट आहे. ही वाट लांबची तसेच निसरडी असल्याने सहसा कोणी तिच्या वाटेला जात नाही. किल्ल्यावर मुक्काम करायची वेळ आलीच तर गुहेत राहण्याची सोय होऊ शकते, परंतु आपण खाण्याची आणि पाण्याची सोय करूनच किल्ला चढायला सुरुवात करावी.

गडावर जाण्यासाठी त्रिंगलवाडी गावातून जाणे सर्वात सोयीचा आणि जवळचा मार्ग आहे. त्रिंगलवाडी किल्ल्याच्या पायथ्याशी जैन लेणी आणि वाकी नदीच्या उगमस्थानावर झांझ राजाने बांधलेले महादेवाचे मंदिर आहे. किल्ल्याची निर्मिती साधारण १० व्या शतकात झाली असून १६८८-८९ मध्ये हा किल्ला मोगलांनी फितुरी करून ताब्यात घेतला. पायथ्याच्या त्रिंगलवाडी गावात पांडवलेणी आहेत. या एकूण आठ गुहा आहेत. त्यातील सहा गुहा गावात आणि दोन गुहा डोंगरावर आहेत. आयताकार लेणीची ओसरी, मंडप आणि गाभारा अशी रचना आहे. मंडपाच्या प्रवेशद्वारावर छान कोरीव काम केले आहे. दरवाज्यावर वरती भारवाहू यक्ष कोरलेले दिसतात; त्यांनी छताचा भार उचलला आहे.

गाभाऱ्यात वृषभनाथांची पद्मासन स्थितीतील मूर्ती आहे. खांबांवर सुंदर नक्षीकाम केले आहे. वृषभनाथांची मूर्ती भग्न झाली असून सभामंडपाच्या खांबांची पडझड झाली आहे. लेण्यांच्या बाजूला पाण्याचे कुंड आहे. या लेण्यांच्या बाजूची वाट गडावर जाते. आपण चढायला सुरुवात केल्यावर साधारण १५-२० मिनिटात आपण डोंगरसोंडेवर पोहोचतो. येथून सम ोर किल्ल्यावर जायला दोन वाटा आहेत. कातळकड्याच्या उजवीकडून जाणारी वाट आणि डावीकडून जाणारी वाट, आपण डावीकडून चढायला सुरुवात केली तर पायऱ्यांच्या आधीचा एक कातळटप्पा काळजीपूर्वक चढून पार करावा लागतो. कातळटप्पा पार केल्यावर कातळातच खोदलेल्या थोड्या उंच पायऱ्या आहेत. पायऱ्या चढून गेल्यावर समोरच श्री हनुमानाची मूर्ती आहे. ही वीर मारुतीची मूर्ती असून त्याच्या पायाखाली पनवती आहे. दर्शन घेऊन पुढे गेलो की, उजव्या बाजूला छान कातळ कोरीव प्रवेशद्वार आहे. या दाराला कल्याण दरवाजा म्हणतात. प्रवेशद्वारावर चंद्र आणि सूर्याचे शिल्प तसेच दोन्ही बाजूला शरभ शिल्प कोरले आहे. कातळ फोडून पायऱ्या करणे, प्रवेशद्वार करणे, पाण्याची साठवणूक व्हावी म्हणून टाके खोदणे, गुहा खोदणे, कातळशिल्प कोरणे हे त्यावेळच्या लोकांचे विलक्षण कसब पाहून आज आश्चर्य वाटते. प्रवेशद्वारातून आत प्रवेश केला की गडाचे सर्वोच्च शिखर दिसते. शिखराच्या पलीकडच्या बाजूला वाड्याचा चौथरा आहे. त्याच्या समोर खांब रोवण्यासाठी बांधलेले खळगे दिसतात.

समोरची पायवाट आपल्याला गडाच्या सर्वोच्च शिखरावर घेऊन जाते. या वाटेवर कातळात कोरलेली एक गुहा आहे. गुहा मोठी आहे. त्यामुळे गरज पडल्यास मुक्काम करता येतो. समोर गेल्यावर अजून एक गुहा आहे. या गुहा गडावरील ऊन, सोसाट्याचा वारा, पाऊस यापासून संरक्षण करण्यासाठी फारच उपयोगी असतात. उंचावरील वाऱ्याचा अनुभव सह्याद्रीतील कुठल्याही गडावर गेल्यावर आपल्याला येतोच. पावसाळ्यात ज्यांनी सह्याद्रीत ट्रेक केले आहेत त्यांना सोसाट्याचा वारा, तुफान वेगाने कोसळणारा पाऊस याचा अनुभव घेतला असेलच. गुहा पाहून पुढे गेल्यावर श्री महादेवाचे मंदिर आहे. मंदिरासमोरून कड्याच्या टोकाला गेल्यावर कळसुबाई, हरिहर, भास्करगड तसेच सभोवतालचा संपूर्ण प्रदेश दृष्टीस पडतो. मंदिराच्या मागून चढत जाणारी वाट शिखरावरील ध्वजस्तंभाकडे जाते. गडाच्या अगदी शेवटच्या टोकापर्यंत जाऊन आल्यावरच गिर्यारोहकांना गड चढण्याचे समाधान मिळते. संपूर्ण गड फिरून झाला की खाली उतरायला सुरुवात करावी. उतरायच्या वाटेवर पुन्हा दोन वाटा फुटतात. आलो त्या वाटेने न उतरता दुसरीकडून जावे. तेथे वाड्याचा चौथरा, प्रवेशद्वार तसेच तटबंदीचे काही अवशेष दिसतात. पायऱ्या उतरताना उजव्या बाजूला एक गुहा आहे आणि पायऱ्या पूर्ण उतरून झाल्यावर समोर एक गुहा दिसते. गडमार्गातील मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या दोन्ही गुहांचा उपयोग त्या काळात टेहळणीसाठी होत असावा. संपूर्ण गडफेरी झाल्यावर वेळेत गड उतरण्यास सुरुवात करावी. संध्याकाळच्या आधी गडउतार झालेले कधीही चांगले असते. गिर्यारोहण करताना काही बाबी आवर्जून पाळल्या तर आपली भटकंती सुखाची आणि सुरक्षित होते. गिर्यारोहण म्हणजे साहसी आणि आव्हानात्मक छंद! हा छंद ज्याला जडतो त्याची पावले आपसूकच डोंगरांच्या दिशेला वळतात. गिर्यारोहण, पदभ्रमण हा छंद जडला की जीवन अनुभवसमृद्ध तसेच ऊर्जावाण होते. गिर्यारोहक कधी हार मानत नाहीत. जीवनात आलेल्या प्रत्येक संकटाशी, आव्हानांशी खंबीरपणे दोन हात करण्याची त्याला सवय लागते. आपल्या महाराष्ट्राला सह्याद्री आणि सातपुडा पर्वतरांगांचे वरदान लाभले आहे. विद्यार्थी जीवनात सातपुड्याच्या कुशीतील मेळघाट परिसरातून माझ्यात रुजलेला गिर्यारोहणाचा, पदभ्रम णाचा छंद पुढे सह्याद्रीच्या डोंगररांगेतील किल्ल्यांवर, हिमालयाच्या उत्तुंग बर्फाच्छादित शिखरांवर जाऊन विसावला. ट्रेकिंग करताना अनुभवले की, प्रत्येक डोंगररांगांचे आपले एक वैशिष्ट्य असते.

प्रत्येक भागातील संस्कृतीशी, परंपरांशी, श्रद्धेशी, भोजनाशी आणि माणसांशी आपले अनामिक नाते जुळते. पर्वताच्या, डोंगराच्या, किल्ल्याच्या शिखरावर सन्मानाने यशाचा झेंडा फडकविण्यात गिर्यारोहकांना विशेष आनंद असतो. निसर्गाचा सन्मान राखूनच निसर्गाशी मैत्री करता येते. हा संस्कार प्रत्येक घरात रुजायला हवा. पर्वतांचा आदर ठेवून त्यांच्यावर पाऊल ठेवले तर हे पर्वत, डोंगर, किल्ले तुम्हाला आपल्या अंगाखांद्यावर प्रेमाने खेळवतात आणि उंच शिखरावरील भन्नाट वाऱ्याचा सुगंध तुमच्या आयुष्यात भरतात.

पान २ वरून

## न गायलेला सूर

केवळ अद्भुत. व्यक्तापेक्षा अव्यक्ताची ताकद त्याक्षणी जाणवली. ही बाब शतप्रतिशत खरी आहे. कारण व्यक्त झालेले समजायला सहजच असते, परंतु अव्यक्ताची प्रचीती होण्याकरिता मनाची मनाशी एकरूपताच लागते. नव्या काळातील नवा मंत्र आपल्याला सांगतो की, जास्तीत जास्त व्यक्त व्हा. ते देखील एका दृष्टीने खरेच आहे. कारण तंत्रज्ञानाच्या जाळ्यात अडकल्यानंतर सारेच कसे वरवर असल्यागत वाटू लागते.

तंत्रज्ञानाच्या आधारे व्यक्त केलेल्या भावना या मनापर्यंत पोहोचतातच असे नाही. म्हणून निदान नात्यांमधील ओलावा टिकविण्यासाठी व्यक्त झाले पाहिजे ही काळाची गरज आपल्याला ओळखायला हवी. परंतु दोन व्यक्तींमध्ये एकदा दृढता निर्माण झाली की, मग मात्र अनेकदा व्यक्त होण्यापेक्षा अव्यक्ताचा आनंद अधिक असतो. अव्यक्त राहिलेले जेव्हा समजून घेतले जाते ना तेव्हा ते थेट मनाच्या अंतरंगापर्यंत पोहोचलेले असते. याकरिता दोन व्यक्तींचा सहवासच घडावा लागतो असेही नाही. कारण कधी कधी आयुष्यभराचा सहवास परमेश्वराने नेमून दिला असला, तरी असे मनातील अव्यक्त समजले जात नाही. याउलट बरेच वेळा नित्य सहवासाच्या पलीकडेही अव्यक्त जाणून घेण्याची क्षमता असलेली मने असतात. त्याचा आधार देवाणघेवाण नसून निखळ प्रेम असते. प्रेमाचे खरे स्वरूप कदाचित अव्यक्ताच्या आधारेच जास्त तीव्रतेने मनाला भावते. व्यावहारिक जगात हा विचार तसा अनेकांना रुचणे कठीण असतो कारण या सर्व प्रकारामध्ये भावना ही व्यवहारापेक्षा वरचढ असते. यामध्ये नफा किंवा तोटा याचा विचार केला जाऊ शकत नाही. पं. राजन व पं. साजन मिश्र यांनी सादर केलेली संगीत साधना ही व्यवहाराच्या पलीकडे जाऊन मनातील पवित्र भावनांचा आविष्कारच होती व त्यामुळेच ती ऐकणाऱ्यांच्या मनाला थेट भिडू शकली. परंतु त्या संपूर्ण मैफलीमध्ये त्यांनी सादर केलेल्या प्रत्येक सुरावटीचा आनंद घेत असताना मात्र स्मरणात राहिला तो त्यांनी न गायलेला सूर जो ऐकणाऱ्यांच्या मनात उत्पन्न झाला, ज्या सुराने 'अहं ब्रह्मास्मी'ची अनुभूती प्रत्येकाला प्राप्त करून दिली व आपल्या हृदयातही संगीतासारख्या पवित्र संवेदनेचा वास आहे याची जाणीव करून दिली, असा होता तो न गायलेला अव्यक्त सूर!

पान २ वरून

## चंदनाच्या विठोबाची माय

इथे 'वरण' असा शब्द आलेला आहे. त्याचा अर्थ होतो वरणे म्हणजे निवडणे. सातत्यानं उत्तम वर्तणुकीची निवड करत, आपल्या हातून नित्यनेमानं उत्तम आणि मंगलकारक तेच घडावं असा ध्यास घेणं हीच उपासना जीवनभर करायची. अशाच उपासकात देवत्व प्रस्फुटित होतं.

'नर ते नारायण' हा उन्नयन आणि उत्कर्षाच्या प्रवासाचा विचार आपल्या वैचारिक जडणघडणीत इतका मुरलेला आहे की, भक्ताचं भगवंताशी सायुज्य होणं म्हणजेच मुक्ती आणि मोक्ष. हे सनातनी व्यक्तीच्या जीवनाचं परमोच्च ध्येय आहे. या संस्कारातूनच समाजाचे सगळे घटक परमेश्वराशी संधान साधणारे होतील. त्यातून समाजपुरुष दिव्यत्व मिळवू शकेल. म्हणून मोक्ष मिळविण्याच्या ध्यासाला चौथा पुरुषार्थ म्हटलेलं आहे. तर असा हा अमूल्य संस्कार आपण अंगीकारू या.

पान ४ वरून

## परतफेड

एक दिवस तिची आई स्कुटीने नयनाला शाळेत सोडायला जाताना अचानक ब्रेक लावल्याने तिच्या आईचा तोल गेला, स्कुटी घसरून ती पडली आणि तिची आई शेजारून जाणाऱ्या वाहनाखाली येऊन गतप्राण झाली. नयना बाजूला डोक्यावर पडली आणि तिचा ब्रेनडेड झाल्याचे निदान झालं. या दुःखातून स्वतःला सावरून नयनाच्या वडिलांनी तिच्यावर प्रेम करणाऱ्या माझ्या डोळ्यांना दृष्टी मिळावी म्हणून तिच्या डोळ्यांचे मला दान दिले. हे सारे माझ्यासाठी दुःखदायक, अनाकलनीय होतं. दिवाळीच्या दिवशी नयनाच्या घरच्या अपघाताने माझी दृष्टी गेली होती ही वेदना नयनाला आणि तिच्या कुटुंबाला कायम सलत राहिली. नयनाच्या डोळ्यांच्या दानाने त्यांनी मला केलेली ही परतफेड होती. आम्ही गावाकडे निघालो, डोळ्यांतील अश्रू थांबवता थांबवत नव्हते आणि सम ोरच्या आरशातून मला नयना हळूच तिच्या डोळ्यांनी हसत खुणावत असल्याचा भास होत होता.

पान ५ वरून

## तरी अवधान एकले दीजे...

प्रवचन, भाषण, व्याख्यान, विवेचन याचे स्वरूप वेगळे असते. यामध्ये बोलणारा समोरच्याला काहीतरी समजावून देत असतो. त्यातील आवाहन विवेकबुद्धीला असते. ज्याच्या बुद्धीची कुवत जेवढी असेल, तेवढे तो ग्रहण करतो. परंतु ज्ञानदेवांचे आवाहनशर्त्यांच्या ग्रहणशील आणि संवेदनशील मनाला आहे. त्यांनी श्रोत्यांना फक्त एकच विनंती केली आहे की, त्यांनी अवधान द्यावे. हे अवधान देणेही सोपे नसते, आपल्या सर्व संवेदना श्रवणाच्या ठिकाणी आणाव्या लागतात. यालाच 'जिवाचा कान' करून ऐकणे म्हणतात.

**'तरी तुम्हां रसिकाजोगें। व्याख्यान शोधावे लागे।।'** असे जेव्हा ते म्हणतात तेव्हा, ते श्रोत्यांच्या रसिकतेचा उल्लेख करतात, चिकित्सक बुद्धीचा नाही. श्रोत्यांचे अवधान जर ढळले तर, 'वितुळे मांडिला रसू' अशी अवस्था येईल. निर्माण झालेला भाव विस्कटून जाईल. उलट श्रोते सावधान असतील तर बोलणे रंगत जाईल. माउली म्हणते...**'येथ श्रवणाचेनि पांगे। वीण श्रोतयां व्हावे लागे। हे मानाचेनि निजांगे। भोगिजे गा।। आहाच बोलाची वालीफेडिजे। आणि ब्रह्माचीयाची अंगा घडिजे। मग सुखेसी सुरवाडिजे। सुखाचिमाजि।। ऐसे हळुवारपण जरी येईल। तरीच हे उपेगा जाईल। येरवि आघवी गोठी होईल। मुकयाबहिरयाची।'**

कोणतेही व्याख्यान, प्रवचन एवढेच काय तर कलाक्षेत्रातील प्रयोग हा मुक्याबहिऱ्याचा खेळ होऊ द्यावयाचा नसेल तर जाणकार श्रोत्यांनी आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. अन्यथा आपणही पढत मूर्ख ठरू. समर्थांनी सांगून ठेवलेच आहे...**'होत असता श्रवण। देहासी आले उणेपण। क्रोधे करी चिणचिण। तो येक पढतमूर्ख ।।'**

पान ५ वरून

## भारतीय ज्योतिषशास्त्र

संततिकारक म्हणून गुरूला जीव म्हणतात. कारण गुरूवर मिथेनचे आवरण आहे. कधीतरी वीज पडून मिथेनचे पृथःकरण झाले आणि विश्वात जीवोत्पत्ती झाली. गुरू हा सर्व ग्रहात मोठा म्हणून तो ज्या स्थानात असेल त्याची वृद्धी करतो, असे त्याचे विविध अर्थ लक्षात येणाऱ्यामहर्षींच्या विद्वत्तेला नम्रपणे वंदन करावे.

फलित सांगताना हर्षल, नेपच्यून आणि प्लुटो या ग्रहांना कितपत महत्त्व द्यावे, याविषयी आजही विद्वानात एकमत नाही. धूम, व्यतिपात, परिवेष, इंद्रचाप आणि केतू हे रवीचे पाच पापबिंदू सांगितले आहेत. फारच थोडे ज्योतिषी त्यांचा उपयोग कुंडली सांगताना विचारात घेतात. गुलीक म्हणजे तर बुलेटच. याचा परिणाम मंगळापेक्षाही तीव्र होतो. त्याचाही फारसा विचार अनेक जण करत नाहीत. विंशोत्तरी महादशेत रवी ६, चंद्र १०, मंगळ ७, राहू १८, गुरू १६, शनी १९, बुध १७, शुक्र २० आणि केतू ७ अशी वर्षे सांगितली आहेत. मात्र ही वर्षे अशीच का याचे समाधानकारक उत्तर फारच थोड्यांना माहीत आहे. या सर्व प्रश्नांवर मूलभूत संशोधन होणे अत्यावश्यक आहे. नाही म्हणायला महर्षी पराशरांच्या पारंपरिक पद्धतींवर संशोधन करून कुंडलीतील लग्न आणि सूर्यचंद्रादी सात ग्रह अशा एकूण आठ जणांचे पारस्परिक बल यांची सांख्यगणिती सारणी करून फलित सांगणाऱ्या अष्टकवर्ग पद्धतीवर संशोधन झाले आहे. २० व्या शतकात प्रा. कृष्णमूर्तींनी ग्रह, नक्षत्र व नक्षत्राचा स्वामीग्रह यांचा विचार करून गणिताधिष्ठित केपी पद्धत विकसीत केली. मात्र, अशी उदाहरणे दुर्मिळच. ज्योतिषशास्त्राचे सिद्धांत, संहिता आणि होरा असे तीनही स्कंध आज अभ्यासू संशोधकांची वाट बघत आहेत. तो योग लवकर यावा.

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# संपर्कजाळे - वास्तव आणि आभासी

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २९१



मनुष्य प्राणी जन्मतः समाजशील असल्याने त्याला आसपास गोतावळा असल्याशिवाय चैन पडत नाही. आप्त- स्वकीय, मित्र, स्वजन, सहकारी अगदी वेळप्रसंगी अपरिचितही. पण सतत कोणाच्यातरी सहवासात असल्याविना त्याला राहवत नाही. म्हणूनच दिलका हाल सुने दिलवाला, सीधी सी बात न मिर्च मसाला हे आपलं हृदयगीत बनतं. पण रोजीरोटीची धडपड जीवनाचा वेग, तंत्रज्ञान यामुळे शरीरांमध्येच नव्हे तर मनांमध्येही केव्हा अंतर पडायला सुरुवात झाली, कळलंच नाही. निवांतपणा, सुकून हरवून गेला. भेटीगाठी मंदावल्या. संपर्काची साधने वाढली आणि वायुवेगाने आपण जगाच्या कानाकोपऱ्यात एकमेकांशी बोलू शकतो. फक्त प्रश्न उरलाय- काय बोलायचे? फारसे काही सामाईक उरले नसल्याने, आपापली क्षेत्रे वेगळाली झाली असल्याने संभाषण त्रोटक, कामापुरते, भेटीपुरते उरले आहे. त्यांतही बरेचदा व्यावसायिकतेचा भाग अधिक. त्यामुळे पाल्हाळ न लावता जेवढ्यास तेवढे बोलणे सगळ्यांनाच सोयीचे वाटू लागलेले आहे.

आपण बरं आणि आपलं काम बरं, कशाला इतरांच्या व्यक्तिगत बाबींमध्ये नाक खूपसा आणि तेवढा वेळही कोणाला असतो इथे आपण सगळेजण येऊन ठेपलोय. सगळ्यांना स्वतःच्या पावलापुरता प्रकाश असला की पुरे असं वाटायला लागलंय. वाटून घेण्याची गरज भासत नाहीए. माझं सोसणं कोणाला समजणार नाही. अपुला प्याला दुःखाचा, डोळे मिटून प्यायचा असं केशवसुत म्हणून गेलेत, ते आता खरं होत चाललं आहे.

सभोवती गर्दी आहे, पण आतमध्ये हम कितने एकाकी असं जाणवत असताना काही वर्षांपूर्वी एक खुल जा सिमसिम सारखी चावी अचानक गवसली. बरेच दृश्यादृश्य दरवाजे उघडले, खिडक्या किलकिल्या झाल्या. या चावीचे नांव आहे. समाजमाध्यमे! त्यांमधून आभासी असं पर्यायी जग उभं राहिलं आणि बघता बघता त्याची पडलेली भूरळ मानवजातीला पुरून दशांगुळे वर उरली. आपल्या खऱ्या, जिवंत दुनियेला हा आभासी, अपरिचितांना जोडणारा दुवा, पर्याय निर्माण झाला. आता ओळखीची गरज नाही, प्रत्यक्ष भेटीची गरज नाही. समाजमाध्यमांवर समान शीलेषू मैत्र हा भलाथोरला विश्वव्यापी पर्याय उपलब्ध झाला. जगातील शब्दशः कोणालाही मी माझ्या संपर्कजाळ्यात खेचू शकतो आणि त्या व्यक्तीशी हवी तितका काळ दोस्ती करू शकतो. ना उम्र की सीमा हो असं आणि अर्थातच रक्ताचं नसलेलं हे जोडलं जाणं उभयपक्षी खूपच सोयीस्कर. विशेषतः वेदनेनं तळमळणाऱ्या, दुखावलेल्या व्यक्तीसाठी, ज्याचे वर्णन जगजीतच्या जग ने छीना मुझसे, मुझे जो भी लगा प्यारा या ओळींनी लखलखीत केलेलं आहे त्या सर्वांना हे माध्यम बघता बघता प्राणप्रिय झालेलं आहे. त्यामुळे सत्य/अस्सल/खरं जीवन कोपऱ्यात जाऊन थिजलंय आणि रोजच्या दिवसाचा बराच हिस्सा कारणपरत्वे आभासी जगताने व्यापलाय.

जगायचं खरंखुरं, वास्तवात पण त्याला आभासी किनार लावून अशा द्विधा, दुहेरी मार्गावरून आपले जीवन चालले आहे. या दोन्हीमध्ये नीरक्षीरविवेक करणे भल्याभल्यांनाही जमत नाहीए, तर बालवयापासून समाजमाध्यमांची पडणारी भुरळ आता चिंतेचा विषय बनलेली आहे. त्या टप्प्यावर खरं नाकारणं किंबहुना आभासीला खरं मानून चालणं हे वास्तव चिंतेत टाकणारं असलं तरीही ते अपरिहार्य झालेलं आहे. या कात्रीतून सुटका करून घेणं दिवसेंदिवस अशक्य होत चाललं आहे. पडद्यावर दिसतंय ते खोटं आहे, भोवती दिसतंय ते खरं जीवन आहे, हे आता कानीकपाळी ओरडून सांगण्याची पालकांवर पाळी आलेली आहे. याच्या प्रेमात पडलेल्या व्यक्तीला, बालकाला सोडविणे, त्यातील वैयर्थ्य समजावून सांगणे हे महा कर्मकठीण झालेलं आहे.

मानसशास्त्रात यांवर गंभीर मंथन सुरु आहे. खऱ्याखुऱ्या वास्तवापासून तुटून पडलेल्या बालकांना पुन्हा जीवनाशी जोडून घेणं हे जितकं दमछाक करणारं आहे, तितकंच आव्हानात्मकही. त्याची लागलेली चटक बहुतांशी जनसंख्येसाठी व्यसनात परिवर्तित झालेली आहे. सहजी उपलब्ध असणारे तंत्रज्ञान, आंतरजाल (इंटरनेट), त्यावरील न सरणारा, अक्षय खजिना यामुळे हातातील वेळ त्यामागे गमावणे सहज सुलभ झालेलं आहे. याला आम्ही इंफोटेंमेंट असं सुबक नांव दिलेलं आहे. माहिती अधिक करमणूक. जगाच्या पाठीवर घडणारी कोठलीही घटना प्रकाशाच्या वेगाने आपल्या घरातील/हातातील पडद्यावर येऊन आदळते, मेंदूला वेढून टाकत सारासार विचार करण्याची शक्ती हिरावून घेते आणि एकप्रकारची अंकीय (डिजिटल) ग्लानी आणते. आवश्यक- अनावश्यक सारं काही समाज नांवाच्या कचराकुंडीत आणून ओतलं जात असताना त्यातील निवडक स्वीकारायचं तारतम्य या गर्दीत केव्हातरी, कुठेतरी हरवलं आहे, एवढं नक्की. ही समाजबंधांची, नातेबंधांची झालेली मोडतोड पुन्हा जोडणे आता प्राधान्यक्रमाचे झालेलं आहे.

सुदैवाने काही धागे आजही उपलब्ध आहेत, सगळ्यांना पुन्हा एकदा एकत्र आणण्यासाठी. त्यांतील काही सिद्ध झालेले, काळाच्या कसोटीने स्वीकारलेले खाली दिलेले आहेत.

**(१) धन्यवाद आणि माफ करा या जोडगोळीचा वापर -** जेव्हा आपण कृपया म्हणतो, तेव्हा समोरच्या व्यक्तीकडून काही कृती अभिप्रेत असते. ते काम त्या व्यक्तीने केल्यावर त्याची नोंद घेण्यासाठी धन्यवाद या शब्दाची सवय लहानपणापासून लावायला हवी. तसेच हातून कळत नकळत चूक झाली तर लगेच अनमान न करता, अहंभाव न आणता माफी मागणे म्हणजे सगळी किल्मिषे दूर करणारे असते. आपल्या चुकीचे उत्तरदायित्व स्वीकारत माफी मागण्यात कोठलाही कमीपणा नसतो. प्रत्येक संभाषणात, संवादात या शब्दांचा योग्य वेळी वापर नात्यांचा पाया मजबूत करतो आणि मनातील अपराधगंड दूर करतो. ही सवय जितकी लवकर लागेल तितके श्रेयस्कर. मोठेपणी या वर्तनाची सकारात्मक नोंद घेतली जाते. इतरांचे प्रयत्न सहृदयतेने मान्य करणारा हा पाया महत्वाचा आहे.

**(२) संभाषणाची, संवादाची मांडणी -** बालके निरीक्षणातून सारं ग्रहण करीत असतात. त्यांच्यासमोर घरच्या- दारच्यांशी, अपरिचितांशी बोलताना आपला स्वर, शब्दांची निवड विचारपूर्वकच असायला हवी. संवादाचे हे प्रारूप त्यांना जन्मभर कामी येणार असते. भाषेने नाती जशी जुळतात तशीच तुटतातही. आपल्या आवाजातील गोडवा, स्वराची पातळी सगळं कमावलेलं असावं म्हणजे समोरची व्यक्ती दुखावली जाण्याची शक्यता कमी होते. अप्रिय बोलणेही मृदूपणे, जखम न करता सांगता येण्याची कला शिकता आली पाहिजे.

**हाती धनुष्य ज्याच्या, त्याला कसे कळावे**
**हृदयात बाण ज्याच्या, त्यालाच दुःख ठावे!**

या ओळी अनुभवसिद्ध आहेत.

**(३) अनुकंपा, सहृदयतेची पाठराखण-** विशेषतः मतभेद झाले,वादविवाद झाला की अनुकंपेचा मलम लावावा, स्वतःलाच विचारावे- समोरची व्यक्ती दुखावली तर नसेल नं? तिला आता काय वाटत असेल? यामुळे समोरच्याची बाजू ध्यानी येण्यास मदत होते, समोरच्या व्यक्तीच्या जोड्यात स्वतःचे पाय घालून बघितले तर नक्की दुखापतीचे स्वरूप कळते. ही समजूत अतिशय उपयोगी पडते.

**(४) एकावेळी एकाने बोलणे -** कोणीही बोलत असता, ते आधी शांतपणे ऐकून घेण्याची सवय लहान मुलांना शिकवावी. मध्ये बोलून अडथळा आणू नये. समोरच्या व्यक्तीचे सांगून झाले की मतप्रदर्शन करावे, विरोधी सूर लावावा पण सक्रिय श्रवण अत्यावश्यक. त्यामुळे आदर दिसून येतो. सगळ्यांचे ऐकून घेतले आणि त्या मतांचा जाणीवपूर्वक स्वीकार/अस्वीकार झाला असं दृश्य निर्माण झालं तर विसंवादाला थारा उरत नाही.

**(५) सीमाभिंतींचा आदर-** कितीही जवळचे नाते असले किंवा खूप जवळीक (लंगोटीयार टाईप) असली तरीही काही अदृश्य भिंती जपाव्या लागतात. वेळ ठरवून भेटणे, खोलीत प्रवेश करताना दारावर टिकटिक करणे, रोजनिशी वाचू नये, पूर्वपरवानगीशिवाय कोणाचाही संगणक, भ्रमणध्वनी हाताळू नये, गुप्त असलेल्या पासवर्डची मागणी कोणाकडेही मागणी करू नये इत्यादी इत्यादी ! यांवर आदर या संकल्पनेची जाणीव बालवयापासून होते.

**(६) नजरेला नजर भिडवून बोलणे -** संवाद साधताना एकमेकांकडे बघून बोलणे हा देहबोलीचा अत्यंत महत्वाचा हिस्सा असतो. नजर टाळणे हा चांगला संकेत मानला जात नाही. मनात काळंबेरं असणं, काहीतरी लपवाछपवी करणं, खोटं बोलणं अशा प्रसंगी प्रतिक्षिप्त क्रिया म्हणून नजर खाली जाते. सच्चेपणाला कर नाही तर डर कशाला या म्हणीची किनार लावून संभाषणात गुंतवणूक दाखवून देता येते.

**(७) मालमत्तेचा (चल-अचल) सन्मान-** बालवयात स्वतःची खेळणी, गोष्टीची पुस्तके, कपडेलत्ते जपून हाताळणे शिकविले की आपोआप दुसऱ्यांच्या वस्तूंप्रती आदरभाव निर्माण होतो. पैसे खर्च करून विकत घेतलेल्या किरकोळ, महत्वाच्या वस्तूंचा, मालमत्तेचा यथोचित आदर केला गेलाच पाहिजे. मग रस्ता, पार्किंग अशा इतरांबरोबर सामाईक असलेल्या जागांचाही योग्य वापर करण्याकडे कल वाढतो. वस्तूंची हाताळणी, त्यांची मोडतोड होऊ नये म्हणून काळजीपूर्वक देखभाल आणि नंतरची विनासायास विल्हेवाट हा सगळा संस्कारांचा भाग असतो. ते देणे हे पालकांचे आद्य कर्तव्य असते. यांतून खूप महत्वाच्या सवयी लागतात आणि संदेश मिळतात. अन्न वाया घालवू नये, विजेची अनाठायी नासाडी करू नये, पाण्याचा वापर जपून करावा, सगळी संसाधने महाग असतात त्यामुळे त्यांची हाताळणी, वापर काळजीपूर्वक असावा. कोठेही गळती आढळून आली तर त्याचा बंदोबस्त करावा. इतक्या सोप्या गोष्टी अंगवळणी पडल्या तर काटकसरीची सवय लागते.

**(८) वयानुरूप जबाबदाऱ्या-** हळूहळू कां होईना, क्षमतेनुसार काही छोटीमोठी कामे मुलांवर सोपविली तर त्यांचा स्वतःवरचा विश्वास वाढतो आणि आपल्या कामगिरीची दखल घेतली जातेय, हे बघून अभिमानही वाटायला लागतो. काम करताना संघभावनेचा आदर करणे अधिक महत्वाचे. साथी हात बढाना, एक अकेला थक जाएगा, मिलकर बोझ उठाना या ओळींचे प्रात्यक्षिक दाखविले तर एकमेकांचा भार हलका करण्याची प्रवृत्ती वाढीला लागते. पुढे संस्थेत नोकरी करताना संस्थेची ध्येय धोरणे ठरविताना आणि ती साध्य करताना एकमेकांच्या मदतीची आवश्यकता असते. गरज असेल तेव्हा निःसंकोचपणे मदत मागण्याची सवयही असणे तितकेच महत्वाचे. झेपतील एवढ्या जबाबदारी दिल्या तर स्वयंपूर्णतेची भावना वाढीला लागते आणि कुटुंबातील कामांची सवय होते. कोठलेही काम उच्च नीच नसते, हा संदेशही जाणे तितकेच आवश्यक.

**(९) नियमांमागचे कां समजावून सांगणे-** बरेचदा आपण मुलांच्या वागण्यावर अनाठायी बंदी घालतो, त्यांना मनाजोगते वागण्याचे स्वातंत्र्य नाकारतो, काळजीपोटी त्यांच्याभोवती कुंपणे घालतो. हा एकप्रकारे त्यांच्या कुतुहलावर, जिज्ञासेवर घाला असतो. मग त्यांच्यातील कल्पकता, नवसर्जन कोमेजून जाण्याची शक्यता असते. त्यांना समजेल अशा भाषेत कार्यकारणभाव समजावून सांगितला, कोठलेही भय न दाखविता तर त्यांची समजूत पटते. मग अनाठायी आग्रह सोडला जातो आणि तडजोडीचा हात आपसूक पुढे येतो. भावी कृतींसाठी हा प्रेरणेचा पाया ठरतो कारण पार्श्वभूमी मनात स्पष्ट असते. एखादी गोष्ट का करायची नसते, हे पटलं की ते पालन करण्याकडे ओढा वाढतो. या खुणा फक्त आभासी क्षेत्रातील संपर्कांसाठी नसून वास्तवातील नातीही मजबूत करण्यामध्ये उपयुक्त आहेत.

२०२३ चा विश्व आनंदाचा अहवाल म्हणतो की, पाचपैकी एक पौगंडावस्थेतील व्यक्ती मान्य करते की ती समाजात एकटी असते. वेळप्रसंगी तिला आधार द्यायला कोणी नसते. २००६ च्या अहवालातील अवस्थेपेक्षा ही सुमारे ३९ टक्के वाढ आहे. पौगंडावस्था म्हणजे चौदा ते वीस वयोगट, जो एकेकाळी जगातील सर्वात आनंदी वयोगट मानला जायचा. पण आता ती परिस्थिती उरलेली नाहीए. समाजापासून विभक्त होणे ही चढत्या भांजणीची समस्या बनलेली आहे. जगातील सुमारे १४० देशांमधील आनंदाचा स्तर मोजणारा २०२५ चा अहवालही नुकताच प्रसिद्ध झालेला आहे. दुरावणे वाढत जाताना दिसतंय. जागतिक आनंदाचा निर्देशांक काढताना केवळ एका प्रश्नाची उत्तरे शून्य ते दहा या मोजपट्टीवर मुल्यांकित केली जातात. शून्य म्हणजे नीचांकी स्थिती आणि दहा म्हणजे शक्यतो सर्वोत्तम अवस्था.

**नात्यांची भरभराट हा अस्तित्वाचा पाया असतो-** जागतिक आनंद अहवालाचे एक संपूर्ण प्रकरण समाजबंधांच्या महत्वाची मीमांसा करण्यासाठी खर्ची घातलेले आहे. आणि त्यांतून आनंद कसा वर्धिष्णू होऊ शकतो हेही अधोरेखित केलेलं आहे. काही महत्वाची निरीक्षणे-

**(१) पौगंडावस्थेसाठी सामाजिक जोडणी आवश्यक असते -** मैत्रीमुळे ताणतणाव कमी होण्यास मदत होते. आत्मनिष्ठ कल्याण (व्यक्तीच्या स्वतःच्या भावना आणि समाधानावर आधारित कल्याण) सुधारते. किमान एक जिवलग मित्र असलेल्या व्यक्ती सुमारे सोळा टक्के अधिक समाधानी असतात.

**(२)बालपणातील बंध प्रदीर्घकाळ टिकतात-** विशेषतः महाविद्यालयीन कालखंडात झालेलं मैत्र आपल्या भरभराटीसाठी पायाभूत असते. भविष्यात खिन्नमनस्कतेने ग्रस्त होऊ शकणाऱ्या नात्यांना मैत्री चाप लावू शकते.

**(३) समानुभूतीची शक्ती जोखता न येणे-** पौगंडावस्थेत आपल्या सहकाऱ्यांच्या भावना समजून घेण्याकडे आणि त्यांचा वापर नाते बळकट करण्याकडे व्हायला हवा. पण समानुभूती हाताळता आली नाही तर नात्यांना, विश्वासाला तडा जातो, गैरसमज वाढतात. संपर्क खुंटतो, एकमेकांना हक्काने मदत मागण्यात संकोच वाटतो. या साऱ्यांचा परिणाम मानसिक स्वास्थ्यावर होऊ शकतो. अर्थपूर्ण आणि खोलवर नातेबंध हवे असतील तर तेथे दरवाजे-खिडक्या सताड उघड्या असायला हव्या आणि सर्रास दुतर्फा रहदारी असावी.

एकावेळी आपण कितीही जणांशी संपर्कात असलो तरीही फुगीर आकडेवारी कायम फसवी असू शकते. प्रत्यक्षात रॉबीन डन्बर यांच्या संशोधनाच्या मते आपला मेंदू साधारण १५० अर्थपूर्ण नाती सांभाळू शकतो. पाच जिवलग मित्र, अदमासे पंधरा स्वजन, पन्नास किरकोळ, वरवरची, हाय- हॅलो वाली आणि मग एक सैलसर बाह्य वर्तुळ एवढी आपली जमापुंजी असते. याला डन्बर नंबर असे म्हटले जाते.

संपर्क क्षेत्रात वैविध्य, समतोल आणि ठराविक कालावधीनंतर नूतनीकरण असणे गरजेचे असते. निव्वळ संख्येच्या मागे धावू नये तर योग्य कारणासाठी योग्य व्यक्तीची निवड संपर्क जाळ्यासाठी करता आली पाहिजे.

आभासी नाती तात्कालिक, वरवरची असतात आणि बरेचदा मनात काही गुह्य हेतू घेऊन जोडली जातात. त्यांच्यात सखोलता, उत्स्फूर्तता नसते. एखाद्याने आपले समाजमाध्यमांवर कौतुक केले की लगेच हुरळून जाण्यात हंशील नसते तसेच ट्रोल केले तर दुखवून घेण्यात अर्थ नसतो. विचारांची देवघेव, सामाजिक बंध बळकट करणे एवढ्यासाठी आभासी विश्व उपयुक्त असते, पण भावनिक पोकळ्या भरून काढण्यासाठी नसते. तेथे प्रत्यक्षातील, दृश्य खांदे हवे असतात मगच मनसोक्त दुःख व्यक्त करता येते. आपल्या यशाचा आनंद एखाद्या संदेशाद्वारे अथवा ईमोजी द्वारे न मोजता पाठीवर पडणारी थाप, मित्राने मारलेली घट्ट मिठी आणि आई-वडिलांचे आशीर्वादाचे हात हेच अंतिम आनंददायी सत्य असते.तेव्हा नात्यांची श्रीमंती, समृद्धी अनुभवायची असेल तर आभासी नाती पोकळ पण आवश्यक मानावीत आणि खऱ्याखुऱ्या जिवंत व्यक्तींच्या संपर्कात राहावे हे उत्तम.

---

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

# खाजगी वाहतूक कमी व्हावी

**भारताने व्यापक हेतूने ईव्ही वाहनांबाबत धोरण आखले. त्यासाठी निवडलेली कारणे योग्य आहेत; परंतु तेवढ्याच कारणांमुळे सर्वांना आवश्यक बदल घडवून आणता येत नाही. आपण आपल्या धोरणांमध्ये फेरबदल करायला हवा. आपण सध्या काय करत आहोत आणि का करत आहोत, याचे मूल्यांकन करायला हवे. तेव्हाच आपण वाहन विद्युतीकरणाचा अजेंडा पुढे नेऊ शकतो आणि अत्यंत आवश्यक असलेले फायदेही मिळवू शकतो.**



कोणत्याही देशात वाहनांच्या ताफ्यांचे विद्युतीकरण करण्याची तीन मुख्य कारणे आहेत. पहिले म्हणजे हवामान बदल. वाहतूक क्षेत्र मोठ्या प्रमाणात तेल वापरते. म्हणजेच पेट्रोल आणि डिझेल आणि दरवर्षी जागतिक कार्बन डाय ऑक्साईड उत्सर्जनात अंदाजे १५ टक्के योगदान देते. शून्य- उत्सर्जन वाहने किंवा इलेक्ट्रिक वाहने, तेलाऐवजी वीज वापरतात. अक्षय ऊर्जा प्रकल्पांमध्ये ही वाहने निर्माण होतात, म्हणून त्यांच्याकडे प्रदूषण कमी करण्याचे साधन म्हणून पाहिले जाते. आपल्या शहरांसाठी दुसरे अधिक महत्त्वाचे कारण म्हणजे पेट्रोल आणि डिझेल वाहनांना शून्य- उत्सर्जन वाहनांनी बदलल्याने स्थानिक प्रदूषण कमी होईल आणि तिसरे कारण म्हणजे तेलाचा वापर कमी केल्याने आपले मौल्यवान परकीय चलन वाचेल.

प्रथम आपल्या शहरांचा विचार करू या. तिथे वाहन विद्युतीकरण दुप्पट आणि तिप्पट फायदे आणू शकते. विषारी वायू प्रदूषण कमी करण्यात, परकीय चलन वाचवण्यात आणि हरितगृह वायू उत्सर्जन कमी करण्यात ते महत्त्वाची भूमिका बजावते. हे सर्व चांगले असले, तरी आपण आपल्या धोरणांबद्दल स्पष्ट असतो आणि ते कोणत्या प्रमाणात करावे याबद्दल काळजीपूर्वक विचार करतो, तेव्हाच हे शक्य होते. २०१९ मध्ये नीती आयोगाने देशातील इलेक्ट्रिक वाहनांसाठीची आपली महत्त्वाकांक्षा मांडली. त्याचे उद्दिष्ट २०३० पर्यंत देशातील सर्व नवीन व्यावसायिक कारपैकी ७० टक्के, खासगी कारपैकी ३० टक्के, बसपैकी ४० टक्के आणि दुचाकी आणि तीनचाकी वाहनांच्या ८० टक्के विक्रीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा समावेश असावा, असा प्रयत्न असणार आहे. मात्र, २०२५ च्या मध्याजवळ पोहोचताना, आपण या लक्ष्यापासून खूप दूर आहोत.

आजघडीला तीनचाकी वाहनांचाच एकमेव विभाग वाढत आहे. त्यात जवळजवळ ६० टक्के नवीन नोंदणी इलेक्ट्रिक वाहनांची आहे. ही बहुतेक स्थानिक पातळीवर उत्पादित केलेली ब्रँडेड नसलेली तीनचाकी वाहने आहेत. ती रस्त्यावरील गर्दी वाढवतात, तरी भाड्याच्या बाबतीत किफायतशीर आहेत. उर्वरित इलेक्ट्रिक वाहनांच्या ताफ्यात होत असलेली प्रगती कमीच आहे.

कार, दुचाकी आणि अगदी बसच्या नवीन नोंदणींमध्येही त्यांचा वाटा फक्त ५-६ टक्के आहे. यामुळे प्रदूषण कमी होण्यास, तेलाची आयात कमी होण्यास किंवा कार्बन उत्सर्जन कमी होण्यास काहीही मदत होत नाही. आपण श्वास घेत असलेल्या प्रदूषित हवेत वाहनांचा सर्वाधिक वाटा असतो, हे माहीत असूनही हे घडते. हे केवळ प्रदूषण उत्सर्जित करणाऱ्या वैयक्तिक वाहनांच्या श्रेणीबद्दल नाही, तर प्रदूषणात योगदान देणाऱ्या रस्त्यांवरील वाहनांच्या वाढत्या संख्येबद्दलही आहे. म्हणून, वायू प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी आपण एकाच वेळी दोन्ही ध्येये साध्य केली पाहिजेत. स्वच्छ वाहने वापरणे आणि वाहनांची संख्या कमी करणे. २००० च्या दशकाच्या सुरुवातीला दिल्लीमध्ये सीएनजी वाहनांचा वापर सुरू झाला, तेव्हा बस, टॅक्सी आणि ऑटोरिक्षासारखी प्रदूषण करणारी वाहने लक्ष्यित होती. सार्वजनिक आणि व्यावसायिक वाहनांची ही श्रेणी कोणत्याही शहरात, विशेषतः दिल्लीमध्ये सर्वात लांब अंतर प्रवास करते. प्रदूषणाचे विज्ञान स्पष्ट आहे, अंतर जितके जास्त तितके उत्सर्जन जास्त. शिवाय, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी जुन्या वाहनांच्या जागी नवीन सीएनजी वाहने घेण्यासाठी सार्वजनिक अनुदाने देण्यात आली. त्यामुळे लोकांना गाडी चालवण्याऐवजी चालण्यासाठी जागा मोकळी झाली. तथापि, दिल्लीची गोष्ट चुकीची ठरली.

ही एक धोरणात्मक चूक आहे, जी आपण पुन्हा करू नये; कारण ती स्वच्छ हवेचे फायदे नाकारते आणि सार्वजनिक गुंतवणूक वाया घालवते. सीएनजी क्रांतीच्या दोन दशकांनंतर दिल्ली आपल्या रस्त्यांवरील वाहनांच्या वाढीला आळा घालण्यासाठी सार्वजनिक वाहतूक पुरेशी सुधारण्यात अपयशी ठरली आहे. दिल्लीत दररोज अंदाजे १,८०० नवी खासगी वाहने रस्त्यावर येतात. त्यात ५०० हून अधिक खाजगी कार्सचा समावेश आहे, तर संपूर्ण देशात दररोज १० हजारांहून अधिक खासगी कार रस्त्यावर येतात.

नवनवीन उड्डाणपूल आणि रस्ते नेटवर्क असूनही आपल्या रस्त्यांवर होत असलेला वाहनांचा हा स्फोट म्हणजे आपण वाहतूक कोंडीत अडकत असून प्रवासाचा वेग कमी करत आहोत. 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंट'मधील तज्ज्ञांनी गुगल एपीआय वापरून तासाभराच्या प्रवासवेळेच्या डेटाचे विश्लेषण केले तेव्हा आढळले की, आठवड्याच्या दिवशी दिल्लीमध्ये सकाळी गर्दीच्या वेळी सरासरी वेग ४१ टक्के तर संध्याकाळी गर्दीच्या वेळी ५६ टक्के कमी होतो. वाहतुकीत घालवलेला वेळ आणि वाढते वायू प्रदूषण यांच्यातील संबंध पूर्णपणे स्पष्ट आहे. दुसऱ्या एका अभ्यासात आढळून आले की, बस अशा वाहतूक कोंडीत अडकतात तेव्हा परिस्थिती आणखी बिकट होते. गर्दीमुळे होणाऱ्या विलंबामुळे लोक अधिक विश्वासार्ह वाहनांकडे वळतात. टेस्ला किंवा बीवायडीसारख्या इलेक्ट्रिक कार कंपन्यांची वाहने आज आपण ज्या हवामान समस्येचा सामना करतो त्याचे उत्तर आहेत का, याचाही विचार करायला हवा. हा एक सोयीस्कर प्रश्न असला, तरी त्याचे उत्तर सोपे नाही. जग हरितगृह वायू (जीएचजी) उत्सर्जन रोखण्यासाठी पावले उचलत असताना यावर चर्चा करणे महत्त्वाचे आहे. काही देश पुढे जात आहेत तर काही उलट्या दिशेने. या परिस्थितीत, आपण वेगाने हवामान आपत्तीच्या जवळ येत आहोत. खाजगी कार स्वच्छ आणि कमी-उत्सर्जन करणाऱ्या 'ईव्ही' असल्या, तरी त्यांना प्रोत्साहन देण्यात खरेच फायदा आहे का, याचा विचार केला पाहिजे. अर्थव्यवस्था कार्बनमुक्त करण्याच्या दिशेने जलद गतीने पुढे जाण्याचा दबाव असलेले जुने औद्योगिक देश अंतर्गत ज्वलन इंजिन असलेल्या वाहनांना (कार आणि मोटारसायकलींमध्ये वापरल्या जाणाऱ्या इंजिनांना) पर्याय म्हणून 'ईव्ही' कार्यक्रमांचा विचार करत आहेत. या देशांना आशा आहे की, इलेक्ट्रिक वाहनांचा अवलंब केल्याने 'डीएचजी' उत्सर्जन कमी होईल. उदाहरणार्थ, युरोपने २०३० पर्यंत ८० टक्के नवीन कार शून्य-उत्सर्जन वाहने असण्याचा आदेश दिला होता. तो २०३५ पर्यंत १०० टक्क्यांपर्यंत वाढविण्याचे लक्ष्य होते. अमेरिकेने २०३० पर्यंत ५० टक्के नवीन वाहन नोंदणी इलेक्ट्रिक वाहनांची असेल, असे लक्ष्य ठेवले होते. या देशांमध्ये वाहतूक क्षेत्राला कार्बनमुक्त करण्यासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर करणे, हे प्राथमिक उद्दिष्ट आहे आणि हे केवळ आयसी इंजिन टप्प्याटप्प्याने बंद करूनच शक्य आहे.

युरोपमध्ये गेल्या तीन दशकांमध्ये वाहतूक क्षेत्रातून हरितगृह वायू उत्सर्जन वाढले आहे. युरोपमध्ये रस्ते वाहतूक उत्सर्जनात खासगी कारचा वाटा ६० टक्के आहे. म्हणूनच हे क्षेत्र कार्बनमुक्त करणे हे प्राथमिक उद्दिष्ट आहे; परंतु युरोपला आता ऑटोमोटिव्ह पुरवठा साखळीच्या भू-राजकीय क्षेत्रातील सर्वात मोठा खेळाडू असलेल्या चीनकडून आव्हानाचा सामना करावा लागत आहे. याव्यतिरिक्त खासगी वाहतुकीसाठी रस्ते, उड्डाणपूल आणि इतर पायाभूत सुविधा बांधण्याचा प्रचंड खर्च खाजगी कारमालकांसाठी मोठ्या प्रमाणात अनुदानासारखा आहे. म्हणूनच कार्बनीकरण कमी करण्याचे उद्दिष्ट मागणी करते की, आपण आपल्या रस्त्यांवरील खाजगी वाहतूक कमी करावी आणि लोकांना हलवण्यावर लक्ष केंद्रित करणारा दृष्टिकोन स्वीकारावा. (लेखक पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)



सामाजिक चौकट बदलत असताना अनेक चुकीचे प्रघात मिसळत असल्यामुळे चिंता व्यक्त होते आहे. सध्या कोणालाच कायद्याचा धाक उरलेला नाही. लोक नियम धाब्यावर बसवतात आणि हे केल्यानंतर समाजातून विरोध, टीका होत नसल्यामुळे आपल्या चुकीच्या कृत्याचीही शेखी मिरवतात. म्हणूनच कायदे कडक करणे, शिक्षा कठोर करण्याबरोबरीने उपद्रवमूल्यालासन्मान, प्रतिष्ठा देणे थांबवायला हवे तरच अनेक प्रश्न सुटतील.



# शिस्तीची संस्कृती...

समाजभान
तन्मय कानिटकर
सामाजिक कार्यकर्ते

वाढती गुन्हेगारी, असामंजस्य, कायद्यातून पळवाटा शोधण्याची बेदरकार वृत्ती आणि या सर्वांच्या परिणामस्वरूप विद्रूप होणारी सामाजिक चौकट हा सध्याचा कळीचा प्रश्न आहे. यायोगे उद्भवणाऱ्या अनेकानेक समस्या सामाजिक सलोखा धोक्यात आणत आहेत. वाढती असुरक्षितता काळजीचे कारण ठरत आहे. म्हणूनच दंगली, सार्वजनिक मालमत्तेची जाळपोळ, सामाजिक शिस्तीचा अभाव यासारख्या मुद्द्यांवर विविध पातळ्यांवर चर्चा होत असली, तरी याच्या मुळाशी जाऊन विचार करणे गरजेचे ठरते.

घराबाहेर पडल्यानंतर आपल्याला अनेकांकडून कायदे तोडले जाताना दिसतात. अगदी एखाद्या मर्सिडिजची काचही खाली होते आणि कचरा बाहेर टाकला जातो. या मानसिकतेचा विचार करताना

स्वाभाविकच नियम अपुरे असणे, कडक नसणे, अंमलबजावणीचा अभाव, पोलिसांची मोजकी संख्या हे आणि यासारखे मुद्दे समोर येतात. नियम मोडणाऱ्यांना कडक शिक्षा झाली तर याला वेसण बसेल, असा भाबडा आशावाद व्यक्त होतो. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना चार फटके देऊन जेलमध्ये डांबले पाहिजे, अशी वाक्येही सहज तोंडात येतात.

उद्वेगातून, खरे तर आपल्या देशामध्ये एखादा हुकूमशहाच हवा, असेही कोणी बोलून जाते. पण जगभरात झालेल्या समूह मानसिकतेच्या अभ्यासातून समोर आलेली गोष्ट अशी की, केवळ शिक्षा वाढवून कधीच कोणता परिणाम दिसत नाही. गुन्हेगारी हे लक्षण आहे. कारण त्यामागे गुन्हा करणाऱ्यांना मिळणारा मानसन्मान हा खरा काळजीचा मुद्दा आहे. गुन्हा करणाऱ्यांना समाजात प्रतिष्ठा मिळते तेव्हा आपसूक लोक त्याकडे ओढले जातात. व्यक्ती नेहमीच छोट्या गुन्हेगारीपासून मोठ्या गुन्हेगारीकडे जाते. म्हणूनच छोटे- छोटे गुन्हे स्वीकारून एक प्रकारे समाज संदेश देत असतो की, तुम्ही कायदे तोडले तरी काळजी नाही; तुम्हाला संरक्षण आहे. शेवटी हाच समाज नियम तोडणाऱ्यांना ताकदवान मानतो.

आपल्याकडे नियम वाकवू शकणाऱ्या माणसाला 'भारी' समजले जाते. नकळतपणे ही बाब समाजात बघायला मिळते तेव्हा हा समज दृढ होण्यास वेळ लागत नाही. एखाद्या राजकीय पक्षाचा मेळावा नजरेसमोर आणा... यावेळी आरडाओरडा करत, हेल्मेट न घालता, एका दुचाकीवर तीन- चार लोक जाताना दिसतात. त्यांनी गाड्या कशाही लावलेल्या असतात. पण ते संपूर्ण शहर रोखून धरू शकतात, चक्काजाम करू शकतात, ही त्यांची ताकद आहे, असे म्हणत सामर्थ्याचे लक्षण म्हणून समाज त्याकडे बघतो. खरे तर ते सामर्थ्य नसते, उपद्रवमूल्य असते.

मात्र यातला फरक न समजणे हाच खरा आणि मूळ प्रश्न आहे. एकदा याला सामर्थ्य म्हटले की, त्यामागे प्रतिष्ठा येते आणि ती आपल्यालाही कशी मिळेल याचा विचार माणूस करतो. यातूनच सिग्नल तोडले जातात. आपल्याला कोणी पकडणार नाही आणि तसे झाले तरी चिरीमिरी देऊन सुटता येईल, असा विचार केला जातो. आपल्या चार-पाच मित्रांमध्ये याची फुशारकीही मारली जाते. हे अनेकांकडून घडते तेव्हा मानसिकरीत्या समाजावर परिणाम होत असतो. म्हणूनच अगदी आपल्या नेहमीच्या, साध्या चर्चेतही चुकीच्या गोष्टी करणाऱ्यांना प्रतिष्ठा देणे बंद करून, चूक करत असल्याचे सांगत त्यांच्याकडे बोट दाखवू लागलो तर कोणत्याही शिक्षेने साध्य न होणारी गोष्ट कडून येईल आणि अशी माणसे चुकीचे काम करण्यापासून परावृत्त होतील. कारण समाजात आपले हे कृत्य लाजिरवाणे मानले जाईल, अगदी जवळच्या मित्रांमध्येनातलगांमध्येही ते लज्जास्पद मानले जाईल, असे कळले की ते टाळण्याची मानसिकता जन्म घेते. म्हणूनच समाज म्हणून नियम तोडण्याची, कायदे वाकवण्याची लाज निर्माण करणे हे आपले काम आहे, असे वाटते. भारतासारख्या देशात अनेक वेळा एक विचित्र आणि विरोधाभासी दृश्य पवहायला मिळते. एकाच माणसाचे वर्तन वेगवेगळ्या ठिकाणी पूर्णपणे भिन्न का असते, हा प्रश्न अनेकांना पडतो. जसे की, आधी उल्लेख केल्याप्रमाणे सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणारा माणूस एखाद्या पंचतारांकित हॉटेलमध्ये मात्र अगदी कचरा कचरापेटीत टाकतो.

भारतात राहणारा भारतीय नागरिक ट्रॅफिक सिग्नल तोडणे, हेल्मेट न घालणे, चुकीच्या पद्धती- ने ओव्हरटेक करणे अशा बाबी सामान्य मानतो, पण अमेरिकेत गेल्यावर तेच नियम काटेकोरपणे पाळतो. काय कारण आहे या वागण्यातल्या बदलाचे? कायदा बदलतो म्हणून की मनोवृत्ती? याचे उत्तर फक्त कायद्यात नाही तर समाजाच्या वर्तनधोरणात, मानसिकतेत आणि सामाजिक शिकवणुकीत आहे. आपण मानवजातीच्या उत्क्रांतीच्या इतिहासात शिकलो आहोत की समूहामध्ये राहणे ही आपल्या अस्तित्वाची गरज आहे. पूर्वीच्या काळात, म्हणजे माणूस टोळी बनवून राहायचा तेव्हा टोळीतून बाहेर फेकले जाणे ही मृत्यूसमान शिक्षा होती. आजही आपल्या मेंदूमध्ये तीच सामाजिक तार जोडलेली आहे. मी आजूबाजूच्या समाजाचा भाग आहे, ही भावना माणसाला मानसिक सुरक्षितता देते. ती मानवाची मूलभूत गरज बनली आहे. आपल्याला कायद्याची किंवा शिक्षेची भीती वाटते का, या प्रश्नाचे उत्तर असे की, ती भीती अतिशय वरवर असते. पण दीर्घकालीन परिणाम करणारी भीती म्हणजे आपल्याला आपले लोक स्वीकारणार नाहीत, हीच असते. म्हणूनच आपण आजूबाजूच्या लोकांप्रमाणेच वागतो.

आपण तीच कृती 'नॉर्मल' मानतो. समुदाय मानसशास्त्राचा विचार केला तर समाज म्हणून आपण सहन करतो, तेच हळूहळू आत्मसा- तही करतो. आधी सांगितल्याप्रमाणे त्यालाच मानप्रतिष्ठा देतो आणि ती गोष्ट पुढे जात त्या त्या समाजाच्या वर्तनसंस्कृतीचा भाग बनते. भारतातही हे चित्र अगदी स्पष्ट दिसते. विशेषतः कायदा मोडण्याच्या बाबतीत ही बाब सर्वत्र बघायला मिळते. एखादा राजकीय नेता कायदे तोडतो, बेकायदेशीर बांधकाम करतो, ट्रॅफिक बंद करतो, सार्वजनिक ठिकाणी बेकायदेशीर फ्लेक्सबाजी करतो आणि तरीही समाज त्याला निवडून देत असेल, त्याच्या बडेजावाला दाद देत असेल तर तो कायदाभंग 'गैर' न ठरता नकळत सामर्थ्याचे लक्षण ठरतो. यामुळे समाजात एक संदेशच जात असतो की, नियम तोडण्याचे आणि ते पचवण्याचे सामर्थ्य असेल तर प्रतिष्ठा मिळते! आणि मी असे केले तरी तुम्ही मलाच मत देणार, जाणार कुठे; असा प्रश्नही जणू तो पुढारी आपल्या चुकीच्या कृतीतून विचारत असतो. म्हणूनच हे चित्र कायदा-व्यवस्थेला आव्हान देण- ारे आहे. मी पदावर नसलो, आमदार- खासदार- मंत्री नसलो तरी हे करू शकतो, हा संदेश त्या बेकायदेशीर फ्लेक्समधून येत असेल आणि समाज तो खपवून घेत असेल तर मोठी चूक घडते. लगोलग शेजारी तसाच दुसरा फ्लेक्स लागतो. त्याला काय बिघडते, असे तेव्हाही आपले म्हणणे असते. अशा प्रकारे आपण कायदा तोडणाऱ्याला प्रतिष्ठा देतो. त्याला चांगले म्हणतो. मानाने त्याच नगरसेवकाला आपल्या संकुलात प्रमुख पाहुणा म्हणून बोलावतो. अशा प्रत्येक वेळी कायदा मोडला तरी चालेल, असेच आपण अप्रत्यक्षपणे म्हणत असतो. मात्र ही धोकादायक वर्तनसंस्कृती रुजली की ती मोडीत काढणे मोठे कठीण काम ठरते. दुसऱ्या कोणाला सिग्नल तोडल्यावरून शिव्या घालणे सोपे असते. पण त्यातून फार काही साध्य होत नाही. कारण शिव्या घालणारा पुढे जाऊन तेच करणार असतो. कदाचित नियम तोडण्याचे स्वरूप वेगळे असेल, पण कृती तीच असते. म्हणूनच वाढत्या गुन्हेगारीची चर्चा करताना आपल्या देशात, राज्यात, शहरात मोठ्या नेत्यावर नियम तोडल्यानंतर कारवाई होते का, हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो. कारण चुकले तर हे मोठे लोकदेखील सुटत नाहीत, त्यांनाही दंड भरावा लागतो, त्यांनाही शिक्षा होते, नो पार्किंगमध्ये असतील तर त्यांच्या गाड्याही उचलल्या जातात हे सातत्याने दिसू लागले तरच समाजात सकारात्मक संदेश जातो. पण आपल्याकडे हे चित्र दिसत नाही, हीच मोठी खंत आहे. म्हणूनच फक्त नियम कठोर करून किंवा नियम अंमलात आणण्यासाठी जास्तीचे पालिस आणून फार काही सकारात्मक बदल घडण्याची शक्यता नाही.

अधिक पोलिस, अधिक सीसीटीव्ही, अधिक कठोर शिक्षा हे सगळे जरूर हवे; पण त्याच्याही आधी हवे आहे सामाजिक स्तरावर कायद्याला, कायदा पाळण्याला प्रतिष्ठा मिळवून देणे. ते न करता बाकीचे उपाय नुसतेच आपल्याला 'पोलिसी राज्याकडे' नेतील. मात्र जगातल्या एकाही पोलिसी राज्यात स्वातंत्र्य आणि मानवी अधिकारांचे संरक्षण झाल्याचा दाखला नाही. तेव्हा त्या हुकूमशाही मार्गावर जाणे म्हणजे रोगापेक्षा इलाज भयंकर...! पण मग करायचे तरी काय? हा प्रश्न स्वाभाविकच पुढे येतो. तर उत्तर म्हणजे शालेय स्तरावरून सुरुवात करणे गरजेचे आहे. शाळांमध्ये फक्त शुद्धलेखन, गणित नव्हे; तर नागरिक जबाबदारी शिकवली पाहिजे. आज अनेक चांगल्या शाळा रस्ता सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, स्वच्छता अभियान या विषयांवर काम करत आहेत. ही नक्कीच सकारात्मक सुरुवात आहे. अशा शाळांमधील मुले पालकांना तुम्ही सिग्नल का तोडला, असे विचारू लागली तर त्याचा परिणाम खोलवर होतो. पालकांनी मुलांच्या या बोलण्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला की आपोआप एका संपूर्ण कुटुंबातले सगळेजण अधिक चांगले नागरिक बनतात.

अर्थात केवळ शालेय पातळीवर प्रयत्न करणेही पुरेसे नाही. बेकायदेशीर किंवा नियमबाह्य गोष्टी दिसल्यावर त्याबाबत बोलणे, नाराजी, नापसंती, विरोध दर्शवणे हे नागरिक म्हणून आपले कर्तव्य आहे. अशा वेळी गप्प बसणारे लोक चुकीच्या वर्तनसंस्कृतीला मूकसंमती देत असतात. तुम्हाला तुमच्या देशात, तुमच्या समाजात कायद्याचे, न्यायाचे राज्य हवे आहे की 'बळी तो कान पिळी' मानणारे असंस्कृत, अन्यायी, अराजक हवे, याचा निर्णय तुम्हालाच करायचा आहे. तेव्हा सुरुवात स्वतःला फक्त एक प्रश्न विचारून होईल. माझ्या कृतीतून, विचारातून, बोलण्यातून किंवा निष्क्रिय राहून कायदा मोडण्याला प्रतिष्ठा तर देत नाहीये ना? बस्स, याचे उत्तर सातत्याने नकारार्थी येऊ लागले की, आपण अधिक चांगला समाज घडवण्याच्या कार्यात भरीव योगदान देतो आहोत असे समजावे.



# शताब्दी वर्ष : समरस आणि समर्थ भारताचा संकल्प

संघ गौरव
राजेश कुमार



सन १९२५... देश इंग्रजांच्या जोखडात अडकलेला आणि नागपूरच्या भूमीवर एक व्यक्ती डॉ. केशव बळीराम हेडगेवार फक्त १७ कार्यकर्त्यांसह असा संकल्प करतात की, मी भारताच्या स्वातंत्र्यासह हिंदू समाजाचे संघटन करीन. हीच संघाच्या प्रारंभीची प्रतिज्ञा होती. 'मी भारताला स्वतंत्र, समृद्ध आणि वैभवशाली राष्ट्र बनवण्यासाठी तन, मन आणि धन अर्पण करीन.' त्या काळात हा विचार ना एखादा राजकीय नारा होता, ना कुठल्या आंदोलनाचा भाग, तर हे एक सांस्कृतिक पुनरुत्थानाचे बीज होते, जे डॉ. हेडगेवारांनी रो

आज १०० वर्षांनंतर तेच बीज सेवा, संघटन, संस्कार आणि समाजपरिवर्तन या रूपाने एका विशाल वटवृक्षात परिवर्तित झाले आहे. डॉ. हेडगेवार यांनी केवळ समाजसंघटनाची गरज सांगितली नाही, तर ते संघटन कसे शय आहे, हेही प्रत्यक्ष दाखवून दिले. त्यांनी केवळ भाषण दिले नाही, तर एक सुयोजित संघटनात्मक पद्धत विकसित केली, ती म्हणजे 'शाखा!' ही शाखा केवळ शारीरिक व्यायामाची जागा नव्हती, तर ती राष्ट्रीय पुनरुत्थानाची प्रयोगशाळा होती, जिथे व्यक्तिमत्त्वात अनुशासन, देशभक्ती आणि सेवाभाव यांचा संस्कार घडवला गेला.

तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस म्हणायचे, जिथे हिंदू, तिथे शाखा आणि जिथे शाखा, तिथे विजय. ते म्हणायचे, शाखा ही महिलांच्या सुरक्षेची आणि राष्ट्ररक्षणाच्या भावनेची सजीव अभिव्यक्ती आहे. एका तासाची ही शाखा कालांतराने व्यक्तिनिर्माणातून समाजनिर्माणाची प्रयोगशाळा बनली. आज संघ आपल्या शताब्दी वर्षात असताना, डॉ. हेडगेवार यांचे स्वप्न विचारांपुरते मर्यादित न राहता, ते प्रत्यक्ष कृतीत उतरलेले दिसते.

**१९२५ साली व्यक्तिनिर्माणातून राष्ट्रनिर्माणाचे आणि हिंदू संघटनाचे दूरदृष्टीपूर्ण उद्दिष्ट ठेवून, डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मुहूर्तमेढ रोवली. आज १०० वर्षांनंतरही संघाची वाटचाल त्याच दिशेने सुरु असून, समरस आणि समर्थ भारतनिर्मितीसाठी तमाम स्वयंसेवक कटिबद्ध आहेत. या अविरत संघटनपर्वाचे चिंतन...**

संघाने आपल्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने स्पष्ट सांगितले आहे की, सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी व्हायचे आहे, म्हणजे संघाचा विचार प्रत्येक गाव, प्रत्येक वस्ती, प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवायचा आहे. या ध्येयासाठी आखलेली योजना तितकीच व्यवहार्य आहे. हरियाणात डिसेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक घरोघरी (५० हजारांपेक्षा अधिक) संपर्क साधणे आणि फेब्रुवारी २०२६ मध्ये प्रत्येक मंडल (आठ-दहा गावांचा समूह) तसेच प्रत्येक वस्ती (आठ-दहा हजार लोकसंख्या)मध्ये हिंदू परिषद आयोजित करणे, ही केवळ आयोजनात्मक मोहीम नाही, तर समाजाला एका सूत्रात बांधण्याचा प्रयत्न आहे. या योजनेचे परिणामही दिसू लागले आहेत. हरियाणातील विजयादशमी उत्सवानिमित्त २५७ शहरी घटकांपैकी १ हजार, ४४३ पैकी १ हजार, ३९८ वस्त्यांमध्ये (९७ टक्के), ग्रामीण भागात ८८२ पैकी ८६२ मंडलांमध्ये (९८ टक्के) आणि ६ हजार, ७०१ पैकी ४ हजार, १६ गावांमध्ये (६० टक्के) एकूण ८४ हजार, ५१९ स्वयंसेवक, २ हजार, ९२५ घोषवादक, ५७ हजार, ६५ स्वयंसेवक कुटुंबे (यात ९ हजार, ८८६ महिला) आणि १ हजार, ६२ विशेष उपस्थित व्यक्तींनी मिळून १ हजार, १११ कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडले.

हरियाणासारख्या प्रगत राज्यात, जिथे शेतकरी, सैनिक, खेळाडू आणि तरुण-तरुणी ऊर्जेचे प्रतीक आहेत, तिथे संघाचा हा विचार समाजात नवी चेतना जागवत आहे. विजयादशमीसारख्या पवित्र पर्वावर जेव्हा शाखा, संवाद, आणि परिषदांचे आयोजन होते, तेव्हा तो केवळ उत्सव नसतो, तर तो संघाच्या शताब्दी दिशेने आत्ममंथन आणि आत्मनिवेदनाचा क्षण असतो.

भविष्याच्या योजनांचे पायाभूत कार्य असते. विजयादशमी हे सदैव 'धर्माचा अधर्मावर विजय' याचे प्रतीक राहिले आहे आणि आज ती विजयगाथा आहे संघटनाची, उदासीनतेवर जागृतीची आणि विघटनावर एकता-एकात्मता-समरसतेची!

डॉ. हेडगेवार यांचे दृष्टिकोन केवळ राजकारणापुरते मर्यादित नव्हते. ते म्हणायचे की, देश बळकट होण्यासाठी समाजाच्या प्रत्येक घटकात संघटनभावना जागृत असली पाहिजे. त्यांनी कधीही पद किंवा सत्तेची आकांक्षा ठेवली नाही. त्यांचा एकच ध्यास होता, संगठित समाजातून सशक्त राष्ट्र उभे करणे.

पथ का अंतिम लक्ष्य नहीं हैं
सिंहासन चढ़ते जाना।
सब समाज को लिए साथ में
आगे हैं बढते जाना।।

हा विचार आजही तितकाच जिवंत आणि प्रासंगिक आहे, जितका १०० वर्षांपूर्वी होता. समाज तेव्हाच सशक्त होईल, जेव्हा त्यात एकता, समरसता, अनुशासन आणि आत्मविश्वास असेल. 'शाखा' या व्यवस्थेने हे गुण समाजाच्या आत खोलवर रुजवले आहेत. ती व्यवस्था व्यक्तीला 'मी'पासून 'आपण'कडे नेते. जेव्हा समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या गावाच्या, वस्तीच्या, मोहल्ल्याच्या भल्यासाठी थोडा वेळ देईल, तेव्हाच खर्या अर्थाने राष्ट्रनिर्माणाची प्रक्रिया सशक्त होईल.

डॉ. हेडगेवार यांचे स्वप्न केवळ एक संघटना उभारण्याचे नव्हते, तर राष्ट्रीय चरित्रनिर्मितीची प्रक्रिया घडविण्याचे होते. आजचा युवक सेवा, संघटन आणि समर्पण या सूत्राला जीवनाचा आधार बनवत आहे आणि त्यामुळे हे स्पष्ट होते की, आगामी शतके भारताची असतील. असा भारत, जो आधुनिकतेसोबत आपल्या सांस्कृतिक मुळांशी घट्ट जोडलेला राहील. डॉ. हेडगेवार यांचे शब्द आज इतिहास नाही, तर वर्तमानातले जिवंत सत्य बनले आहे, संघटित समाज हाच सशक्त भारताचा पाया आहे. (लेखक राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, (हरियाणा प्रांताचे प्रचार प्रमुख आहेत.)

## या भूमीवर जन्म हेची

हिंदु संघटन इथे होतसे
सुदैव हेही आमुचे।।धृ।।
रामकृष्ण शिवराय नि
राणाप्रतापही जन्मले।
गुरुनानक, ज्ञानेश, तुकोबा,
नामदेव अवतरले।।
भोर संत अन् शूरवीर या
भारतमातेचे...।।१।।
बुद्ध महात्मा महावीर
या पवित्र भू ीतील।
शांतिदूत ते अहिंसेचे,
प्रज्ञा करुणा शील।।
महापुत्र ते महान त्यागी
ईश्वर या देशाचे...।।२।।
भीमराव अन् फुले महात्मा
टिळक व सावरकरही।
अमर जाहले क्रांतिवीर ते
राजगुरू सुखदेवही।।
ऐसे असंख्य शूरपुत्र
असति भारतमातेचे...।।३।।
विविध पंथ जाती भाषांना
दिला जातसे मान।
बहुरंगी संस्कृतीचा अमुचा
भारत देश महान।।
आनंदाने गीत गाऊ
या अतुल देशाचे...।।४।।

सुरेश चौधरी

## मनाशी संवाद

कधीतरी स्वत:शीच जरा बोलावं
कधीतरी स्वत:चंही थोडं ऐकावं
कधीतरी शांत राहून
स्वत:च्याच मनात डोकवावं...१
बाहेरचं जग कधीतरी
आवरलेलंच राहू द्यावं
शब्दावीण संवादातून
मनाच्या मनातलंही जाणून घ्यावं...२
त्या शांततेचा सुरेल स्वर
कधीतरी मनापासून ऐकावा
शब्दांपलीकडला अर्थ कधी
आपला आपणच लावावा...३
गवसेल नवं काही अवचित
जे ध्यानीमनीही नसेल
कुणी सांगावं, सभोवतालच्या जगापल्याड

प्राजक्ता गोंधळेकर